स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ अंक २१ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ जुलै २०२३

पाक्षिक

# द पीपल्स पोस्ट

समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी



# घड्याळ पुतण्याकडे, पट्टा चुलत्याकडे

घाई घाई अंगाशी येई – अनंत बागाईतकर

धर्मकेंद्री सत्ता हे भारतीय सत्तेचे चारित्र्य नव्हे – डॉ. संजय मून

हमSS है... कसं कुठं आणि किती.... – तात्या विंचू

पाक्षिक **द पीपल्स पोस्ट** समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५
अंक २१ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ जुलै २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

**अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त**

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** घड्याळ पुतण्याकडे, पट्टा चुलत्याकडे – ३ / घाई घाई अंगाशी येई – **अनंत बागाईतकर – ५** / **दिल्ली दरबार :** विरोधकांच्या महाआघाडीला सामंजस्याचे बळ?– **विचक्षण बोधे – ८** / **रेशीम आणि किडे :** मोदी, भाजपा आणि विपक्ष – **संजय पवार – ११** / समग्र परिवर्तनासाठी जनअभियान आवश्यक – **प्रा. एच.एम. देसरडा – १३** / धर्मकेंद्री सत्ता हे भारतीय सत्तेचे चारित्र्य नव्हे – **डॉ. संजय मून – १६** / हिंदू कोड बिल म्हणजे महिला मुक्तीचा मार्ग – **प्रो. भगवान माने – १९** / एक व्यक्ती/एक मत/एक मूल्य – **बी.जी. वाघ – २२** / भारतीय संशोधनाचे दारिद्र्य – **प्रा. दिलीप चव्हाण – २५** / कोशातून बाहेर पडण्याची गरज – **प्राचार्य – प्रभाकर बागले – २८** / ध्रुवीकरणाचे पुढचे पाऊल : समान नागरी कायदा – **कॉ. भीमराव बनसोड – २९** / मणिपूर हिंसाचार: जातीय की सांप्रदायिक? – **राम पुनियानी – ३२** / **ग्रंथ परिचय :** कामगारांचा आवाज बुलंद करणारी पुस्तिका – **गौतम खुशालराव कांबळे – ३३** / **कोणता भारत :** हमSS है... कसं कुठं आणि किती.... । ऑनलाईन गेममुळे माणसाचाच गेम – **तात्या विंचू – ३५** **कविता :** लेखणी तासून ठेवा – **निशांत गुरू** । कोठवर? – **डी.के. शेख** । कधीतरी तर आपले मौन सोड – **श्रीपाद भालचंद्र जोशी – ३८**

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# घड्याळ पुतण्याकडे, पट्टा चुलत्याकडे

महाराष्ट्राचे राजकारण जसे डाव, प्रतिडाव, फंदफितुरी, खंजीर वगैरेंनी भरलं आहे, तसंच ते पुतण्या आणि चुलत्याच्या संघर्षानेही भरलं आहे. या संघर्षालाही एक दीर्घ परंपरा आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि राज ठाकरे. पुढे उद्धव ठाकरे विरुद्ध राज ठाकरे (म्हणजे भावाभावांत), भाजपचे ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे आणि धनंजय मुंडे (आता धनंजय विरुद्ध पंकजा म्हणजे भाऊ बहीण), उदयनराजे भोसले आणि अभयसिंह भोसले (आता दुसऱ्या पिढीत उदयनराजे विरुद्ध शिवेंद्र भोसले), सुनील तटकरे आणि अवधूत तटकरे (सध्या हा वाद अदिती तटकरेपर्यंत), जयदत्त क्षीरसागर आणि संदीप क्षीरसागर (सध्या हा वाद नव्या पिढीपर्यंत), अशोक पाटील निलंगेकर आणि संभाजी पाटील निलंगेकर. (पुढे माजी मुख्यमंत्री शिवाजीराव विरुद्ध संभाजी) असे हे काका-पुतण्यांचे वाद होते आणि आहेत. ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे गेले आहेत. याशिवाय भावाभावांत, वडील-भावांत संघर्ष होते आणि आहेत ते वेगळेच. देशाचे एक ज्येष्ठ नेते शरद पवार आणि त्यांचे पुतणे अजितदादा पवार यांच्यातील संघर्षाने पुन्हा एकदा हा सारा इतिहास आणि वर्तमान आठवतो आहे. शरद पवार विरुद्ध अजितदादा असा हा वरवरचा संघर्ष वाटत असला, तरी या संघर्षाला कौटुंबिक पदर कमी आणि राजकारणातील अस्तित्वासाठीचा संघर्ष अधिक असल्याचे जाणवते. पवार कुटुंबातील नात्यांमध्ये संघर्ष कधी होत नाही. कुटुंब एकसंध ठेवण्यात शरद पवार अजून तरी यशस्वी झाले आहेत. पुढे काय होणार हे प्राप्त परिस्थितीत कुणालाही सांगता येणार नाही.





तर अजितदादा बंड करणार याची कुणकुण साऱ्या महाराष्ट्रालाच लागली होती. तसा प्रयत्न पहाटेच्या शपथविधीच्या वेळी झाला होता. त्या अगोदर आणि नंतरही असा संकेत देणाऱ्या हालचाली चालूच होत्या. पहाटे झालेल्या शपथविधीने दगा दिला आणि दिवस उगवण्यापूर्वीच सत्ता निसटायला लागली. केव्हा तरी पहाटे रात्र उलटून जाण्याऐवजी चकवून गेली. सत्तेच्या मिठीत जाण्यापूर्वीच फसवून पहाट गेली असं म्हणण्याची वेळ आली. गंमत म्हणजे, या पहाटे लिहावयाच्या सत्तागाण्याला शरद पवारांचा पाठिंबा होता हे त्यांनीच पंधरा-वीस दिवसांपूर्वी स्पष्ट केले. यामागचा गेम कोणता होता हेही त्यांनी स्पष्ट केले. पहाटेने दगा दिला होता. पण पुढे आघाडी सरकारमध्ये अजितदादा उपमुख्यमंत्री झाले आणि दिवसाचे गाणे सुरू झाले. दोन-अडीच वर्षांच्या दिवसरात्री संपल्यानंतर सरकार कोसळले आणि शिंदेशाही आली. शिवसेना संपवणारच असा विडा उचललेल्या फडणवीस यांनी हे करून दाखवले आणि पुन्हा परत येऊन दाखवले. आता पुढचे लक्ष्य होते राष्ट्रवादी. ते दोन कारणांसाठी. उद्याच्या राजकारणात डोईजड होणारा पक्ष संपवणे आणि घर भेदून, पाहुणा होऊन आलेल्या एकनाथ शिंदे यांच्यामागे पात्र-अपात्रतेचा कायदा लागलेला आहे. जर का ते पंधरा शिलेदारांसह अपात्र ठरले, तर या परिस्थितीत सरकार टिकले पाहिजे आणि त्यासाठी राष्ट्रवादी मुळापासूनच फोडणे गरजेचे होते. त्यासाठी फडणवीस बुद्धिबळाच्या डावानं एकएक चाल करत राहिले. परिस्थिती अशी निर्माण झाली, की एकाच वेळी अजितदादा आणि त्यांच्या ४० साथीदारांना (आकडा कमी-अधिक होऊ शकतो) भाजपकडे जाण्याची आणि भाजपला त्यांना आपल्याबरोबर घेण्याची गरज तीव्र झाली. राष्ट्रवादी आपल्याबरोबर आल्याने शिंदेशाहीत पडझड झाली तरी राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर फडणवीस यांची भाजप अधिक बलवान होणार होती आणि तसे झालेच. अजितदादा आणि त्यांच्या ४० सहकाऱ्यांनाही अशीच गरज होती. जर आपण भाजपला पाठिंबा दिला नाही, तर कोणत्याही क्षणी ईडीचे पाश आवळले जाणार होते आणि चाळिसातील डझनभर नेते तरी आत गेले असते. तसे जणू काही होणार याचा इशारा खुद्द नरेंद्र मोदी यांनीच मध्य प्रदेशातील एका राजकीय सभेत दिला होता. मुळात पंतप्रधानपदावरील माणसाने असे

करावे का, हा नैतिकतेचा प्रश्न आहे. पण राजकारण आणि नैतिकतेचा संबंध असतोच अशी गॅरंटी देणारे दिवस आता राहिलेले नाहीत. मोदींचा इशारा समजणार नाही इतके काही राष्ट्रवादीचे नते दुधखुळे नव्हते. अजितदादा, भुजबळ, मुश्रीफ, तटकरे अशा कितीतरी नेत्यांच्या मागं ईडीचं भूत लागलं असतं, याविषयी कुणालाही शंका नाही. गेली काही वर्षे विरोधी पक्षांना संपवण्यासाठी काही घटनात्मक संस्थांचा त्याच ईडीचाही हत्यारासारखा वापर केला जातोय, हेही काही लपून राहिलेले नाही. गब्बर विरोधकांना नमवून आपल्याकडे खेचण्यासाठी या हत्याराचा खूप वापर होतोय. अनेकजण भाजपच्या तंबूत गेले. त्यांच्यावरचे कलंक गुजरातमधील निरमा पावडर वापरून धुऊन काढण्यात आले. 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' अशी घोषणा करणाऱ्या मोदींनी जे खातात, कलंकित ठरवले गेले आहेत त्यांना आपण आपल्या राजकीय आश्रयाखाली घेणार नाही असे कधी म्हटले नव्हते. जे म्हटले नव्हते ते करत राहिले. म्हणजे एखादा भाजपत आला, की आपोआप स्वच्छ आणि बाहेर राहिला, की अस्वच्छ असं हे धोरण आहे. जगाच्या इतिहासात कधीही घडला नसावा असा हा डाव आहे. संस्काराच्या नावानं बोंब मारणारे आता कलंकित लोकांनाच आपल्या खांद्यावर घेऊन मिरवत आहेत. सत्तास्थानावर त्यांना विराजमान करत आहेत. असे अनेक राज्यांत झाले आहे. ते आता महाराष्ट्रातही घडले आहे. शरद पवार यांच्या पक्षातच घडले. पटेल, भुजबळ यांसारखे एकनिष्ठ नेते आणि स्वतः चा पुतण्याच कसा फितूर झाला, हा प्रश्न लोकांना पडला असेल; पण यांना तो पडला नसावा. यांच्यासमोर एकच प्रश्न होता आणि तो म्हणजे राजकीयदृष्ट्या जिवंत राहण्यासाठी भाजपबरोबर जायचं, की ईडीच्या सापळ्यात अडकायचं? यातील पहिला पर्याय त्यांनी निवडला; पण तोही सनदशीर मार्गाने. पक्षातील निम्म्यापेक्षा अधिक आमदार घेऊन ते लपतछपत नव्हे, तर वाजतगाजत भाजपच्या मांडवात गेले. बँड वाजवायला आणि घरातच तयार झालेलं गाणं म्हणायला खुद्द फडणवीस आणि पडलेला चेहरा घेऊन एकनाथ शिंदेही होते. जोरदार शपथविधी, जोरदार पाठिंब्यासाठी बाहेर शक्तीप्रदर्शन झाले. गंमत म्हणजे, या सर्व भानगडीत ना सामान्य माणसाचा, ना पुरोगामी महाराष्ट्राचा विचार होता. सगळ्या नेत्यांनी मोठ्या आवाजात सांगितलं, की आम्ही लोकांच्या हितासाठी आणि महाराष्ट्राला पुरोगामी होण्यासाठी एकत्र आलो आहोत. आता भल्याभल्यांना प्रश्न पडलाय, की दोन फुटीरवादी एक हिंदुत्ववादी एकत्र येऊन महाराष्ट्राला पुरोगामी कसं बनवणार? या सर्व प्रक्रियेत कोणत्या पुरोगामी विचारांचा सहभाग आहे. खरं तर, नैतिकता, विचार, सभ्यता यांची थडगी बनवून आणि त्यावर फुले वाहून महाराष्ट्र पुरोगामी बनवण्यासाठी निघालेले हे लोक आहेत आणि लोकमतही तसंच आहे. सत्ताकारण टोकाला गेले, की विचारांचे सपाटीकरण होते. चिखलाचे साम्राज्य तयार होते. कोल्हापुरातही जातीय दंगल होते, कबरी लक्ष्य बनतात, आरत्या-महाआरत्यांचा सुकाळ येतो. असं वातावरण असणारा महाराष्ट्र किंवा समाज काय पुरोगामी असतो. नागव्यांचे राजकारण, सत्तांधांचे राजकारण, सूडाचे राजकारण, विरोधी पक्ष संपवण्याचे राजकारण, नात्यांवर आघात करणारे हे राजकारण आहे. समाज, विचार यांपासून तो कोसो मैल दूर आहे. स्वार्थासाठी आणि स्वतःला वाचवण्यासाठी झालेलं हे गलिच्छ राजकारण आहे. प्रफुल्ल पटेलही त्यात आले आणि राष्ट्रवादीत राहून, सत्तेत राहून, प्रोटिन्स खाऊन गलेलठ्ठही त्यात आलेच. आता हेच उद्या चौकाचौकात येऊन पुरोगामी महाराष्ट्राचा जयजयकार करतील. इथल्या परंपरेच्या गळ्यात हार घालतील. आपण बघत राहू. कारण आपण बघ्याची भूमिका निमूटपणे करत आहोत. सत्तेवर येईल त्याच्यामागं लाचार आणि लोचट होऊन जात आहोत.

आता शेवटी महाराष्ट्राच्या राजकारणात गेली २५ वर्षे टकटक करणारे घड्याळ पुतण्यांनी पळवले आहे. मोकळा पट्टा शरद पवारांच्या मनगटावर राहिला आहे. भाकरी परतवली गेली खरी, पुन्हा अशी भाकरी परतवली जाऊ नये म्हणून पुतण्यांनी अख्खा तवाच नेला. पिठाचा छोटा गोळा पवारांच्या हातात आणि पापड सुप्रिया सुळेंच्या हातात राहिला आहे. म्हणावं तर एक राजकीय शोकांतिका आहे, म्हणावं तर राजकारणात हाऊसफुल्ल होऊ पाहणारा भ्रष्टाचाराचा डिमांड शो आहे. भाजप कितीही खुश असली आणि वक्तृत्व स्पर्धेत बक्षिसे मिळवण्याची परंपरा असलेले फडणवीस मोठ्या बक्षिसासाठी पात्र ठरवले गेले, तरी लोकभावना वेगळी आहे. शरद पवार पुन्हा उभारी घेतील यात कुणाला शंका नाही. त्यांना संघटनेचे नाव, चिन्ह याची गरज पूर्वी कधी भासली नव्हती, आताही ती भासणार नाही. दोनवेळा त्यांनी काँग्रेसमध्ये बंड करून नव्या नावानं आणि नव्या चिन्हानं आपला पक्ष वाढवला आहे. आताही तसेच होण्याची चिन्हे दिसत आहेत. हे काही त्यांच्या घरातील बंड नाही, तर सत्तासंघर्षातले आणि स्वतःचा राजकीय बचाव करण्याचे बंड आहे. बंड नव्हे, तर संधिसाधूपणा असे म्हणता येईल. जनतेच्या मनात याविषयी थोडीही आपुलकी नाही. हे सर्व भाजप आणि मोदींना करावे लागते आहे. कारण त्यांच्या पायाखालची वाळू घसरते आहे आणि २४ च्या निवडणुकीत तर ती आणखी घसरणार आहे. कोणा पक्षावर दरोडे टाकून आपला पक्ष कधी बळकट करता येत नाही. दरोड्यातून मिळवलेली मालमत्ता शेवटी काळ्या बाजारात विकावी लागते. कधीही पक्ष सोडणारे, स्वार्थी-विश्वासघातकी राजकारण करणारे कधी निष्ठावंत नसतात. ते सत्ता हस्तगत करणाऱ्या आणि टिकवणाऱ्या टोळ्यांचे सदस्य असतात. फार तर भाडोत्री सैनिक असतात. रशियात अशा सैनिकांनी काय केले हा इतिहास ताजाच आहे. हे सैन्य एखाद्याच्या सांगण्यावरून एखाद्याच्या घरात घुसतं, स्थिरस्थावर होतं आणि पुढं घरच बळकावतं. भाकरी परतवण्याची वाट पाहण्यास कुणाला येथे वेळ नसतो. भाजपकडे जाणारे आणि खास त्यांच्या वॉशिंग मशिनमध्ये स्वच्छ होण्याचा प्रयत्न करणारे काय आणि इतर कुठूनकुठून येणारे काय, सर्वांचं असंच चालत राहतं. तात्पर्य, भाजपने राष्ट्रवादीवर दरोडा टाकला असं जे पवार म्हणतात ते खरं नाही, तर भाजपनं स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतला आहे. पवारांनीही स्वतःच्या पायावर धोंडा मारला आहे. कारण रात्रीत घरभेदीपणा करतील असे बलदंड त्यांच्या सावलीत तयार झालेच कसे? यापुढे सावलीचा क्ष-किरण घेण्याचे अवघड काम त्यांना करावे लागेल अन्यथा सत्तेच्या शोधात फिरणारे आणि विचारांशी दुश्मनी करणारे नेतेच पुन्हा जमा होतील. ●●●

# घाई घाई अंगाशी येई



अनंत बागाईतकर

**महाराष्ट्रात मुख्यमंत्री होण्यासाठी जी घाई नेत्यांना लागलेली आहे, ती अभूतपूर्व आहे. अतिवेग, अतिघाई हे अपघाताला निमंत्रण असते अशा पाट्या घाटामध्ये लावलेल्या असतात. कारण तो अपघात जिवावर बेतू शकतो. या पाट्यांमध्येच आणखी एक पाटी हमखास असते. मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक. महाराष्ट्रातील गेल्या काही काळातील राजकीय घडामोडी पाहता या पाट्यांची आठवण झाल्याखेरीज राहत नाही. या पाट्यांचा आशय लक्षात ठेऊनच या राजकीय घडामोडींचा वेध घेणे रंजक ठरेल.**

अजित पवार यांनी बंड करुन भाजपचा हात पकडला. हे करताना त्यांनी त्यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा लपवून ठेवलेली नाही. समजा लपवली असती, तर तो ढोंगीपणा आणि दांभिकपणा ठरला असता. शरद पवारांमुळे आपल्याला मुख्यमंत्री होता आले नाही, अशी त्यांची तक्रार आहे. तसेच वय होऊन गेल्यानंतरदेखील शरद पवार राजकारणातून निवृत्ती घेत नाहीत, ही त्यांची आणखी एक तक्रार आहे. असे असेल तर मग त्यांनी आताच बंड करण्याचे कारण काय, असा प्रश्न उपस्थित होतो. पूर्वीच, म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे काँग्रेसपेक्षा जास्त आमदार निवडून आलेले असतानाच त्यांनी बंड करायला हवे होते. ही पश्चातबुद्धी त्यांना का होत आहे हा खरा प्रश्न आहे. अर्थात, असे अनेक प्रश्न आता पुढील काळात उपस्थित होत राहतील आणि त्यांची उत्तरे आपापल्या परीने मंडळी देत बसतील. एक खरे आहे, की एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांच्या बंडखोरीची पद्धत हुबेहूब आहे. त्यामुळे अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे सध्या तरी समान बौद्धिक पातळीवर आहेत असे मानायला हरकत नाही. फूट पाडून आपलाच गट खरा पक्ष आहे आणि पक्षाचे चिन्हही आपलेच आहे, असा दावा त्यांनी शिंदे यांच्यासारखाच केला आहे. शिंदे यांच्याप्रमाणेच ते भाजपबरोबर गेलेले असल्याने त्यांच्या मदतीने पक्षपाती व कणाहीन निवडणूक आयोगाकडून ते बेकायदेशीररीत्या अधिकृत पक्ष म्हणून व चिन्हदेखील प्राप्त करू शकतात. फरक एवढाच आहे, की शिंदे यांना नामधारी का होईना मुख्यमंत्रीपद मिळाले आणि अजित पवार यांना एवढा आटापिटा करून उपमुख्यमंत्रीपदावरच सत्तेची तहान भागवावी लागली. त्यामुळे नव्याने झालेली ही फितुरी आणि त्यातून महाराष्ट्रात आगामी काळात कोणते संभाव्य राजकीय चित्र निर्माण होऊ शकते,



याचा आदमास घेणे रंजक ठरेल.

**सत्तेचे आणि स्वहिताचे राजकारण**

अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पाडली. बहुसंख्य आमदार त्यांच्याबरोबर गेल्याचे सध्याचे चित्र आहे. त्यांना लगोलग उपमुख्यमंत्रीही करण्यात आले आणि त्यांच्या नऊ सहकाऱ्यांना मंत्रीपदेही देण्यात आली आहेत. यानंतर पुढे काय असा स्वाभाविक प्रश्न आहे. मुळात वर उल्लेख केल्याप्रमाणे अजित पवार यांनी या बंडाला एवढा विलंब करण्याचे कारण काय, या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल. भाजपबरोबर हातमिळवणी करून स्वतःचे राजकीय आणि इतरही स्वरुपाचे भवितव्य सुरक्षित करणे आवश्यक आहे, हा अजित पवार यांचा विचार जुना नाही. धर्मनिरपेक्षता किंवा काही किमान मूल्यांच्या आधारे राजकारण करण्याची त्यांची भूमिका नाही. त्यामुळेच त्यांना भाजपसारखा पक्षही अनुचित वाटत नाही. ते उघडउघड सत्तेचे आणि स्वहिताचे राजकारण करतात. जोपर्यंत शरद पवार यांच्याकडून त्यांचे स्वहीत झाले, तोपर्यंत त्यांनी काकांना साथ दिली. स्वहिताची प्रक्रिया थांबल्याचे पाहताच त्यांनी वेगळा मार्ग

अवलंबिला.

**निवडणुकीच्या निकालावर सर्व अवलंबून असेल!**

अजित पवार हे चतुर राजकारणी आहेत. त्यांनी बंडखोरी केली खरी; परंतु महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी सव्वा वर्षाचा कालावधी उरलेला असताना त्यांनी हे पाऊल उचलले. त्यांना मुख्यमंत्रीपद हवे असल्यास आता तत्काळ मिळाले तरच त्यांना ते लाभकारक ठरू शकेल, अन्यथा निवडणुकीला केवळ काही महिने उरलेले असताना मुख्यमंत्रीपद मिळणे हा हास्यास्पद प्रकार ठरेल. अजित पवार यांच्या प्रवेशामुळे एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदावरून लगेच काढून त्यांच्या जागी अजित पवार यांना नेमले जाण्याची शक्यता आहे काय, या प्रश्नाचे उत्तर तूर्तास होकारार्थी मिळत नाही. मग आणखी सहा महिन्यांनी असा बदल होणार काय, हा प्रश्नही अनुत्तरितच आहे.




आगामी विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळवून मग अजित पवार यांना मुख्यमंत्रीपद दिले जाणार काय, हा प्रश्न वेडगळ आहे. कारण निवडणुकीचा निकाल काय लागतो, त्यावर सर्व अवलंबून असेल. मग मुख्यमंत्रीपदाबाबत अशी अनिश्चितता असताना अजित पवारांनी हा जुगार खेळण्याचे कारण अनाकलनीय आहे.

**भाजप पडती भूमिका घेण्याची शक्यता नाही**

ज्या देवेंद्र फडणवीस यांचा भाजपचे नवे चाणक्य म्हणून उदोउदो केला जात आहे, ते काय फक्त चाणक्यगिरी करीत बसणार आहेत काय, त्यांना मुख्यमंत्रीपद नकोसे झाले आहे काय असेही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद सहजासहजी अजित पवार यांना देण्यासाठी फडणवीस यांनी या पृथ्वीतलावर अवतार घेतला आहे काय किंवा एवढ्या लहान वयातच त्यांना राजकीय वैराग्य आले आहे काय, असे अनेक प्रश्न मनात येत आहेत. असे अनेक अनुत्तरित प्रश्न व शंका सध्या पिंगा घालत आहेत. यातून समोर येणाऱ्या शक्यता मात्र मनोरंजक आहेत. एकतर आगामी काळात जनाधार नसलेल्या आणि दुर्बळ व पूर्णतया भाजपवर अवलंबून असलेल्या शिंदे गटाचा राजकीय खात्मा या दोन नेत्यांना करावा लागेल. तो कसा करायचा याची एखादी उपाययोजनाही त्यांना शोधावी लागेल. कदाचित ती योजना त्यांनी ठरविलेलीदेखील असू शकते. यासंदर्भात विविध शक्यता आहेत. यादृष्टीने पुढील नऊ महिन्यांत येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुका या निर्णायक ठरू शकतात. यानिमित्ताने जे जागावाटप अपेक्षित आहे त्यावरून या तीनही गटात वाद होणार हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. भाजपचा आणि मुख्यतः विश्वगुरू ब्रह्मांडनायकांचा भर लोकसभा निवडणुकीवर असेल. कारण भाजपला संसदेत जास्तीत जास्त जागा मिळवायच्या असतील तर त्यामध्ये त्यांना नसते वाटेकरी नको आहेत. त्या दृष्टीने त्यांना एकनाथ शिंदे काय किंवा अजित पवार काय, यांच्या गटांचे अडसर अमान्य राहतील. म्हणजेच लोकसभेसाठी या दोन्ही गटांना अल्प जागा देऊन भाजप हा सर्वात मोठा वाटा स्वतःला ठेवणार हे उघड आहे. त्याची सुरुवात झालेलीच आहे. लोकप्रतिनिधींच्या संख्येच्या प्रमाणात जागावाटपाचे सूतोवाच भाजपच्या नेत्यांनी केलेलेच आहे. त्यामुळे या तीन गटांमध्ये सर्वाधिक संघटित आणि जागा मिळवणारा पक्ष हा भाजपच असल्याने त्यांना लोकसभेसाठी जास्त जागा मिळणार हे स्पष्ट आहे. अजित पवार किंवा एकनाथ शिंदे यांना राष्ट्रीय राजकारणात किंवा संसदेत म्हणजेच लोकसभा निवडणुकीत फारसे स्वारस्य नाही असे एकवेळ मानायला जागा आहे; परंतु लोकसभेनंतर सहा महिन्यांतच होणाऱ्या विधानसभा निवडणुकीतील जागावाटप कोणत्या निकषानुसार किंवा सूत्रानुसार होणार, हा प्रश्न निर्माण होतो. शिंदे व पवार यांना महाराष्ट्रात म्हणजेच विधानसभेत सर्वाधिक स्वारस्य आहे. त्यामुळे भाजप विधानसभेत पडती किंवा दुय्यम भूमिका घेणार काय हे तपासावे लागेल; परंतु महाराष्ट्रावर आपल्याच पक्षाची सत्ता असली पाहिजे आणि राजकीय राजधानी दिल्लीप्रमाणेच आर्थिक राजधानी मुंबईवरही आपलेच राज्य असले पाहिजे ही भाजपची महत्त्वाकांक्षा आहे. ती पूर्ण होत नसल्याने ते मुंबईचे आर्थिक महत्त्व पद्धतशीरपणे कमी करून गुजरातचे वाढवत आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही भाजप पडती भूमिका घेण्याची शक्यता नाही.

**महाराष्ट्राचे हितकर्ते कोण आहेत?**

यातून एकच चित्र समोर येते. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजपतर्फे प्रथम शिंदे गटाला गिळंकृत केले जाईल. म्हणजेच त्यांना भाजपमध्ये त्यांच्या गटाचे विलीनीकरण करून शिवसेनेचे अधिकृत अस्तित्व व शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह संपविण्याचा प्रस्ताव दिला जाऊ शकतो. यामुळे महाराष्ट्रात भाजप हा एकच हिंदुत्वाचा पुरस्कर्ता पक्ष असल्याचा दावा करायला भाजपची मंडळी मोकळी होतील. आता प्रश्न उरतो अजित पवार यांचा. त्यांनादेखील त्यांचे स्वतंत्र अस्तित्व कितीकाळ ठेवायचे, याबाबत विचार करावा लागेल. कारण त्यांची एकंदर प्रवृत्ती पाहता एकट्याने पक्ष चालविण्याची धमक त्यांच्यात

आहे काय याची झलक येत्या काही काळातच पाहण्यास मिळेल. अजित पवार यांना हे परावलंबित्व महागात जाणार आहे. यात त्यांना मुख्यमंत्रीपद मिळेल की हातातून निसटेल याचा अंदाज येणार नाही. देवेंद्र फडणवीस यांनाही मुख्यमंत्रीपद हवे आहे आणि त्यामुळेच एकनाथ शिंदे व त्यांच्या गटाचा फडशा पाडल्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठीचा संघर्ष फडणवीस व पवार यांच्यातच होणार आहे. भाजपला अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचे गट केवळ अल्पकाळासाठी हवे आहेत. एकदा महाराष्ट्रातील प्रमुख विरोधी पक्षांना दुबळे केले, की महाराष्ट्रावर पूर्णत्वाने कब्जा करणे सोपे जाईल आणि त्यानंतर विदर्भ वेगळा करणे शक्य होईल, अशी दीर्घकालीन योजना भाजपतर्फे अमलात आणली जाऊ शकते. जेणेकरून महाराष्ट्राला विविध मार्गांनी छिन्नविच्छिन्न करणे हा भाजपच्या सर्वोच्च जोडगोळीचा डाव आहे आणि महाराष्ट्रातले भाजपचे लोक त्यामध्ये सामील आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचे हितकर्ते कोण आहेत, हे जाणण्याची वेळ मराठी माणसावर आली आहे.



**कायद्यालाही धाब्यावर बसवणाऱ्या शक्ती सत्तेत आहेत**

शरद पवार हे न थकणारे नेते आहेत. अजित पवार यांच्या नेतृत्वाच्या मर्यादा ते पूर्णपणाने जाणून आहेत. त्यामुळेच एक प्रकारे अजित पवार यांचे पक्षातून जाणे म्हणजे सुंठीवाचून खोकला जाण्यासारखे ठरणार आहे. आता त्यांना उघडपणे सुप्रिया सुळे यांच्याकडे राजकीय वारसा देणे सोपे होईल. उद्या महाराष्ट्राच्या पहिल्या भावी महिला मुख्यमंत्री म्हणून त्यांना प्रोजेक्ट करण्यात त्यांना आता अडचण राहणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधील जे नेते त्यांच्याबरोबर राहिले आहेत, त्यांना बरोबर घेऊन ते महाराष्ट्रात नव्याने संघटना उभारू शकतात. त्यांचे सर्वसामान्य कार्यकर्ते संभ्रमात असणे स्वाभाविक आहे; परंतु येत्या काही काळातच चित्र अधिक स्पष्ट होईल आणि त्यांना कोणाबरोबर जायचे याचा निर्णय करणे शक्य होणार आहे. आताच्या घडीला शरद पवार यांच्याबरोबर केंद्रीय किंवा राष्ट्रीय पातळीवरील संघटना आहे. लोकसभा व राज्यसभेत असलेल्या सदस्यांपैकी प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे सोडले तर बाकीचे सर्व त्यांच्याबरोबर आहेत. लोकसभेतील सुप्रिया सुळे, श्रीनिवास पाटील, अमोल कोल्हे, लक्षद्वीपचे महंमद फजल शरद पवार यांच्याबरोबर आहेत. राज्यसभेत शरद पवार स्वतः, वंदना चव्हाण, फौजिया खान हे एकत्र आहेत. म्हणजेच राज्यसभेतून प्रफुल्ल पटेल व लोकसभेतून सुनील तटकरे यांनी बंडखोरांची साथ दिलेली आहे. या ठिकाणी अजित पवार यांना यश आलेले नाही. शिवसेनेतील बहुसंख्य लोकसभा सदस्य एकनाथ शिंदे यांच्याबरोबर गेल्याने उद्धव ठाकरे यांना बचावात जावे लागले होते. शरद पवारांवर तशी वेळ येणार नाही. हा दोन्ही फुटींमधील मुख्य फरक आहे. त्याचप्रमाणे एकनाथ शिंदे बंडखोरीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णयही सर्वांसमोर आहे, जो शिंदे व भाजपला फारसा अनुकूल नाही. एक प्रकारे तो निर्णय म्हणजे निवडणूक आयोगालादेखील एक चपराकच मानता येईल. अर्थात, कायद्यालाही धाब्यावर बसवणाऱ्या शक्ती सत्तेत असल्याने हा सामना विषम ठरतो.

**मध्य प्रदेशातही फुटीर आणि निष्ठावान असा तीव्र संघर्ष**

थोडक्यात, संभाव्य चित्र रेखाटायचे झाल्यास भाजपने प्रथम एकनाथ शिंदे यांना गळ टाकून पकडले. आता त्यांच्या गळाला अजित पवार लागले आहेत. यामध्ये भाजप मासेमार आहे आणि एकनाथ शिंदे व अजित पवार हे फक्त मासे आहेत. गळ लावून मासे पकडल्यानंतर मासेमाराच्या टोपलीत जिवंत मासे नसतात. ते मेलेले मासे असतात. पाण्याबाहेर आलेले मासे क्षणार्धात मरतात आणि कुणाच्या तरी ताटाची, भोजनाची भर होतात. भाजपला या फोडाफोडीचे तात्कालिक यश निश्चितच मिळाले आहे; परंतु दीर्घ पल्ल्याच्या दृष्टीने विचार करता हे यश अपयशात बदलायला वेळ लागणार नाही. कर्नाटक हे त्याचे सर्वात मोठे ठळक उदाहरण आहे. मध्य प्रदेश हे राज्य कर्नाटकाच्या वाटेवर असल्याची माहिती आहे. त्यामुळेच सर्वोच्च जोडगोळीचे धाबे दणाणले आहे आणि ऊठपळ ते मध्य प्रदेशाचा दौरा करू लागले आहेत. तेथेदेखील बाहेरच्या पक्षातून आलेले फुटीर आणि निष्ठावान असा संघर्ष तीव्र आहे. कर्नाटकात हाच खेळ झालेला होता. महाराष्ट्रही त्याच मार्गाने चालला आहे. हे सर्व घटक लक्षात घेता भाजप या दोन बांडगुळांना फारकाळ बाळगणार नाही. लवकरात लवकर त्यांना फेकून दिले जाईल. कदाचित त्यासाठी लोकसभेबरोबरच महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका घेण्याचा मास्टर स्ट्रोक भाजपतर्फे खेळला गेल्यास आश्चर्य वाटायला नको. या सर्व शक्यता विचारात घेऊनच महाराष्ट्राच्या आगामी काळातील राजकारणाचा विचार करावा लागेल. ●●●

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# विरोधकांच्या महाआघाडीला सामंजस्याचे बळ ?

**पाटण्यामध्ये भाजपेतर पक्ष बैठकीसाठी आले, त्यामागील आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे काँग्रेसने दाखवलेली तडजोडीची तयारी. त्याचे श्रेय पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधींकडे जाते! खरगे यांच्यासारख्या अनुभवी नेत्याकडे पक्षाची धुरा देण्याचा निर्णय किती योग्य होता, हे कर्नाटकमधील विजयाने सिद्ध केले आहे. विरोधकांची महाआघाडी स्थापन करण्यामध्ये नितीशकुमार यांनी पुढाकार घेतला हे खरे. पण त्यांना खरगेंनी दिलेला सकारात्मक प्रतिसादही तितकाच महत्त्वाचा होता.**

विचक्षण बोधे

आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपेतर विरोधी पक्ष एकत्र लढतील हे पाटण्यातील बैठकीनंतर स्पष्ट झाले. आम आदमी पक्षाने थोडी अडचण निर्माण केली असली, तरी इतर विरोधकांच्या दबावातून ती सोडवता येऊ शकते. विरोधकांच्या महाआघाडीचे नेमके स्वरूप कसे असेल, त्याचे बारकावे शिमल्यातील बैठकीमध्ये निश्चित केले जातील. विविध राज्यांतील १५ हून अधिक प्रादेशिक पक्षांच्या प्रमुखांना एकत्र आणणे, त्यांच्यामध्ये संवाद होणे हे नितीशकुमार यांच्यासाठी आव्हान होते. त्यांनी ते जिकिरीने पक्षप्रमुखांकडे पाठपुरावा करत पार पाडले. आता चर्चेच्या दुसऱ्या फेरीमध्ये हेच काम काँग्रेसला करावे लागेल. शिमल्यातील बैठक यशस्वी झाली तर जागावाटपाचा कळीचा प्रश्न सुटू शकेल. त्यानंतर अन्य मुद्यांवर वरिष्ठ नेत्यांची समिती वेळोवेळी चर्चा करत राहील, बदलत्या परिस्थितीनुसार धोरणे ठरवली जातील. या सगळ्या प्रक्रियेमध्ये काँग्रेसची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल.



**कोणताही एक पक्ष भाजपचा पराभव करू शकत नाही**

सध्या भाजपची स्थिती इतकी मजबूत आहे, की कोणताही एक पक्ष भाजपचा पराभव करू शकत नाही. हे वास्तव भाजपेतर प्रादेशिक पक्षांना समजले होते. त्यामुळे या प्रादेशिक पक्षांना आणि काँग्रेसला एकत्र येण्याशिवाय पर्याय नव्हता. असे असले, तरी केवळ इच्छा व्यक्त केली म्हणजे ती लगेच वास्तवात उतरत नाही. भाजपेतर विरोधी पक्षांनी एकत्र येण्यात प्रमुख दोन समस्या होत्या. आत्ताही त्या आहेत, हळूहळू सामंजस्याने त्यातून मार्ग काढण्यावर पाटण्याच्या बैठकीत सहमती झालेली आहे. पहिली समस्या काँग्रेस आणि प्रादेशिक पक्षांमधील नात्याची. बहुतांश भाजपेतर प्रादेशिक पक्ष काँग्रेसविरोधातून जन्माला आलेले आहेत. त्याचे मूळ १९७५ च्या आणीबाणीत होते. त्यानंतर जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली जनआंदोलन उभे राहिले. आणीबाणीनंतर काँग्रेसविरोधी आघाडीने माजी पंतप्रधान इंदिरा गांधींचा पराभव केला. हा अत्यंत कडवट काँग्रेसविरोधी इतिहास बाजूला ठेऊन जनता दल (संयुक्त), राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष वगैरे पक्षांना काँग्रेसशी जळवून घ्यावे लागणार होते. शिवसेना-ठाकरे गट वगैरे काही पक्षांची विचारसरणी काँग्रेसविरोधी होती, त्यांनी कधीकाळी हिंदुत्वाचा प्रचार-प्रसार केला होता. आत्ताही त्यांच्या विचारांमध्ये फरक पडलेला नाही. सावरकरांबद्दल काँग्रेस आणि ठाकरे गटाची मते वेगवेगळी आहेत. पण भाजपने शिवसेनेला मुख्यमंत्री पद न दिल्यामुळे उद्धव ठाकरे यांचा अहंकार दुखावला, भाजपला धडा शिकवण्यासाठी ते काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर गेले. महाआघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस हे पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या सक्षम नेत्यांनी उभे केले आहेत. बाकी, द्रमुक, नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी, माकप, भाकप, भाकप-माले वगैरे पक्षांची विचारसरणी आणि भौगोलिक प्राबल्य वेगवेगळे आहे. या वैविध्यपूर्ण आणि आपापल्या राज्यांमध्ये

ताकदवान असलेल्या पक्षांना एकत्र आणणे कठीण होते. त्यातही तृणमूल काँग्रेस, जनता दल (सं) हे पक्ष कधी ना कधी भाजपच्या वळचणीला जाऊन बसलेले होते.

**विरोधकांची आघाडी करण्यात मोडता घातला**

दुसरा मुद्दा या पक्षप्रमुखांचा अहंकार आणि काँग्रेसला राष्ट्रीय पक्ष म्हणून असलेले महत्त्व. काँग्रेसची ताकद जसजशी कमी होत गेली तसे हे प्रादेशिक पक्ष प्रबळ होत गेले, अनेकांनी राज्यात सत्ताही मिळवली. महाआघाडीतील अनेक भाजपेतर प्रादेशिक पक्षांचा प्रमुख विरोध काँग्रेसला होता, भाजपला नव्हे! तृणमूल काँग्रेस, जनता दल (सं) हे पक्ष कधी ना कधी भाजपच्या वळचणीला बसलेले होते. जितका काँग्रेस दुर्बल होईल तितके प्रादेशिक पक्ष टिकून राहतील. काँग्रेसचे मजबूत होणे ही धोक्याची घंटा असल्याचे या प्रादेशिक पक्षांना वाटत होते. काँग्रेसभोवती महाआघाडी उभी राहिली तर काँग्रेसच्या दादागिरीला पुन्हा सामोरे जावे लागेल, ही भीतीही होती. आम्ही तर काँग्रेसशी लढून सत्तेवर आलो आहोत, आमचे अस्तित्वच काँग्रेसविरोधावर अवलंबून आहे. मग काँग्रेसकेंद्रित महाआघाडीत कसे सामील होणार, हा प्रादेशिक पक्षप्रमुखांचा अहंकार विरोधकांची एकजूट होऊ देत नव्हता. २०१९ मध्ये तेलुगू देसमचे प्रमुख चंद्राबाबू नायडू, नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारुक अब्दुल्ला आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी विरोधकांचे ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. पण बिगरभाजप-बिगरकाँग्रेस तिसरी आघाडी बनवण्याचा घाट घातला गेला. ममता बॅनर्जींपासून के. चंद्रशेखर राव यांच्यापर्यंत अनेकांनी काँग्रेससह विरोधकांची आघाडी करण्यात मोडता घातला होता. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसविरोधी प्रादेशिक पक्षांना काँग्रेससोबत एकत्र आणणे हे महाकठीण होते.

**भाजपकडून साम-दाम-दंड-भेदाचा बेमालूम वापर**

२०१९ मध्ये फसलेला महाआघाडीचा प्रयोग यावेळी यशस्वी का होत आहे? भाजपने 'काँग्रेसमुक्त भारत'ची घोषणा केलेली होती. त्याचा अर्थ फक्त काँग्रेस नेस्तनाबूत करणे नव्हे तर, भाजप देशव्यापी करणे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत अभूतपूर्व विजय मिळवल्यानंतर भाजपचे तत्कालीन अध्यक्ष अमित शहा म्हणाले होते, की भाजपने अजून शिखर गाठलेले नाही. भाजपचा देशव्यापी विस्तार बाकी आहे! भाजपला केंद्रातच नव्हे, तर राज्या-राज्यांमध्ये सत्ता मिळवायची आहे. या प्रक्रियेत भाजप अत्यंत निष्ठूरपणे प्रादेशिक पक्षांनाही संपवू लागला आहे. महाराष्ट्रात शिवसेनेची शकले झाली. बिहारमध्ये चिराग पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षाला स्वतंत्रपणे लढवून नितीशकुमार यांच्या जनता दलाला (सं) कमकुवत केले. तामिळनाडूमध्ये अण्णाद्रमुकवर अप्रत्यक्ष वर्चस्व स्थापन केले. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसविरोधात आक्रमक मोहीम आखली. दिल्लीमध्ये वटहुकुम काढून आम आदमी पक्षाची कोंडी केली. मध्य



प्रदेशमध्ये ज्योतिरादित्य शिंदे व त्यांच्या समर्थकांना भाजपमध्ये आणून काँग्रेसचे सरकार पाडले. राजस्थानमध्ये सचिन पायलट यांनाही फोडण्याचा प्रयत्न केल्याचे उघडपणे बोलले जाते. काँग्रेस आणि प्रादेशिक पक्षांना कमकुवत करताना भाजपने साम-दाम-दंड-भेद या चारही पर्यायांचा बेमालूम वापर केला. 'सीबीआय' आणि 'ईडी'चा ससेमिरा लावून विरोधी पक्षांतील अनेक नेत्यांना हैराण केले. महाराष्ट्रात 'ईडी'च्या भीतीने अख्खी शिवसेना फुटली! राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याविरोधात ईडीची चौकशी सुरू केली आहे, त्यांचे हात कौटुंबिक कारणांमुळे बांधले गेले असतील तर त्यांच्यावर दबाव येऊ शकतो. अशा रितीने अनेक नेत्यांची राजकीय गळचेपी केली गेली. काँग्रेससह प्रादेशिक पक्षांचे नेते धुतल्या तांदळासारखे स्वच्छ नाहीत, ही वस्तुस्थिती या नेत्यांनाही माहीत आहे. काळा डाग असल्याचा संशय जरी आला तरी ईडी मागे लागते. भाजपच्या या दडपशाहीमुळे प्रादेशिक पक्ष कमालीचे अडचणीत आले आहेत. भाजपसमोर बचावात्मक होऊन काहीही मिळणार नाही, समोरासमोर दोन हात केले पाहिजेत याचे भान प्रादेशिक पक्षांना आले. राष्ट्रीय पक्ष म्हणून आणि विचारसरणी म्हणून काँग्रेस भाजपविरोधात गेली ९ वर्षे लढत आहे. काँग्रेससाठी विरोधकांची एकजूट अडचण कधीच नव्हती, महाआघाडीत प्रादेशिक पक्ष काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारायला तयार नव्हते. आत्ताही नेतृत्वाचा प्रश्न कायम आहे.

**खरगेंनी दिलेला सकारात्मक प्रतिसादही तितकाच महत्त्वाचा**

पाटण्यामध्ये भाजपेतर पक्ष बैठकीसाठी आले, त्यामागील आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे काँग्रेसने दाखवलेली तडजोडीची तयारी. त्याचे श्रेय पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधींकडे जाते! खरगे यांच्यासारख्या अनुभवी नेत्याकडे पक्षाची धुरा देण्याचा निर्णय किती योग्य होता, हे कर्नाटकमधील विजयाने सिद्ध केले आहे. विरोधकांची महाआघाडी स्थापन करण्यामध्ये नितीशकुमार यांनी पुढाकार घेतला हे खरे. पण त्यांना खरगेंनी दिलेला सकारात्मक प्रतिसादही तितकाच महत्त्वाचा होता. पक्षाध्यक्ष झाल्यानंतर विरोधकांच्या ऐक्यासाठी खरगे सातत्याने प्रयत्न करत असल्याचे दिसत होते. संसदेच्या अधिवेशनाच्या काळात राज्यसभेतील विरोधी

पक्षनेते म्हणून खरगेंच्या दालनामध्ये भाजपेतर पक्षांच्या नेत्यांची दररोज बैठक होत असे. खरगेंच्या समन्वयामुळे दोन्ही सदनांमध्ये भाजपेतर पक्ष भाजपविरोधात आक्रमक होऊ लागले आहेत. विरोधकांच्या ऐक्यासाठी खरगेंनी ममता बॅनर्जी, शरद पवार, उद्धव ठाकरे, एम. के. स्टॅलिन या नेत्यांना स्वतःहून फोन केला होता. नितीशकुमार यांच्या दिल्लीवारीत खरगे व राहुल गांधींनी एकत्रित चर्चा केली होती. दिल्लीतील वटहुकुमासंदर्भातील वाद वगळता खरगेंनी पाटण्याच्या बैठकीत सामंजस्याची भूमिका घेतली. आता तर विरोधकांची दुसरी बैठक यशस्वी करण्याची जबाबदारी खरगेंच्या खांद्यावर आहे. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत खरगेंनी, आम्ही भाजपविरोधात एकत्र लढू असे ठामपणे सांगितले. महाआघाडीतील प्रादेशिक पक्षांनी अजूनही काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारलेले नाही. पण पाटण्यातील बैठकीत काँग्रेसच्या सामंजस्यामुळे किमान पातळीवर काँग्रेसबद्दल विश्वास निर्माण झाला. त्यामुळेच ममता बॅनर्जी यांच्यासारख्या काँग्रेस आणि राहुल गांधींविरोधी नेत्यांनीही महाआघाडीच्या दुसऱ्या बैठकीच्या आयोजनाची जबाबदारी काँग्रेसकडे देण्यास मंजुरी दिली. ही बैठक काँग्रेसचे सरकार असलेल्या हिमाचल प्रदेशमध्ये घेण्यावर बैठकीत सहमती झाली. महाआघाडीच्या दृष्टीने ही सकारात्मक बाब म्हणता येईल.

**भाजपविरोधात एकत्र येण्याची हीच वेळ**

महाआघाडीचे अस्तित्व प्रादेशिक पक्षांइतकेच काँग्रेसच्या तडजोडीवरही अवलंबून आहे. विरोधकांच्या ऐक्याला काँग्रेसने प्राधान्य दिलेले असून त्याबाबत पक्ष गंभीर असल्याची बाब बैठकीमध्ये नेमकेपणाने मांडण्याची आवश्यकता होती. हे काम राहुल गांधींनी अचूक केले असे दिसते. पाटण्यातील बैठकीआधी तिथल्या काँग्रेसच्या प्रदेश कार्यालयात राहुल गांधींनी कार्यकर्त्यांसमोर केलेल्या भाषणात विरोधी ऐक्याचा स्पष्ट संदेश दिला होता. बैठकीतही जागावाटपाबाबत काँग्रेस लवचिक धोरण स्वीकारण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले. हे म्हणणे राहुल गांधींनी पत्रकार परिषदेतही मोकळेपणाने सांगून टाकले. महाआघाडीतील संभाव्य घटक पक्षांमध्ये मतभेद आहेत, ते कोणीही नाकारलेले नाही. पण भाजपविरोधात एकत्र येण्याची हीच वेळ आहे, ही संधी गमावली तर कदाचित पुन्हा मिळणार नाही, असे उद्धव ठाकरे यांनी बैठकीत समजावले होते. काँग्रेसने लवचिकता दाखवली तर महाआघाडी स्थापन होण्यामध्ये अडचणी येण्याची शक्यता कमी होते. त्याबाबत राहुल गांधींनी प्रादेशिक पक्षांना आश्वस्त केले आहे. त्यामुळे काही राज्यांमध्ये महाआघाडीचे प्रादेशिक पक्ष नेतृत्व करतील ही बाब मान्य करावी लागेल.

**...त्यामुळे काँग्रेसला 'आप'चा वाद सोडवावा लागेल**

शिमल्यामध्ये जागावाटपाचे सूत्र ठरू शकेल. त्यामध्ये राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेसच सर्वाधिक जागा लढवेल. पण प्रादेशिक पक्षांसाठी काँग्रेसला जागा सोडाव्या लागतील. तामिळनाडू, महाराष्ट्र, बिहार, झारखंड या राज्यांमधील आघाडीमध्ये काँग्रेस असल्याने तिथल्या जागांचे वाटप राज्य स्तरावरील नेत्यांशी चर्चा करून निश्चित करावे लागेल. महाराष्ट्रात काँग्रेस जास्तीत जास्त १६ जागा लढवू शकतो. पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश या दोन राज्यांमध्ये जागावाटपाचा प्रश्न तुलनेत क्लिष्ट असेल. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या विरोधात माकप व काँग्रेसने युती केली होती. लोकसभा निवडणुकीत भाजपविरोधात एकास एक उमेदवार उभा करण्याचे सूत्र निश्चित झाले तर, पश्चिम बंगालमध्ये जागावाटपासाठी या तीन पक्षांना एकमेकांसाठी जागा सोडाव्या लागतील. सत्ताधारी आणि प्राबल्य या दोन्हींमुळे तृणमूल काँग्रेसला अधिक जागा द्याव्या लागतील. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसकडे जिंकण्याची ताकद फारशी नसल्याने समाजवादी पक्ष बहुतांश जागा लढवेल. तिथे हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच मतदारसंघांमध्ये काँग्रेसला उमेदवार उभे करता येतील. कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश या दक्षिणेकडील राज्यांमध्ये काँग्रेस तिथल्या सत्ताधारी भारत राष्ट्र समिती, वायएसआर काँग्रेस तसेच तेलुगू देसम व भाजपशी लढेल. या राज्यांमध्ये जागावाटपाची समस्या नसेल. गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, हरियाणा या राज्यांमध्ये काँग्रेस भाजपविरोधात थेट लढू शकेल. ही राज्ये तसेच दिल्ली आणि पंजाब या राज्यांमध्ये आम आदमी पक्ष काँग्रेससाठी अडचण निर्माण करू शकेल. त्यामुळे काँग्रेसला 'आप'चा वाद सोडवावा लागेल. वटहुकुमाच्या मुद्यावर काँग्रेसने भूमिका स्पष्ट करावी व पावसाळी अधिवेशनामध्ये केंद्र सरकारने दिल्लीतील राज्य सरकारच्या अधिकारांवर गदा आणणारे विधेयक संसदेत आणले तर त्याविरोधात काँग्रेस मतदान करेल की नाही, हेही स्पष्ट करावे, अशी आग्रही मागणी पाटण्यातील बैठकीत 'आप'ने केली होती. तातडीने कोणतीही भूमिका घेण्यास काँग्रेसने नकार दिल्याने 'आप'चे प्रमुख अरविंद केजरीवाल पत्रकार परिषदेसाठी थांबले नाहीत. वटहुकुमाच्या मुद्यावर काँग्रेसला तोडगा काढावा लागेल. त्यानंतर उत्तरेकडील राज्यांमध्ये आपची विस्ताराची महत्त्वाकांक्षा नियंत्रित करावी लागेल. दिल्ली व पंजाबमध्ये तुलनेत कमी मतदारसंघ असले, तरी काँग्रेस सर्वच्या सर्व जागा आपसाठी सोडू शकत नाही. त्यामुळे राजस्थान, उत्तराखंड, हरियाणा या राज्यांमध्ये आपसाठी काही मोजके मतदारसंघ काँग्रेसने सोडले तर दिल्ली व पंजाबमध्येही जागावाटपाची तडजोड होऊ शकते. ईशान्येकडील राज्यांमध्येही काँग्रेसला तिथल्या प्रादेशिक पक्षांशी तसेच तृणमूल काँग्रेस, माकप यांच्याशी संवाद साधत जागावाटपाचा प्रश्न सोडवावा लागेल.

पाटण्यातील बैठकीत भाजपेतर विरोधी पक्षांनी एकत्र येण्याचा निर्धार केला असला, तरी कुठलाच ठोस निर्णय झालेला नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपविरोधात लढण्यासाठी आम्ही एकत्र आलेलो आहोत आणि एकजुटीने निवडणूक लढू, अशी ग्वाही ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषदेत दिली होती. त्यामुळे भाजपविरोधात विरोधकांची एकजूट झाल्याचे दिसू लागले असून शिमल्यातील बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब होईल. त्यानंतर भाजपविरोधातील प्रत्यक्ष लढाई सुरू होईल. पहिला टप्पा मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ आणि तेलंगणातील विधानसभा निवडणूक फत्ते करण्याचा असेल. या राज्यांमध्ये काँग्रेस थेट भाजपविरोधात लढेल. त्यामुळे या राज्यांतील काँग्रेसचे यश महाआघाडीसाठीही महत्त्वाचे असेल. ●●●

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# मोदी, भाजपा आणि विपक्ष



संजय पवार

**निव्वळ मोदी वा भाजपचा आलेख खाली येतोय या वा असल्या सर्वेक्षणांच्या आकडेवारीत न गुंतता राज्यनिहाय एकेका जागेबद्दलची सर्वपक्षीय रणनिती ठरविली तर आणि तरच मोदी व भाजप नावाचा आदिपुरुष फ्लॉप शो होऊन राजकीय पडद्यावरून जनमताच्या नकारानेच अस्तंगत होऊ शकेल. भारतीय लोकशाही वाचविण्यासाठी त्याची कधी नव्हे इतकी निकड निर्माण झालीय. विरोधी पक्षांना १९७७ नंतर पुन्हा एकदा संधी चालून आलीय. त्यांनी ती अहंकार कुरवाळत दवडू नये.अन्यथा ते विरोधीच काय राजकीय पक्ष म्हणूनही भविष्यात शिल्लक रहाणार नाहीत.**

अखेर सरकार, सत्ताधारी पक्ष, अंकित माध्यमे, हिंस्त्र समाजमाध्यमे आणि थुलथुलीत नवहिंदुत्ववादी किचन किंग्ज/क्वीन्स आणि या सर्वांच्या इशाऱ्यावर डोक्यासह शरीर गहाण ठेऊन धर्मयुद्धात उतरणारा मध्यम व इतर मागासवर्गासह हिंदू मागासवर्ग तरूण यांना चेष्टेसाठी आणि निर्बुद्ध टीका, शेरेबाजी करायला एक नवा तरोताजा विषय मिळाला, तो म्हणजे विपक्ष ऐक्याचा!

२३ तारखेला प्रथमच हे सारे विपक्षी पाटण्यात भेटले अगदीच प्रारंभिक बैठकीसाठी. ठरायचं, ठरवायच्या गोष्टी अजून दूर आहेत. पण सत्ताधारी पक्षाला कसं घेरता येईल याच्या विचारार्थ जमलेल्या सर्व नेत्यांना पाहून फोटोसेशन ते घराणे वाचवा मोहीम अशा शेलक्या शब्दांत भाजपा नेत्यांनी लगेच सुरुवात केली. सर्वात अश्लाघ्य आणि किमान बुद्धिमत्ता गहाण ठेऊन प्रतिक्रिया दिली ती महाराष्ट्र भाजपने. एकत्रित बसलेल्या नेत्यांत उद्धव ठाकरे व मेहबूबा मुफ्ती या शेजारी शेजारी बसल्या. यावरून दरेकरांची प्रतिक्रिया समजू शकते; पण त्यात फडणवीसही सामील व्हावेत यासारखी अधोगती नाही. वार्ताहर परिषदेत शेजारी बसले म्हणून बोंब मारणारा भाजप त्याच मुफ्तींसोबत जम्मू काश्मिरात सत्तेत होता. सत्तेत असणे व एखाद्या सभेत शेजारी बसणे यातला फरक न कळण्याइतके भाजप दुधखुळे नाहीत. पण राळ उडवून द्यायची ही खास संघीय पद्धत. यातूनच विरोधकांच्या ऐक्याचे प्रयत्न जसजसे आकाराला येतील, तेव्हा हे सर्व कोणत्या थराला जातील याचा हा नमुना म्हणता येईल.



विरोधी ऐक्याला खो घालता येईल असा भाजपला जो मिलियन डॉलर सवाल वाटतो तो म्हणजे, मोदींसमोर कोण? एकदा हा सवाल चर्चेत आणला, की विरोधक निरूत्तर किंवा आक्रमक किंवा आपसात वा स्वतंत्र काही विधानं करणार. मग त्यावरून वरील सर्व घटक झिम्मा फुगडी खेळावं तसे कोण? कोण? कोण? असा घोशा लावत बसणार. मग तेच जोड्या लावत बसणार राहुल गांधी नितीशना चालतील? नितीश अखिलेशला चालतील? अखिलेश राहुलला? ममतांना कम्युनिस्ट? कम्युनिस्टांना काँग्रेस? काँग्रेसला ममता? मग आपापल्या राज्यात हे काय करणार? काँग्रेस दादागिरी करणार की शरणागती पत्करणार? यातून जे नाव पुढे येईल ते मोदींना टक्कर देऊ शकेल? आहे ताकद?

भारतीय संसदीय लोकशाही निवडणुकीचं स्वरूप अमेरिकन राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीसारखं २०१४ पासूनच भाजपने करून

ठेवलंय. पण अमेरिकन राष्ट्राध्यक्ष निवडणुकीतले उमेदवार जसे प्रतिस्पर्ध्यांसोबत वादविवाद वा खुल्या पत्रकार परिषदांना सामोरे जातात तसे सर्व शक्तिमान मोदी सामोरे जातात का? जातील का? नुकतीच अमेरिकेत झालेली पत्रपरिषद आणि त्यातला एकच प्रश्न यावरून जी भंबेरी उडाली, ती जगाने पाहिली. जगातील सर्वात मोठ्या पक्षाचे सर्व शक्तिमान व देशविदेशात लोकप्रिय पंतप्रधान सुरुवातीला तर पत्रकार परिषद नकोच म्हणाले. अमेरिकन म्हणाले करावीच लागेल. तरीही नन्नाचा पाढा. अमेरिकाही हटेना. शेवटी दोनच प्रश्न घेईन, त्यातला एक भारतीय (अंकित!) पत्रकाराचा आणि एक तुमच्याकडचा यावर मांडवली झाली. कुठला भारतीय पत्रकार होता व त्याने काय प्रश्न विचारला हे सर्व बाजूलाच राहिलं. अमेरिकन महिला पत्रकाराने विचारलेला एक विस्तृत प्रश्न मात्र जगभर गेला!

सर्व शक्तिमान मोदीजींनी एक गोलमाल आणि थेट उत्तर नसलेले उत्तर दिले व वेळ मारून नेली. पण वेळ इथेच संपली नाही. त्याच दिवशी पूर्व राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी एक मुलाखत देऊन बायडेन यांच्या जागी मी असतो तर मी मोदींना विचारले असते, की.. म्हणून त्यांनीही त्या महिला पत्रकाराच्या प्रश्नाच्या आशयाचा प्रश्नच विचारला. माझे मित्र बराक अशी अतिरिक्त सलगी ज्यांच्या भारतभेटीत दाखवली होती, त्याच ओबामांनी आपल्याच भूमीवर 'माय डिअर' मोदींची गोची करून ठेवली.

मोदी मोदी मोदी करत जो दौरा गाजवला गेला होता तो या दोन कारणांनी झाकोळला.आता तिथला विषय तिथेच संपला होता. पण भारतातले आणि अमेरिकेतले भारतीय आयटी सेलने तयार केलेले झोंबी लगेच इंगळी डसावी तसे चित्कारू लागले व ती पत्रकार व ओबामांचं मुस्लिमपण अधोरेखित करत एक आंतरराष्ट्रीय निर्लज्जपणा सिद्ध करते झाले. यूपीतल्या एखाद्या खेड्यात मॉबलिंचिंग वा बुलडोझर कौतुकाने मिरवावे तसे या दोघांवर हे अंधभक्त तुटून पडले. यात इकडच्या केंद्रीय मंत्र्यांपासून तालुका अध्यक्षांपर्यंत सर्वच धुपाटणे घेऊन त्या दोघांना झोडपीत राहिले. अर्थात, हे थांबवण्याचा प्रयत्न शक्तिमान करणार नव्हतेच. शेवटी व्हाईट हाऊसनेच कान पिळले नि असला अश्लाघ्य निर्गलपणा खपवून घेतला जाणार नाही, असा सज्जड इशाराच दिला! काय पत राहिली या सर्वात मोठ्या लोकशाहीची? थोडक्यात विश्वगुरूंना आता विश्वातूनच, जरा दमानं असा सल्ला मिळालाय.

देशात तर तो कर्नाटकाने आधीच देऊन ठेवलाय. कर्नाटकापाठोपाठ मणिपूर आणि अमेरिकेतले दोन प्रश्न यांनी शक्तिमान अब शक्तिमान ना रहा हे लक्षात येऊच शकतं डोळंस लोकशाहीवाद्यांना. ते संघाच्याही लक्षात आल्याने त्यांचे मुखपत्र ऑब्झर्व्हरमध्ये केवळ मोदींच्या नावे निवडणुका जिंकता येणार नाहीत, असे विधान छापून आलेय! पण या विधानातून आणखी अनेक अर्थ ध्वनित होतात. कारण संघ एखादं विधान करतो तेव्हा त्याच्या आगेमागे दृश्य अदृश्य अनेक विधाने वा संकेत असतात. वरील विधानाचा अर्थ असाही घेता येऊ शकतो, की मोदींच्या चेहऱ्यासोबतच अधिक व्यापक ध्रुवीकरण. केंद्रीय यंत्रणांचा वापर, विरोधकांचे प्रतिमाभंजन, विरूपी विद्रुपीकरण, टोकाचा विद्वेष, मुस्लिम द्वेष हे सर्व असं रटरटत ठेवायचं की देशातला हिंदू गर्वाने व भयभीत होऊन मतपेटीत बंदिस्त करता येईल. समान नागरी कायद्याची चर्चा ही त्याची सुरुवात आहे. पण भाजप समान नागरी कायदा हा राममंदिर वा ३७० सारखा वापरता येईल या भ्रमात असेल, तर त्यांचा तो भ्रमाचा भोपळा विविध जाती-धर्मांच्या व्यक्तिगत कायद्यांच्या खडकांवर असा फुटेल, की भूमीअधिग्रहण व किसान कायद्याप्रमाणे बिनशर्त माघार घ्यावी लागेल.

अर्थात, एकत्रित विरोधी पक्ष हा प्रश्न कसा हाताळतो व भाजपलाच खिंडीत गाठतो यावर पुढची लढाई अवलंबून असेल. पण वरवर विरोधी एकतेची खिल्ली उडविणारा भाजप आता २०१९ प्रमाणे दुरावलेले मित्रपक्ष पुन्हा जवळ करू लागलाय. चंद्राबाबू, अकाली दल यांना प्रेमळ साद घातली जातेय. मोदींनी घराणेशाहीच्या लिस्टमध्ये आता सुप्रिया सुळेंचाही समावेश केलाय. ओमर अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती हे तर त्यांचे सॉफ्ट टार्गेट. हळूहळू मोदी ममतांचा भाचा, लालूंची मुले, अखिलेशलाही मुल्ला मुलायम सदृश्य संबोधन मिळेल. नितीश कुमारांना ते आणीबाणीची आठवण करून देताहेत. थोडक्यात भाजप व मोदी आता एखाद्या गल्लीत राडा झाला, की जशी दिशाहीन बेबंद दगडफेक होते तसे आरोपावर आरोप विरोधकांवर करत राहणार. दगड चुकवायलाही उसंत देणार नाहीत. विरोधक याचा मुकाबला कसा करतात, ते पहावं लागेल.

यात एक आहे, विरोधकांनाही आता युद्धनितीप्रमाणे काही नियम पाळावे लागतील. शत्रू जर बेभान होणार असेल तर विवेकाने उत्तर ही रणनिती बाजूला ठेऊन बुद्ध व गांधी यांनी सांगितलेली हिंसेची वेगळी व्याख्या वापरून शत्रूचं जनावरपण काबूत आणावं लागेल वा त्यातलं जनावरपण संपवावं लागेल.

दुसरं, ही लढाई विषम होऊ नये यासाठी माध्यमांचा वा इतर गोष्टींचा वापर करण्यासाठी एकत्रितपणे साधनसंपत्तीचा साठा करावा लागेल. कारण भाजपकडे पैसा, सरकारी यंत्रणा व मजबूत पक्ष संघटनेसोबत संघ परिवारातील नेमस्त व जहाल असे दोन्ही गट मोठ्या प्रमाणावर आहेत.त्यामुळे २०१४/१९ चा अनुभव बघता भाजपशी राजकीय लढाई आर्थिक व मनुष्यबळासह नवतंत्रज्ञानयुक्त साधनांसहच लढावी लागेल. अशी यंत्रणा काँग्रेससह कुठल्याच विरोधी पक्षात नाही.त्यामुळे ती आता एकत्रितपणे निवडणूक जिंकणे या एकाच लक्ष्याभोवती केंद्रित करून उभारावी लागेल.

निव्वळ मोदी वा भाजपचा आलेख खाली येतोय या वा असल्या सर्वेक्षणांच्या आकडेवारीत न गुंतता राज्यनिहाय एकेका जागेबद्दलची सर्वपक्षीय रणनिती ठरविली तर आणि तरच मोदी व भाजप नावाचा आदिपुरुष फ्लॉप शो होऊन राजकीय पडद्यावरून जनमताच्या नकारानेच अस्तंगत होऊ शकेल. भारतीय लोकशाही वाचविण्यासाठी त्याची कधी नव्हे इतकी निकड निर्माण झालीय. विरोधी पक्षांना १९७७ नंतर पुन्हा एकदा संधी चालून आलीय. त्यांनी ती अहंकार कुरवाळत दवडू नये.अन्यथा ते विरोधीच काय राजकीय पक्ष म्हणूनही भविष्यात शिल्लक रहाणार नाहीत. ●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**


# समग्र परिवर्तनासाठी जनअभियान आवश्यक



प्रा. एच.एम. देसरडा

**सर्वांना शुद्ध हवापाणी, विषमुक्त अन्न, आरोग्यदायी निवारा, स्वास्थ्य सेवा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सामाजिक-सुरक्षा हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे. त्यासाठी संविधानात्मक तरतुदी, कायदे, धोरणे, आर्थिक साधने सर्व काही असूनही लोकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. याविषयी वस्ती, गाव, मोहल्ला, शहर, तालुका व जिल्हा पातळीवर जनजागरण, प्रबोधन कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.**

कर्नाटक विधानसभा निवडणूक निकालाने भाजपच्या मनुवादाला, मोदी-शहाच्या हुकूमशाहीला जबरदस्त चपराक दिली आहे. एकतर भाजपच्या अधिपत्याखालील दक्षिण भारतातील एकुलत्या एक राज्यसत्तेतून ते हद्दपार झाले आहेत. किंबहुना, आता संपूर्ण दक्षिण व पूर्व भारतात (ओडिशा, बंगाल, बिहार, झारखंड) भाजप राजवट नाही! हिमाचलपाठोपाठ कर्नाटकानंतर २०२३ साली देशातील १४ राज्यांत भाजप सत्तेत नाही!! थोडक्यात, सत्तेच्या बलाबलाच्या दृष्टीने भाजप हा हिंदी पट्ट्यातील उत्तराखंड, उत्तरप्रदेश, हरयाणा व मध्यप्रदेश; पश्चिम भारतातील महाराष्ट्र व गुजरात या व्यापारी-औद्योगिक भांडवली राज्यात आणि उत्तरपूर्वेतील छोट्या राज्यांची गोळाबेरीज असलेला हिंदुत्व बहुसंख्याकवादी जातीधर्मांचा व ख्रिश्चन अल्पसंख्याकवादी राज्यांचा सत्तासमूह आहे. हे भौगोलिक जात-धर्मीय आणि आर्थिक वास्तव नीट लक्षात घेऊन भाजप व मोदींच्या सत्तावास्तवाचे नेमके राजकीय आकलन, हा २०२३ च्या विधानसभा व २०२४ च्या लोकसभा निवडणूक लढ्यांचा मुख्य मुद्दा आहे.




**जनअभियान, आंदोलन हाच पर्याय**

या संदर्भात कळीचा प्रश्न हा आहे, की भाजपने धार्मिक ध्रुवीकरणाचे अस्त्र कितीही मस्तवालपणे पाजळले तरी त्यांना २०१९ मध्ये ३७ टक्केच मते मिळवता आली. यंदा कर्नाटकातही मागच्या एवढेच ३६%! मोदी-शाह यांनी जंग जंग पछाडले, तरी त्यांना कर्नाटकमध्ये सामना 'मोदी विरुद्ध राहुल' करता आला नाही. तो हुकूमशाही विरुद्ध लोकशाही, मनुवाद विरुद्ध संविधान असा राहिल्यामुळे निवडणुकीचे गणित बदलले! कर्नाटकचा हा संदेश व मथितार्थ न विसरता भाजपविरोधी पक्षांनी कटाक्षाने मतविभाजन टाळावे, इतका हा सरळसोट राजकीय अन्वयार्थ आहे. हा एक ठोस व दुसरा आणखी एक मुद्दा प्रकर्षाने जावणतो तो हा, की मोदी भाजपविरुद्ध अन्य राजकीय नेते व पक्ष असा मर्यादित परिघ नाही, तर हुकूमशाही सरकार विरुद्ध जनता, बृहत भारतीय कष्टकरी समुदाय; विशेषत: नागर समाज (सिव्हील सोसायटी) अशी भूमिका असावी. अर्थात, सोबतच लोकांचे दैनंदिन जगण्याचे यक्ष प्रश्न आहेतच. यापुढे धर्म व राष्ट्रवादाची संकुचित, भावनिक साद घालून मतदारांना कायम झुलवत ठेवता येणार नाही, असा ठाम विश्वास बाळगून जनअभियान, आंदोलन हाच पर्याय आहे.

आजमितीला भारतातील १४२ कोटी लोकसंख्येपैकी ७० टक्के

लोक दारिद्र्य, कुपोषण, आजार, अभावग्रस्त जीवन जगण्यास मजबूर आहेत. याचा अर्थ, तब्बल शंभर कोटी (एक अब्ज) लोक शोषण, हिंसा, अन्याय-अत्याचाराने हैराण व हतबल आहेत. आपल्या महाराष्ट्रात (ज्याला आपण 'पुरोगामी' मानतो) वंचितांची संख्या दहा कोटी एवढी आहे. कोण आहेत हे लोक, जनसमूह? ते आहेत : शेतकरी, शेतमजूर, कोळी, वनकाम, बांधकाम, खाणकाम, घरकाम करणारे, हातावर पोट असणारे मोलमजुरी, स्वंयरोजगार करून जगणारे तमाम कष्टकरी जनता जर्नादन. महात्मा गांधी, फुले व आंबेडकरांना अभिप्रेत असलेला भारत व महाराष्ट्र हा नक्कीच नाही!




**भारत जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था**

आर्थिक विषमता, सामाजिक-धार्मिक विसंवाद आणि पर्यावरणीय विध्वंस या आज अव्वल राष्ट्रीय समस्या असून लोकप्रतिनिधी, सरकार, प्रशासन व न्यायालय यांचे दायित्व या प्रश्नांचे निराकरण करणे हे आहे. जमेची बाजू म्हणजे त्यासाठी आवश्यक नैसर्गिक, आर्थिक व मानव संसाधने देशात मुबलक प्रमाणात आहेत. भारत आज जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असून आपले राष्ट्रीय उत्पन्न ३०० लाख कोटी रुपये (डॉलर ३.७५ ट्रिलियन) आहे. मात्र, विषमता इतकी प्रचंड आहे, की वरच्या जेमतेम एक टक्का लोकांकडे ४० टक्के संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे, तर तळच्या पन्नास टक्क्यांकडे फक्त ३ टक्के संपत्ती आहे. एका ताज्या सर्वेक्षणानुसार, ज्यांच्याकडे १ कोटी ४० लाख रुपयांची संपत्ती आहे (म्हणजे एक चांगले पक्के घर, प्लॉट, चांगला प्लॉट, ५ एकर बागायत जमीन) ते वरच्या एक टक्का धनिकवर्ग श्रेणीत येतात. याचा अर्थ बाकी कष्टकरी जनता किती कफल्लक आहे. याचा विचार करा.

**समस्त व्यवस्था भ्रष्टाचाराने बरबटलेली**

खरे तर, भारताच्या ४५ लाख कोटी खर्चाच्या व महाराष्ट्राच्या साडेपाच लाख कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पात जे पैसे खर्च होतात त्याचा लाभ फारफार तर वरच्या २०% लोकांना होतो. लाखो कोटी रुपयांचा हा सार्वजनिक खर्च पगार, पेन्शन, कर्जावरील व्याज, कंत्राटे, भ्रष्टाचार यात फस्त होतो. होय, खर्चाचा टिळा शेतकरी व गरीब, गरजूंच्या नावाने लावला जातो. मात्र, ते तर दररोज आत्महत्या करत आहेत. महाराष्ट्रात गत काही दशकांत ३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची नौबत आली. गत पाच महिन्यांत मराठवाड्यात जवळपास चारशे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या; परंतु आमचे लोकप्रतिनीधी, मंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री नवनव्या प्रकल्पांची हजारो कोटी रुपयांची कंत्राटे वाटण्यात मशगूल आहेत. समृद्धी महामार्ग जिंदाबाद, जय महाराष्ट्र, अंगणवाडीतील पोषण आहारापासून, माध्यान्ह भोजन, शिधावाटप, औषधोपचार, नोकऱ्या, बदल्या, परवानग्या यात तहसीलपासून मंत्रालयापर्यंत मध्यस्थ दलालांची टोळी सर्व काही हडप करत आहे. सत्तासंपत्तीवाल्यांचा माज व चैनचंगळवाद जनता उघड्या डोळ्याने बघत आहे. तलाठी, कारकून, अधिकारी, मंत्र्यापर्यंत सर्वजण राजरोस भ्रष्टचार करत आहे. समस्त व्यवस्था भ्रष्टाचाराने बरबटलेली आहे. करे कोई, भरे कोई.

**भाजपचा पराभव करणे अत्यावश्यक**

२०२२ मध्ये 'भारत जोडो यात्रेने' जनतेच्या जीवनमरणाच्या गंभीर प्रश्नांची देशभरात जाहीर चर्चा सुरू झाली. ही खचितच स्वागतार्ह बाब असून एरवी कॉंग्रेस पक्षाच्या धनिकधार्जिण्या व भ्रष्टाचारी धोरणांविरुद्ध कठोर टीका करणारे आम्ही परिवर्तनवादी कार्यकर्ते, अभ्यासक, योजना जागरण, मोहिमेत सहभागी झालो आहोत. यात्रेनंतर 'भारत जोडो अभियान' कार्यरत झाले असून कर्नाटक निवडणुकीत त्याने महत्त्वाची भूमिका बजावली, ही बाब सर्वश्रूत आहे. महाराष्ट्रातील परिवर्तनवादी संघटना व कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने 'भारत जोडो अभियान'चे काम सुरू आहे. गत २-३ महिन्यांत काही शहरांत याच्या बैठका झाल्या आहेत. आता १ व २ जुलैला जळगाव येथे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची एक परिषद होत आहे. या अभियानाचा मुख्य हेतू भारतीय संविधान व लोकशाहीवर होत असलेला हल्ला रोखणे हे आहे. त्यासाठी २०२३ च्या विधानसभा आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचा पराभव करणे अत्यावश्यक आहे. सोबतच कष्टकरी वर्ग व सामान्य जनतेला भेडसावणाऱ्या दारिद्र्य, कुपोषण, महागाई, टंचाई, बेरोजगारी या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी लोकांना संघटित करणे हा उद्देश आहे. त्यासाठी अहिंसक मार्गाने आंदोलन करणे गरजेचे आहे.

विकास ही मूलत: राजकीय प्रक्रिया आहे. विकास व प्रशासनाचे

प्रचलित प्रारूप (ग्रोथ ॲण्ड गव्हर्नन्स मॉडेल) हेच मुळी निसर्ग व श्रमजनविरोधी असल्यामुळे त्यात आमूलाग्र बदलाखरीज समतामूलक शाश्वत विकास होणे सुतराम शक्य नाही. तात्पर्य, विकासाच्या गोंडस नावाने चाललेला विनाश व भ्रष्टाचार रोखण्याचे हे आव्हान आहे. निर्भय बनून लोकांनी जनविरोधी धोरणाविरुद्ध आवाज उठविण्याखेरीज गत्यंतर नाही! आजमितीला हे देशासमोरील सर्वोच्च आव्हान आहे.

सर्वांना शुद्ध हवापाणी, विषमुक्त अन्न, आरोग्यदायी निवारा, स्वास्थ्य सेवा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सामाजिक-सुरक्षा हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे. त्यासाठी संविधानात्मक तरतुदी, कायदे, धोरणे, आर्थिक साधने सर्व काही असूनही लोकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. याविषयी वस्ती, गाव, मोहल्ला, शहर, तालुका व जिल्हा पातळीवर जनजागरण, प्रबोधन कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

यंदा 'एलनिनो'च्या प्रभावामुळे मान्सून लांबला असून अवर्षणाचे सावट पसरले आहे. शेतकरी, शेतमजूर व अन्य कष्टकरी चिंतित आहेत. त्यांना रोजगार व क्रयशक्तीची नितांत गरज आहे. जनतेच्या ज्वलंत समस्यांची सोडवणूक करण्यासाठी तातडीने पुढील उपाययोजना होणे अत्यावश्यक आहे.

**कृती कार्यक्रम :**

१. सर्वांना पिण्यासाठी पुरेसे शुद्ध पाणी व घरगुती वापरासाठी लागणारे किमान पाणी हमखास मिळण्याची व्यवस्था व्हावी. हवेची गुणवत्ता, प्राणवायू उपलब्धता, मानवी आरोग्य व एकंदर जीवसृष्टी पोषक असावी. २. अन्न अधिकार कायद्यानुसार पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्ती व कुटुंबास त्यांच्या पसंदीचे तृणधान्य, भरडधान्य, डाळी व खाद्यतेल पुरवठा केला जावा. खाद्यान्न सेंद्रीय, सत्वयुक्त व विषमुक्त असावे. ३. प्रत्येक गरीब गॅस धारकास वर्षातून किमान ६ सिलेंडर अग्रक्रमाने सवलतीच्या दराने व आर्थिक निकष पात्रतेनुसार मोफत मिळावेत. याखेरीज प्राथमिक गरजा भागविण्यासाठी किमान वीज मोफत पुरविली जावी. ४. प्रत्येक रुग्णावर राहत्या वस्तीत प्रथमोपचार करण्याची चोख व्यवस्था असावी. वस्ती, मोहल्ला, परिसर दवाखाना व स्वस्त जनऔषधी पुरवठा सर्वत्र, २४ तास उपलब्ध असावा. ५. शिक्षण हक्क कायद्याची कसोशीने अमलबजावणी करून शाळेत उत्तम प्रकारचे माध्यान्ह भोजन व शुद्ध पाणी दिले जावे. आवश्यक सोयींसह स्वच्छतागृहे असावीत. पाठ्यपुस्तके व गणवेश पुरविले जावेत. ६. गरीब वस्त्या, झोपडपट्टीत राहणाऱ्यांसाठी घरकुल पुरवठा संख्या तसेच त्याचा दर्जा सुधारून सर्व गरजूंना त्वरित दिले जावेत. ७. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सर्वत्र उपलब्ध असावी. महिला, बालके, शाळकरी, मुलंमुली, वृद्धांना त्यात अग्रक्रम व नाममात्र भाडे असावे. ८. दारू व अन्य अमली पदार्थांच्या तसेच तंबाखू, गुटखा, बिडी-सिगारेटचे उत्पादन, विक्री व सेवनास बंदी घालून त्याच्या कठोर पालनाची दक्षता घ्यावी. सुमारे वीस लाख कोटी रुपयांचे हे उत्पादन, व्यापारउदीम जनतेचे आरोग्य व गोरगरिबांचे संसार उद्ध्वस्त करत आहे. करिता बंदी हाच उपाय. ९. गावात, शहरात कुणी उपाशी राहणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी. कुणी रस्त्यावर, उघड्यावर राहण्यास मजबूर नाही, या दोन्ही बाबींचे




दायित्त्व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यावर असावे. १०. जातीय, धार्मिक तेढ, अशांतता, हिंसा, दंगल, करणाऱ्यावर कठोर कारवाही करण्यात यावी. ११. उपर्निदिष्ट बाबी किमान गरजांच्या पूर्ततेसाठी अत्यावश्यक असल्या तरी त्या पुरेशा नाहीत. याचे भान राखून विषमता, विसंवाद व विध्वंस रोखण्यासाठी परिणामकारक तरतुदी करून मानव विकास निर्देशांकांची पातळी (ज्यात भारत १३२ व्या क्रमांकावर आहे व महाराष्ट्र देशात ७ वा आहे) वाढविण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. १२. भारतातील ७० टक्के जनता कमी-अधिक प्रमाणात अभावग्रस्त जीवन जगत आहे. त्यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी, रोजगार क्षमता व संधी प्रदान करण्यासाठी मोठ्या गुंतवणूक निधीची गरज आहे. ऐपतदारांवर कर बसवून आवश्यक तो निधी उपलब्ध होऊ शकतो. या संदर्भात एक बाब आवर्जून लक्षात घेतली पाहिजे, की भारतात जेमतेम १२ ते १५% राष्ट्रीय उत्पन्न कररुपाने सरकारकडे येते. अमेरिका व युरोपमध्ये हे प्रमाण २० ते ४० टक्के आहे. आपल्या देशात २५ टक्के कर महसूल मिळाला, तर आजच्या राष्ट्रीय उत्पन्नातून (३०० लाख कोटी) ७५ लाख कोटी मिळू शकतात. सध्या त्याच्या निम्मेही प्राप्त होत नाहीत. आयकर व कंपनी करासोबतच, संपत्ती व वारसा कर लागू केल्यास महसूल मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. अर्थात, यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी. जनअभियानाने सरकारवर यासाठी दबाव निर्माण केला पाहिजे. करचोरी, काळा पैसा, भ्रष्टाचाराविरुद्ध जनआंदोलन ही भारतमातेची हाक आहे. त्यासाठीच सज्ज होणे हे प्रत्येक भारतीयाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

**(लेखक विख्यात अर्थतज्ज्ञ असून महाराष्ट्र नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.)**

# धर्मकेंद्री सत्ता हे भारतीय सत्तेचे चारित्र्य नव्हे



डॉ. संजय मून

**भारतात वारंवार भारताच्या समताधिष्ठित मूल्यांवर विषमताधिष्ठित मूल्यांचे आक्रमण होत असते व भारतीय जनमानस वारंवार हे आक्रमण पचवून किंवा पालटवून आपली मुळातली समताधिष्ठित मूल्ये प्रस्थापित करीत जातात. त्यामुळे भारतात धर्माकेंद्री सत्ता स्थापन होणे ही अनैसर्गिक बाब असली तरी अनैतिहासिक बाब नाही. भारतात यासारखी वारंवार प्रतिक्रांती होतच असते. आज जरी भारतात धर्माकेंद्री सत्ता स्थापन झाली असली तरी आणि ती भारतीय चारित्र्याचा भाग नसली, तरी ती भारतातील प्रतिक्रांतीची प्रवृत्ती होय.**



सत्तांतरे ही भारताला तशी काही नवीन नाहीत. लोकशाहीमध्ये अशा प्रकारची सत्तांतरे ही होतच राहतात. अर्थात, ही सत्तांतरे होत राहणे हे लोकशाहीच्या जिवंतपणाचे लक्षणही आहे. मात्र २०१४ मध्ये झालेले सत्तांतर हे या इतर सत्तांतरपेक्षा वेगळे आहे. या पूर्वीची सत्तांतरे ही भारताने सत्तेची जी काही मूल्ये स्वीकारली होती त्या मूल्यांतर्गत ही सत्तांतरे होती. मात्र २०१४ मध्ये झालेले सत्तांतर हे काही या मूल्यांतर्गत झालेले सत्तांतर नाही. नेमकेपणाने सांगायचे तर भारताने सत्तेची एक चौकट स्वीकारली आहे. सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य ही ती चौकट होय. त्यामुळे भारतात तीच सत्तांतरे नैसर्गिक आहेत जी या चौकटीत होतात. या चौकटीच्या बाहेर होणाऱ्या सत्तांतराला एकतर भारतीय मूल्यांतर्गत सत्तांतर म्हणता येत नाही. किंबहुना, या सत्तांतराला भारतीय सत्तांतरही म्हणता येत नाही. या सत्तांतराला यासाठी भारतीय सत्तांतर म्हणता येत नाही, कारण या सत्तांतराचा आधार धर्म आहे आणि झालेले सत्तांतर हे धर्मकेंद्री आहे. या सत्तांतराला यासाठी धर्मकेंद्री सत्तांतर म्हणायचे, की या सत्तांतरसाठी धर्माचा राजकीय समीकरण म्हणून उपयोग करण्यात आला आहे. त्यासाठी मुस्लिम धर्माचे लांगूलचालन केले जात आहे असा प्रचार करण्यात आला. बाबरी मशिद-रामजन्मभूमी हा धार्मिक प्रश्न म्हणून समोर आणण्यात आला. रथयात्रा काढून धार्मिक संवेदनशीलता जागृत करण्यात आली. धार्मिक मतांचे ध्रुवीकरण करण्यात आले. या प्रकारे धर्माचा राजकीय सत्तांतरासाठी उपयोग करून हे सत्तांतर घडवून आणण्यात आले आहे. सत्तेची धर्मनिरपेक्ष मूल्यचौकट स्वीकारलेल्या देशात धर्माचा राजकीय समीकरण म्हणून उपयोग करून झालेले हे सत्तांतर असल्याने ते भारतीय परंपरेत अनैसर्गिक आणि अभारतीय सत्तांतर ठरते.

**मूल्येच त्यांची त्यांची व्यवस्था घडवत जातात**

खरे म्हणजे, कोणत्याही देशाची सत्ता ही त्या त्या देशाच्या संस्कृतीचे अपत्य असते. त्या त्या देशाची संस्कृतीच त्या त्या देशाचे सत्तेचे प्रारूप ठरवत असते. भारताने जर सत्तेचे 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य हे स्वरूप स्वीकारले असेल तर ते काही अनाहूतपणे स्वीकारले नाही, तर ती या देशाची संस्कृती आहे. किंबहुना, या देशाच्या संस्कृतीने घडवलेले सत्तेचे ते अपरिहार्य रूप आहे. भारत हा मुळात समताधिष्ठित देश आहे. भारताची ही समताधिष्ठितता निसर्ग कायद्यातून उत्क्रांत झाली आहे. मानव जितक्या सहजतेने निसर्गातून उत्क्रांत होऊन सामाजिक झाला, तितक्याच सहजतेने हा निसर्ग कायदाही मानवात उत्क्रांत होऊन सामाजिक झाला. समताधिष्ठितता हे सृष्टीचे नैसर्गिक तत्त्व आहे. थोडे विषयांतर होईल; पण भारताची नैसर्गिक मूलतत्त्वे कोणती हे समजून घेण्यासाठी हे सगळे मुळातून समजून घेणे गरजेचे आहे. सृष्टी ही परस्परावलंबी घटकांची स्वयंपूर्ण व्यवस्था आहे. या सृष्टीतील परस्परावलंबी असणारे सर्व घटक सारख्याच पद्धतीने उत्क्रांत होत राहिले, तरच सृष्टी उत्क्रांत होत राहील आणि सृष्टी उत्क्रांत होत राहिली तरच तिच्यावरचे जीवन उत्क्रांत होत राहील. म्हणजे सृष्टी उत्क्रांत होण्यासाठी तिच्यावरील सर्वच घटकांना उत्क्रांत होण्याचे समानतेने स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. सृष्टीशी बांधलेले किंवा बद्ध असलेले म्हणजेच परस्परांशी बंधुत्व असणाऱ्या सर्वच घटकांना उत्क्रांतीसाठी समानतेने स्वातंत्र्य मिळणे हाच खरा नैसर्गिक कायदा किंवा न्याय होय. म्हणजेच सृष्टी निकोपपणे उत्क्रांत होण्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही तत्त्वे महत्त्वाची आहेत. मानव

हा सृष्टीचाच एक घटक असल्याने तो जसा सृष्टीतून उत्क्रांत होऊन सहजपणे वेगळा झाला, तशीच सृष्टीच्या उत्क्रांतीची ही मूल्येही अगदी सहजपणे मानवाने निर्माण केलेल्या सामाजिक व्यवस्थेतही अवतरली. सृष्टीतून उत्क्रांत झालेली स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मानवाच्या विकासाचीही नैसर्गिक मूल्ये ठरली. मानवाने जेव्हा जेव्हा ही मूल्ये नाकारली, तेव्हा तेव्हा त्याने अस्थिर, अशांत व भयप्रद जीवन व्यतीत केले आणि जेव्हा जेव्हा त्याने ही मूल्ये स्वीकारली, तेव्हा तेव्हा त्याने स्थिर व शांत जीवन व्यतीत केले. सृष्टीतून उत्क्रांत होऊन मानवी व्यवस्थेत अवतरलेली हीच मूल्ये मगध साम्राज्यातून भगवान बुद्धाने त्यांच्या भिक्खू संघात स्वीकारली. हीच मूल्ये भिक्खू संघाकडून सम्राट अशोकाने स्वीकारून त्यांचा अफागाणिस्तान ते जगभर प्रसार केला. हीच मूल्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५० ला भारतीय राज्यघटनेत स्वीकारली. भारतीय लोकांनी भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याची व ती पाळण्याची जी शपथ घेतली आहे, ती भारताच्या या नैसर्गिक मूल्यांनीच अत्यंत नैसर्गिकपणे घडवलेले सत्तेचे स्वरूप होय. आपण जीवनात जी मूल्ये स्वीकारतो त्याच मूल्यांशी अत्यंत संवादी असणाऱ्या इतर संस्था घडवत जातो. एक प्रकारे ही मूल्येच त्यांची त्यांची व्यवस्था घडवत जातात. भारतात निर्माण झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक व्यवस्थाही भारताच्या याच मूल्यांनी घडवल्या आहेत.

**धर्मनिरपेक्षता विरुद्ध धर्मकेंद्री**

भारत हा मुळात समताधिष्ठित असल्याने भारताच्या या समताधिष्ठित मूल्यांच्या प्रकाशातच भारताच्या सामाजिक, संस्कृतिक, राजकीय धार्मिक व आर्थिक संस्था विकसित होणे हे नैसर्गिकच समजले पाहिजे. केवळ एव्हढेच नाही तर भारतातील समूहभाव, सहिष्णुता, लोकशाही, सर्वभूती चैतन्य व सार्वजनिक उत्पादन व्यवस्था ही सगळी वैशिष्ट्ये या समताधिष्ठित मूल्यांनीच घडवली आहेत. याच मूल्याने आणखी एक संकल्पना घडवली आहे, ती म्हणजे धर्मनिरपेक्षता होय. इथे एक बाब लक्षात घेतली पाहिजे, की धर्मनिरपेक्षता ही काही पारंपरिक संकल्पना नाही. ती काळाच्या ओघात किंवा भारतीय संस्कृतीच्या अपरिहार्य रूपाने घडवलेली एक संकल्पना आहे. जगाच्या पाठीवर भारताला अभिप्रेत असणाऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्षता हा शब्द वापरला जातच असेल, याची शाश्वती कमीच आहे. आज भारतीयांनी जागतिक परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी धर्मनिरपेक्षता या शब्दासाठी SECULARISM[2] 'सेकुलॅरिझम' हा पर्यायी शब्द म्हणून स्वीकारला आहे. पण याचा अर्थ धर्मनिरपेक्षता म्हणजे सेकुलॅरिझम नव्हे. सेकुलॅरिझम हा शब्द समानता, समता या अर्थाचा आहे, तर भारतीय धर्मनिरपेक्षतेला असणारा अर्थ दुसराच आहे. भारतात अनेक धर्म, पंथ व संप्रदाय आहेत. यातल्या कुठल्याही एका धर्माला जर प्राधान्य दिले गेले तर इतर धर्म, पंथ व संप्रदायांवर अन्याय होण्याची शक्यता असते. त्यामुळे कुठल्याही एका धर्माला प्राधान्य न देता सर्व धर्मांना समान समजणे म्हणजे धर्मनिरपेक्षता होय. भारताला एक राष्ट्र म्हणून उभे करायचे असेल, तर भारतातील सर्व नागरिकांचा भारताच्या विकासात सारखाच सहभाग असला पाहिजे, भारतातील सर्वच



नागरिकांच्या स्वातंत्र्याची व जीविताची हमी घेतली पाहिजे, भारतातील सर्व नागरिक एकात्म झाले पाहिजे यासाठी धर्माच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची गरज आहे. विविध धर्म असूनही मानवी कल्याणाचा धर्मातीत म्हणजे धर्माच्या पलीकडे जाऊन विचार करणे म्हणजे धर्मनिरपेक्षता होय. भारतातील धर्मनिरपेक्षतेची अशी व्याख्या असल्याने ती इंग्रजी सेक्युलॅरिझम पेक्षा पूर्णत: वेगळी आहे. धर्मनिरपेक्षता या संकल्पनेत धर्म ही संकल्पना गृहीत आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. विविध धर्म असूनही भारतातील मानवाच्या विकासाचा धर्मातीत विचार करणे अशी ही धर्मनिरपेक्षतेची संकल्पना असल्याने ती धर्मकेंद्री नाही हे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे. धर्मनिरपेक्ष असणे वेगळे व धर्मकेंद्री असणे वेगळे. धर्मनिरपेक्षतेत मानवाच्या विकासाचा धर्माच्या पलीकडे जाऊन विचार करणे आणि धर्मकेंद्री विचार करणे म्हणजे धर्माचा विकास करणे, धर्माचा विकास लक्षात घेऊनच मानवाचा विचार करणे. इथे धर्माच्या विकासाला प्राधान्य आहे. धर्म प्रथम आणि माणसाचा विकास दुय्यम, असे हे सूत्र आहे.

**धर्मकेंद्री सत्तेतील धर्म आणि भारतीय धर्म**

धर्मकेंद्री सत्तेत धर्म हा मुळातच सत्ता हस्तगत करण्यासाठी उपयोगात आणावायचा असल्याने तो धर्म म्हणून कमी स्वरूप प्राप्त होत असते. हा असा धर्म मग इतर धर्माला शत्रू संबोधून उभा केला जातो. धार्मिक ध्रुवीकरण आणि सत्तेचे समीकरण म्हणूनच अधिक उपयोगात आणले जात असल्याने त्याला राजकीय समीकरणाने अधिक उठाव दिला जातो. उन्मादक म्हणता येईल या पातळीवर धर्माला आणले जाते. धर्मात असुरक्षिततेची भावना निर्माण करून त्याला आक्रमक केले जाते. त्याची रूढी परंपरा, रितीरिवाज, विधीनिषेध कडक करण्यात येतात. धार्मिक भावनांना समीकरण म्हणून वापरले जाते तेव्हा धर्माला या स्तरावर आणले जाते. या एकूण स्वरूपावरून हे स्पष्ट होते, की धर्मकेंद्री सत्तेत धर्म हा धार्मिकतेकडून धर्मांधतेकडे सरकलेला असतो. म्हणजेच धर्मकेंद्री सत्तेत धार्मिकता वाढवली जात नाही, तर धर्मांधता वाढवली जाते. धर्माला उन्मादक पातळीवर आणले जाते. या पार्श्वभूमीवर भारतीय धर्माचे स्वरूप पाहिले तर धर्माचे काही वेगळेच चित्र पाहावयास मिळते. भारतीय धर्म हा मुळात धर्मांध नसून तो धार्मिक आहे. धार्मिक असणे व धर्मांध असणे यात सहजच फरक करता येईल. भारतीय धर्म हा

सगुण साकार आणि निर्गुण निराकार या दोन्ही प्रकारच्या ईश्वरावर श्रद्धा ठेवायला सांगणारा आहे. निर्गुण निराकारमध्ये ईश्वर हा एक चैतन्याचा अंश असून संपूर्ण चराचरात व्यापलेला आहे, असे समजले जाते. यात सर्वांभूती परमेश्वर हे तत्त्व पाळले जात असल्याने यात मानवाला पापभिरू होण्याची शिकवण मिळते. त्याला सहिष्णू होण्याची शिकवण मिळते. सर्व प्राणिमात्रांवर दया दाखवणे हे तो यातून शिकतो. ईश्वराचे रूप निर्गुण, निराकार समजणाऱ्या धर्मातून धर्माचे असे स्वरूप सिद्ध होते. भारतीय धर्माचे आणखी एक स्वरूप आहे. या स्वरुपात ईश्वर हा निर्गुण, निराकार नसून तो सगुण साकार आहे. म्हणजे तो मानवासारखे शरीर धारण करणारा आहे. या धर्मात ईश्वर हा मानवासारखे शरीर धरण करणारा असल्याने त्याच्या ठायी मानवाचे सर्व विकार संभवतात. तो प्रेम करतो, तो कोपतो, तो आशीर्वाद देतो, तो पावतो, तो संकटकाळात भक्ताच्या मदतीला धावून जातो, तो प्रसाद खातो, विश्राम करतो, निद्रा घेतो. आता आता तर त्याला आजारही व्हायला लागले आहेत. या प्रकारचा धर्मातील ईश्वर हा बऱ्याचदा मानवाच्या पौराणिक इतिहासाने घडवला आहे. मानवातील आदर्श पुरुष, राजा, संत यातून काही काल्पनिक विस्तार होऊन हे स्वरूप निर्माण झाले आहे. या दोन्ही प्रकारांत भारतात धर्म धर्मांध होत नाही. मग धर्म हा धर्मांध केव्हा होतो ? जेव्हा तो राजकरणात समीकरण म्हणून वापरला जातो. राजकीय समीकरण झाल्यानंतरच त्याचे ध्रुवीकरण होते, तो अधिक संवेदनशील होतो. रितीरिवाज प्रथा-परंपरा व विधीनिषेध यांना कडक रूप प्राप्त होते, म्हणजेच तो पर्यायाने धर्मांध होतो.

**धर्मकेंद्री सत्तेचे मूळ**

भारतीय संस्कृती समताधिष्ठित आणि धर्मनिरपेक्ष असूनसुद्धा भारतात जर धर्मकेंद्री सत्ता अस्तित्वात येत असेल, तर त्यामागची कारणेही समजून घेतली पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीचा एक सिद्धांत सांगितला आहे. त्या सिद्धांताला क्रांति-प्रतिक्रांतीचा सिद्धांत म्हणतात. या सिद्धांताद्वारे त्यांनी असे संगितले आहे, की भारत हा मुळात समताधिष्ठित मूल्यांचा देश असून भारताच्या या समताधिष्ठित मूल्यांवर वारंवार विषमताधिष्ठित मूल्यांचे आक्रमण होत असते. मात्र भारतीय जनमानस विविध धर्म, पंथ व संप्रदायाची स्थापना करून आपली मुळातली समताधिष्ठित मूल्ये प्रस्थापित करित असतात. हाच तो क्रांती-प्रतिक्रांतीचा सिद्धांत होय. विशेष बाब म्हणजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचा हा सिद्धांत राजकीय सत्तांतरांच्या उदाहरणाद्वारेच समजावून सांगितला आहे. इ.स. पूर्व १९५ मध्ये तत्कालीन मौर्य सम्राट बृहदरथ यांची पुष्यमित्र शूंगाने हत्या करून मुळातल्या समताधिष्ठित मूल्य असणाऱ्या गणराज्यात मनुस्मृती, वर्णव्यवस्था व यज्ञसंस्कृती प्रस्थापित करून विषमता लादली व या देशात समताधिष्ठित आणि विषमताधिष्ठित मूल्यांमध्ये संघर्ष सुरू झाला. तेव्हापासून भारतात वारंवार भारताच्या समताधिष्ठित मूल्यांवर विषमताधिष्ठित मूल्यांचे आक्रमण होत असते व भारतीय जनमानस वारंवार हे आक्रमण पचवून किंवा पालटवून आपली मुळातली समताधिष्ठित मूल्ये प्रस्थापित करीत जातात. त्यामुळे भारतात धर्मकेंद्री सत्ता स्थापन होणे ही अनैसर्गिक बाब असली तरी



अनैतिहासिक बाब नाही. भारतात यासारखी वारंवार प्रतिक्रांती होतच असते. आज जरी भारतात धर्मकेंद्री सत्ता स्थापन झाली असली तरी आणि ती भारतीय चारित्र्याचा भाग नसली, तरी ती भारतातील प्रतिक्रांतीची प्रवृत्ती होय.

या प्रतिक्रांतीत विषमता अधिक प्रतिष्ठित केली जाते. विषमतेची तत्त्वे संवेदनशील केली जातात. विषमतेची तत्त्वे अधिक कडक, कर्मठ केली जातात. आज धर्मकेंद्री सत्तेत आपल्याला हीच वैशिष्ट्ये दिसत आहेत. आज धर्म राजकीय सत्तेसाठी जसजसा संघटित झाला, तसतशी त्याची प्रतिक्रिया म्हणून भारतातील सर्वच धर्म संघटित व्हायला लागले आहेत. हा धर्म जसजसा संवेदनशील व आक्रमक झाला आहे. त्याची प्रतिक्रिया म्हणून इतरही धर्म संवेदनशील व आक्रमक व्हायला लागले आहेत. धर्मांच्या संघटित होण्याने भारतात धार्मिक विषमता घट्ट व्हायला लागली आहे. एवढेच नाही, तर जेव्हा जेव्हा धर्म संघटित, संवेदनशील व आक्रमक होतो तेव्हा तेव्हा धार्मिक रितीरिवाज, प्रथा-परंपरा, विधीनिषेध यांना महत्त्व प्राप्त होते व ते मानवाच्या स्वातंत्र्याच्या, समतेच्या, बंधुतेच्या व न्यायाच्या आड यायला लागतात. धर्माच्या कल्पना पवित्र-अपवित्र, पाप-पुण्य यावर आधारित असल्याने त्या मानवाच्या विकासाच्या आड यायला लागतात. धर्म मानवाचा मानसिक, बौद्धिक व शारीरिक विकास थोपवून धरतो. धर्मकेंद्रे सत्ताधीश होऊन त्या मानवाचे शोषण करायला लागतात. मानवाच्या विकासावर, विद्वत्तेवर धार्मिकता प्रभाव गाजवायला लागते. मानवाच्या मानवतेवरच हे एकप्रकारचे आक्रमण असल्याने अल्पावधीतच या प्रतिक्रांतीच्या विरोधात जनमानस प्रबळ व्हायला लागते व ही प्रतिक्रांती मोडून काढली जाते.

•••

**(लेखक डॉ. बा.आं.म.विद्यापीठातील आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे संचालक असून फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# हिंदू कोड बिल म्हणजे महिला मुक्तीचा मार्ग



प्रो. भगवान माने

**हिंदू कोड बिलाला प्रचंड विरोध असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांचे शोषण होऊ नये, स्त्रियांना घटस्फोट, पोटगी, पुनर्विवाह, वडिलोपार्जित संपत्तीत वारसाहक्क, दत्तक घेणे इत्यादी स्त्रियांच्या महत्त्वपूर्ण हक्कांची हिंदू कोड बिलामध्ये तरतूद केली होती. हिंदू कोड बिल हा भारतातील स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा होता.**



प्राचीन धर्मग्रंथांत महिलांच्या स्वातंत्र्याच्या आणि मुक्तीच्या गाथा गायल्या जातात; परंतु यामध्ये कोणताही ठोस पुरावा दिसत नाही. कारण हिंदू धर्मग्रंथांतून स्त्रियांची विटंबना, अवहेलनाच अधिक केलेली आहे. मनुस्मृती ग्रंथातील कायद्याने स्त्रियांना गुलाम केले. त्यांना कोणताही अधिकार नव्हता. पतीच्या मृत्यूनंतर सती जाणे, विधवा विवाहास बंदी, बालविवाह अशा अन्यायी अत्याचाराला तोंड द्यावे लागत होते. स्त्रिया आणि पुरुष भेदभाव केला जात होता. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हिंदू समाजरचना श्रेणीबद्ध विषमतेवर आधारित होती आणि स्त्रिया गुलामगिरीत खितपत पडल्या होत्या. दास्य आणि गुलामगिरीचे कारण म्हणजे दैववादी जनतेने ईश्वरी कायद्याला समतेचे आव्हान दिले नव्हते; परंतु तथागत बुद्धांनी २५०० वर्षांपूर्वी बौद्ध धम्मात समतेचा पुरस्कार करून स्त्रियांची गुलामगिरी संपुष्टात आणली. स्त्रियांना भिक्खू संघात प्रवेश देऊन हजारो वर्षांची वैदिक संस्कृतीतील स्त्रियांची विषमता मोडीत काढली. बुद्धानंतर समतेची परंपरा महात्मा बसवेश्वर, संत तुकाराम, महात्मा जोतिबा फुलेंनी पुढे चालू ठेवली आणि त्याच विचारधारेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात स्त्रियांच्या समतेची तरतूद करून त्यांच्या मुक्तीचा मार्ग खुला केला आणि कायद्याचे प्रभावी अस्त्र वापरले. त्यासाठी संविधानाच्या प्रकरण तीनमधील मूलभूत हक्कांतील कलम १३, १४, १५, १६, १९ आणि २५ व्या कलमात तरतुदी केल्या आहेत. संविधानातील तरतुदीनुसार स्त्री समतेसाठी आणि त्यांच्या हक्कासाठी जर आपण संविधानात सुधारणा केली नाही, तर आपले संविधाननिर्मितीचे काम अपुरे राहील, अशी खंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होती. हिंदू कोड बिलाला प्रचंड विरोध असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांचे शोषण होऊ नये, स्त्रियांना घटस्फोट, पोटगी, पुनर्विवाह, वडिलोपार्जित संपत्तीत वारसाहक्क, दत्तक घेणे इत्यादी स्त्रियांच्या महत्त्वपूर्ण हक्कांची हिंदू कोड बिलामध्ये तरतूद केली होती. हिंदू कोड बिल हा भारतातील स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा होता.

संसदेतील बहुसंख्य हिंदू-पुराणवादी असलेल्या सदस्यांनी हिंदू कोड बिलाला विरोध केल्यामुळे हिंदू कोड बिल उशिरा मंजूर झाले.

हिंदू कोड बिलाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करता १९३७ च्या मालमत्तेच्या हक्काच्या कायद्यात स्त्रियांना मालमत्तेच्या हक्काचा अधिनियम केला होता; परंतु यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले.

१९४२ मध्ये तत्कालीन केंद्रीय कायदेमंडळाचे कायदामंत्री सर सुलतान अहमद यांनी उत्तराधिकार आणि हिंदू विवाह कायद्यासंबंधी मसुदे तयार केले होते. लोकमत अजमावण्यासाठी ते राजपत्रात प्रसिद्धही केले होते; परंतु स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळातील घडलेल्या घटनांमुळे ते गाळण्यात आले. त्यानंतर सरकारने हिंदू कायद्याच्या संहितीकरणासाठी १९४१ मध्ये सर बेनगल नरसिंहराव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने १९४४ मध्ये मसुदा तयार केला. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मसुद्यात फेरबदल केले. त्यामध्ये विवाह, घटस्फोट, पोटगी, हिंदू

पुरुष किंवा स्त्रीने मृत्यूपत्र केले नाही तर त्यासंबंधी मालमत्तेचा वारस आणि अल्पवयीन पालकत्व असे पाच भाग केले.

अत्यंत संवेदनशील, अवघड आणि कायद्याची कसोटी घेण्याचा प्रसंग असताना संविधान सभेत हिंदू कोड बिलाला मंजुरी घेण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे सोपविली होती. कारण संविधान सभेत सभागृहातील सदस्यांना कायदेशीर मुद्दे, विचारलेल्या प्रश्नांना योग्य उत्तरे आणि पुरावे सादर करण्याची क्षमता फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडेच होती, हे स्पष्ट होते. ११ एप्रिल १९४७ रोजी सुधारित हिंदू कोड बिलाच्या मसुद्यात मुख्य प्रतोद सत्यनारायण सिन्हा यांनी जोरदार विरोध केला होता. हिंदू कोड बिल मसुद्यात स्त्रियांना पित्याच्या मालमत्तेत समान वाटा मिळावा यासाठी अनेक सदस्यांचा विरोध होता. हिंदू कोड विधेयकाच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात हिंदू कोड बिलावर स्पष्टीकरण देताना म्हणतात, की ''हिंदू कायद्याच्या संहितीकरणामुळे आंतरजातीय विवाह वैध ठरले; परंतु प्रवर समितीत आपले शत्रू आणि पाठिराखे यांनी हातमिळवणी केल्यामुळे वडिलांच्या मालमत्तेत पाठीराखे मुलीला दिलेला वाटा मुलाला मिळणाऱ्या वाट्याइतकाच समान असावा.'' अशी तरतूद सुधारित विधेयकात करण्यात आली आहे. चर्चेत भाग घेताना हिंदू वक्ते डॉ. पट्टाभी सितारामय्या आणि डॉ. बी.व्ही. केसरकर यांनी हिंदूंची भूमिका मांडली होती.

**स्त्रीवारसदारांना मालमत्तेचा हक्क प्राप्त**

हे विधेयक पुनःस्थापित करण्याच्या हेतूसंबंधी सभागृहात डॉ. आंबेडकर म्हणाले, ''हिंदू कायद्यातील नियम संहिताबद्ध करण्याचा आमचा हेतू आहे. हिंदू कायद्यातील नियम उच्च न्यायालयाच्या आणि तिन्ही कौन्सिलच्या असंख्य किचकट निर्णयात विखुरले आहेत. या नियमामुळे सामान्य माणसाची स्थिती भांबावून टाकणारी आहे. अशी विचित्र स्थिती न्यायालयीन वादाला जन्म देते. हिंदू कोड विधेयक हे स्त्री-पुरुष मालमत्ता हक्क, मृत पावलेल्या, मरण पंथाला लागलेल्या मृत्यूविना माणसाच्या मालमत्तेत असलेल्या विविध वारसदारांच्या उत्तराधिकाऱ्यासंबंधी बदललेले स्वरूप तसेच पोटगी, विवाह, घटस्फोट, दत्तकग्रहण, अज्ञानवयता आणि पालकत्व तसेच वारसाप्राप्त संपत्तीच्या कायद्याच्या तरतुदी तसेच दयाभाव नियम स्वीकृत करते. त्यानुसार वारसदार ती मालमत्ता स्वतःची मालमत्ता म्हणून धारण करतो तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मृत हिंदूच्या उत्तराधिकारी बदलामध्ये सुधारित विधेयकात चार बदल केले आहेत. त्यामध्ये पहिली दुरुस्ती म्हणजे विधवा मुलीला पूर्वी मृत झालेल्या मुलांप्रमाणे तोच दर्जा दिलेला असावा. यामध्ये केलेला नवा बदल केला आहे तो मुलीपुरताच आहे आणि १९३७ च्या अधिनियमानुसार स्त्रीवारसदारांना मालमत्तेचा हक्क प्राप्त झालेला आहे.''

यावरून हिंदू कायद्यानुसार समाविष्ट असलेल्या विविध जातीधर्मातील स्त्रियांना मालमत्तेत मिळालेला वारसा हक्क ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली मोठी देणगी आहे. दुसरी दुरुस्ती वारसदारांमधील भेदभावासंबंधी असून तिसरी दुरुस्ती दायाभागानुसार आईच्या पसंतीक्रमापेक्षा बाप अगोदर स्त्री येते. म्हणून स्त्रीधन कायद्यात मूलभूत बदल केले आहेत आणि चौथी दुरुस्ती म्हणजे



मर्यादित मालमत्तेचेही पूर्ण मालमत्तेत किंवा पूर्ण इस्टेटमध्ये रुपांतरित केलेली आहे.

आज देशात हुंड्यासाठी अनेक स्त्रियांवर अन्याय, अत्याचार आणि जाळून टाकण्याचे अमानुष कृत्यांत अनेक स्त्रियांचा बळी घेतला जातो. यासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विधेयकात हुंडा प्रतिबंधक उपाययोजना केल्याची सभागृहाला माहिती देऊन हुंड्याच्या घातक पद्धतीसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'हा हुंडा किती लाजीरवाणी गोष्ट आहे, हे सर्व सभासदांना ठाऊक आहे.' उदा. ज्या मुली हुंड्याच्या किंवा स्त्रीधनाच्या किंवा देणगीच्या मार्गाने आपल्या वडिलांपासून मालमत्तेतील प्रचंड संपत्ती आणतात. तरीसुद्धा मुलींना तुच्छता आणि जुलूम, जाचाने वागविण्यात येते. माझ्या मनाप्रमाणे, हे विधेयक एक हितावह तरतूद आहे. मुलीला जी मालमत्ता तिच्या विवाहाप्रसंगी हुंडा म्हणून देण्यात येते, ती विश्वस्त मालमत्ता म्हणून वागविली जाईल, जिचा उपयोग त्या स्त्रीच्या हाती राहील आणि जेव्हा ती अठरा वर्षांची होईल तेव्हा त्या मालमत्तेवर हक्क सांगायला पात्र असेल. त्यामुळे तिच्या नवऱ्याला किंवा नवऱ्याच्या नातेवाईकांना त्या मालमत्तेबद्दल कोणतीही आस्था राहणार नाही किंवा मी मालमत्ता उधळून टाकण्याची आणि तिच्या उर्वरित आयुष्यात तिला असहाय्यक करण्याची कोणतीच संधी मिळणार नाही. याशिवाय व्यक्तीच्या निर्वाहाबद्दल, आश्रित व्यक्ती, एक पत्नीत्व घटस्फोटांचे सात आधार, दत्तक ग्रहण इत्यादींचा हिंदू कोड बिलात समावेश केला होता. मात्र हिंदू कोड बिलाला विरोध केला जात होता. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी २१ जुलै १९४८ रोजी प्रवट समितीला लिहिलेल्या पत्रात म्हणतात, की ''हिंदू कायद्याच्या संहितेबाबत संविधान सभेने केलेल्या प्रवट समितीत हे विधेयक मंजूर करू नये. कारण हिंदू कोड बिलाचा प्रश्न मतदारांपुढे ठेवलेला नाही आणि बहुसंख्य हिंदू लोकांचे मत विधेयकातील तरतुदींना अनुकूल होण्यासाठी प्रचारही केलेला नाही. हिंदूंच्या वैयक्तिक कायद्यात बदल करावयाचा असेल, तर तो कायदेमंडळाने करावा. सार्वत्रिक निवडणुकीत लोकमताचा विचार घेतल्याशिवाय आणि आपल्या पक्षाच्या (काँग्रेसच्या) जाहीरनाम्यात या विषयाचा समावेश केल्याशिवाय हा प्रश्न कायदेमंडळापुढे आणणे योग्य होणार नाही.'' यावरून असे स्पष्ट होते, की हिंदू कोड बिल हिंदुत्ववादी विचारधारा आणि काँग्रेसच्या राजकारणात गटांगळ्या खात होते. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदू कोड बिलाद्वारे स्त्रियांना मिळणाऱ्या

संपत्तीच्या समान हक्कासाठी आग्रही भूमिका घेत होते.

**संविधान समितीपुढे हिंदू कोडबील**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रारूपित केलेले हिंदू कोड बिल ९ एप्रिल १९४८ रोजी संविधान समितीत सादर केले होते. त्यास कायदेमंडळाने संमती दिली होती. या निवड समितीत के.व्ही. भांडारकर, बी.एच. नानावटी, जी.आर. राजगोपाल, एस.व्ही. गुप्ता यांचा समावेश होता.

हिंदू कोड बिलाबद्दल हंसा मेहता म्हणाल्या, हे विधेयक क्रांतिकारक असून मंजूर झाल्यास देशाच्या सामाजिक इतिहासातील तो महत्त्वाचा टप्पा ठरेल. हिंदू कोड बिलाच्या बाजूने आणि विरोधी विचार मांडणारे अनेक सदस्य होते. पंडित लक्ष्मीकांत मैत्रा हिंदू कोड बिलाला हिंदू कोड विधेयक म्हणजे विस्मृती होय असे म्हणतात, तर हरिभाऊ कामथ यांनी हिंदू कोड विधेयक भीमस्मृती होय असे म्हटले. मुस्लिम लीगचे नझिरुद्दीन अहमद म्हणाले, 'कोणत्याही धर्माच्या लोकांना लागू असलेल्या वैयक्तिक कायद्यात बदल करण्याचा अधिकार सरकारला नाही. हिंदू कोड बिलाचा आणि भारतीय संविधानाचा परस्परसंबंध आहे.' या अनुषंगाने के. संथनम म्हणाले, हिंदू कोड बिल भारतीय संविधानाला पूरक आहे आणि ज्यांनी संविधान मंजूर केले त्यांनीच कायदेमंडळ म्हणून काम करताना विधेयकाचे कायद्यात रुपांतर केले तर ते उचितच ठरेल.

हिंदू कोड बिलावर संविधान सभेत चर्चा होत असताना १९४९ मध्ये काही सदस्यांनी हा कायदा फक्त हिंदूंनाच का लागू करता? समान नागरी कायदा लागू करा, यासंबंधी सभागृहात विचार मांडले होते. या संदर्भात पाटस्कर म्हणाले, "फक्त हिंदूंच्या कायद्याची संहिता बनविण्यात समाधान न मानता संविधानातील ४४ व्या कलमानुसार सर्वधर्माच्या नागरिकांना लागू करता येईल, असा समान नागरी कायदा करावा." पाटस्करांप्रमाणे बी.सी. सरवटे म्हणाले, "हिंदू कोड बील फक्त हिंदूंना लागू न करता मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, ज्यू इत्यादी धर्माच्या नागरिकांनाही समान नागरी कायदा लागू करावा. हिंदू कोड बिलामध्ये सुधारणा करणाऱ्या सदस्यांची चार गटांत विभागणी झाली होती, असे सेठ गोविंद दास म्हणतात." याचा अर्थ हिंदू कोड बिलाला पाठिंबा देणारे तसेच विरोधकसुद्धा होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदेतील कायदेमंत्री म्हणून कार्य**

भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भरीव कार्य केले. स्वातंत्र्यानंतर भारतात असणाऱ्या विविध कायद्यांत सुधारणा करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान महत्त्वाचे आहे. औद्योगिक कायदा १९४७ आणि कारखाने अधिनियम १९४८ या जुन्या कायद्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुधारणा केल्या. कायदामंत्री असताना अनेक विधेयके मंजूर केली. त्यापैकी हिंदू कोड बिल विशेष उल्लेखनीय आणि वादग्रस्त ठरले. तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुख्य उद्देश संविधानात्मक मूल्ये आणि तत्त्वांशी सुसंगत कायदे निर्माण करावेत, असा होता. हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ४ वर्षे १ महिना आणि २६ दिवस लागले.

१४ फेब्रुवारी १९४९ रोजी हिंदू कोड बिलाचा मसुदा संसदेत



मांडला होता. त्यामध्ये हिंदू विवाह अधिनियम, विशेष विवाह अधिनियम, दत्तक घेणे, दत्तक ग्रहण, अल्पायू संरक्षण अधिनियम, हिंदू वारसदार अधिनियम, दुर्बल आणि साधनहीन कुटुंबातील सदस्य यांचे भरणपोषण अधिनियम, वारसदार अधिनियम आणि हिंदू विधवा पुनर्विवाह अधिकार अधिनियमांचा समावेश होता.

**हिंदू कोड बिलाला विरोध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना धमक्या**

हिंदू कोड बिलाला सनातनी लोकांनी कडवा विरोध केला होता. डॉ. आंबेडकर यांच्या जीविताला धमक्या देणारी पत्रे पाठविण्यात आली होती. संसदेत स्वामी करपात्रजी यांनी कणखर विरोध केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात हिंदू कोड बिल विरोधी समिती स्थापन करून दबाव गट निर्माण केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिल्ली येथील १ हार्डिंग्ज ॲव्हेन्यू या निवासस्थानावर दिल्लीतील अडाणी स्त्रियांना पगार देऊन मोर्चा काढला होता. विरोधकांच्या मते, या बिलामुळे हिंदू समाजाची अनेक भागात फाळणी होईल आणि हिंदू धर्म नष्ट होईल. तसेच दिल्ली येथून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिकाने असे म्हटले होते, की हिंदू कोड बिल काळे कोड बिल असून हिंदू लोकांच्या विरुद्ध सुडाचे हत्यार आहे आणि डॉ. आंबेडकर यांनी हिंदूविरोधी सक्रिय भूमिका घेतली आहे. अशा प्रकारे आंदोलने, निदर्शने, संसदेत आणि संसदेबाहेर गदारोळ चालू असताना पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी हिंदू कोड बिल आणि ओबीसींच्या आरक्षणाच्या तरतुदीवरही कारवाई केली नाही म्हणून ११ ऑक्टोबर १९५१ रोजी तत्त्वनिष्ठ, संविधानतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केंद्रीय कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला आणि १९५२ मध्ये पहिल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाल्यानंतर हिंदू कोड बिल संसदेत मंजूर करण्यात आले. तरीसुद्धा हिंदू कोड बिलाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांच्या अथक विद्वतेने हा कायदा निर्माण झाला. सम्यक क्रांतीसाठी स्त्रियांनी सक्रिय सहभाग घ्यावा, ही कायदानिर्मितीमागील भूमिका होती. त्यासाठी त्यांनी स्त्रियांशीसंबंधित कायद्यात सुधारणा करण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे स्त्रियांना सर्व क्षेत्रांत भाग घेऊन आणि वडिलांच्या संपत्तीत समान वाटा मिळून त्यांना प्रगती करता आली. त्यामुळे स्त्रियांना गुलागिरीतून मुक्तीचा मार्ग मिळाला. •••

**(लेखक शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील राज्यशास्त्र विभागाचे माजी प्रोफेसर आहेत.)**

# एक व्यक्ती/एक मत/एक मूल्य



बी.जी. वाघ

**आपल्याला घटनेने एक मत, एक मूल्य दिलेले आहे. त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी केलेला संघर्ष अभूतपूर्वच होता. प्रौढ मतदानाचा सार्वत्रिक अधिकार संपत्ती किंवा शिक्षणाशी न जोडता जे कधी शाळेत गेले नाहीत, ज्यांची इंचभर जमीन मालकीची नाही अशा लोकांना तो देताना डॉ. आंबेडकरांनी देशातील गरिबीत, अज्ञानात खितपत पडलेल्या कोट्यवधी भारतीयांना अमूल्य भेटच दिली होती. मतदानाचा अधिकार हा घटनात्मक अधिकार असून, तो निरक्षर व संपत्तीविहीन जनतेला नाकारणे एक विकृती समजावी लागेल.**

भारताच्या स्वातंत्र्याकडून लोकशाहीचा प्रवास अत्यंत कष्टदायक होता, आजही तो आहे. भारतीय लोकांची अंगभूत मानसिकता (Innate nature of Indians : James Mill) त्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. युरोपातही साम्राज्यवादी तत्त्वज्ञान व लोकशाही यांच्यातील संघर्ष तीव्र होता. युरोपियन उदारमतवाद ही लोकशाही, स्वातंत्र्य, समता आदी मूल्यांसाठी चाललेली राजकीय चळवळ होती.

प्राध्यापक लास्की, ग्रीन आदी या चळवळीचे पुरस्कर्ते होते. डॉ. आंबेडकरांवर युरोपियन उदारमतवादाचा व त्या परंपरेचा प्रभाव होता; परंतु भारतातील सरंजामशाही मनोवृत्तीशी आणि येथील हिंदू मानसिकतेशी लढणे तितके सोपे नव्हते. नेहरूंनी म्हटले होते, की इंग्रजांनी देशाला निव्वळ गुलामच केले नाही, तर गुलामीची मानसिकताही निर्माण केली. या मानसिकतेतून भारतीयांची सुटका करण्याचा प्रयत्न महात्मा गांधींनी केला. ज्या अनैतिक सत्ता माणसाच्या मनावर राज्य करतात, त्यांचा प्रतिकार करणे किंवा नाकारणे म्हणजेच मनाने स्वतंत्र होणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'गुलामांना गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे ते बंड करून उठतील.' ब्रिटिशांनी या देशावर दीडशे वर्षे राज्य केले, कारण त्याआधीही तो मनाने गुलामच झालेला होता. हेगेलची मीमांसा फार महत्त्वाची आहे. तो म्हणतो, "India was a land that had remained stationary and fixed. The distinctions imposed by caste had condemned the Indian people to the most degrading spiritual serfdom.'

**आध्यात्मिक गुलामगिरी हे भारताचे वैशिष्ट्य**

ही आध्यात्मिक गुलामगिरी हे भारताचे वैशिष्ट्य होते. जगाला जी गुलामगिरी दिसत होती ती भारतीयांना मात्र दिसत नव्हती. भारतातील फार थोड्या विचारवंतांनी या गुलामगिरीचे अस्तित्व मान्य केले आहे. ते काम प्रथम केले महात्मा फुलेंनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून. स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव नसलेला हा समाज आहे. त्यामुळे त्याला राजकीय भवितव्य नाही, असेही हेगेलने म्हटले होते. भारतीयांची जीवनाविषयीची तत्त्वे वा ध्येयेदेखील संदिग्ध किंवा गोंधळलेली (Confused dreams) आहेत. पाश्चात्त्य संस्कृतीशी भारतीयांची तुलना अतिशयोक्त किंवा पूर्वग्रहदूषित असू शकते. त्यातून भारतीय घटनात्मक लोकशाहीपुढील आव्हाने किती कठीण होती, याचा अंदाज येतो. अशी आव्हाने सर्वच समाजव्यवस्थांपुढे असतात. ती नीट सोडवता आली नाहीत, तर लोकशाहीचा प्रवास लोकनियुक्त हुकूमशाहीकडे होण्यास वेळ लागत नाही. नेहरूंनी आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'मध्ये भारताच्या बहुविध संस्कृतींचा, सम्राट अशोक, बुद्ध यांसारख्या ऐतिहासिक पुरुषांचा संदर्भ देऊन भारतामध्ये बदलाची आश्चर्यकारक क्षमता आहे, हे दाखवण्याचा प्रयत्न केला. हे पुस्तक एक प्रकारे भारतीय संस्कृतीची महत्ता सांगणारे होते; परंतु त्या वैभवशाली संस्कृतीचा लोप फार पूर्वीच झालेला होता. आता होती ती ब्राह्मणी संस्कृती, जिने सर्व प्रकारच्या सामाजिक उत्तरदायित्वालाच नष्ट करून टाकले होते. अज्ञान, अंधश्रद्धा आणि मिथकीय कल्पनांनाच लोक आपला धर्म किंवा संस्कृती मानत होते आणि एक वर्ग त्यालाच राष्ट्रवादाचे रूप देत होता. भारतात सामाजिक लोकशाहीचा पूर्णत: अभाव होता. इंग्रजी शासनव्यवस्था (Rule of law), स्वातंत्र्य चळवळ, बहुजनांसाठी उघडलेले शिक्षणाचे दरवाजे यामुळे सामाजिक जागृती आणि राजकीय अस्वस्थता निश्चितच वाढली होती. स्वातंत्र्य नेमके कोणासाठी, कोणाचे असे मूलभूत प्रश्न डॉ. आंबेडकरांनी विचारले होते. भारतातील बहुसंख्य दलित, मागासलेल्या, आदिवासी, भटक्या-विमुक्तांसाठी, शेतकरी, शेतमजूर, श्रमिक आणि वंचितांसाठी, त्यांच्या स्वातंत्र्यासाठी कोणीतरी पहिल्यांदाच प्रश्न विचारत होते. महात्मा गांधीजींच्या अंत्योदयाच्या चळवळीत आध्यात्मिकता होती. त्यामागे सामाजिक क्रांतिविज्ञान नव्हते. बहुसंख्याकांच्या मर्जीवर स्वातंत्र्य मिळत नसते. त्यासाठी संघर्षच करावा लागतो. डॉ. आंबेडकरांची भूमिका अत्यंत तर्कशुद्ध व म्हणूनच विद्रोही होती. घटनेचा मुख्य उद्देश नेहरूंनी आपल्या भाषणात घटना समितीतील उद्दिष्टांच्या ठरावात स्पष्ट केला होता. डॉ. आंबेडकरांनी 'रक्तशून्य क्रांती' अशीच लोकशाहीची व्याख्या केली आहे. त्यासाठी 'घटना' हेच एक मोठे शस्त्र होते. सार्वत्रिक मतदानाच्या अधिकाराद्वारे सत्ता सामान्य माणसांच्या हातात जाणार होती. त्यासाठी डॉ. आंबेडकर आग्रही होते. साऊथबरो कमिटीपुढे साक्ष देताना भारताच्या घटनात्मक इतिहासात त्यांनी सार्वत्रिक मतदानाच्या अधिकाराची सर्वप्रथम मागणी केली होती. त्यांच्या राजकीय जीवनाची ती सुरुवात होती. त्यावेळी ते विद्यार्थीदशेतच होते, असे म्हणावे लागेल. भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय ध्येयांबाबत त्यांची भूमिका सुरुवातीपासूनच स्पष्ट

होती. कायदा करण्याचा अधिकार ज्या वर्गाच्या हातात असतो, तोच खरा सत्ताधारी असतो.

**स्वातंत्र्याचा अर्थच त्यांना माहीत नव्हता**

दुर्दैवाने हा वर्ग कधीही बदलला नाही. अनेक राजसत्ता आल्या आणि गेल्या; परंतु हा वर्ग कायमच सत्तेत होता. त्याने कधीही सत्ता खाली झिरपू दिली नाही. हे चक्र आता उलटे फिरवणे आवश्यक होते. शूद्राहाती सत्ता जाणे आवश्यक होते. इतकी स्पष्ट भूमिका भारतातील कोणत्याही राजकीय पुढाऱ्याकडे नव्हती. अपवाद फक्त डॉ. आंबेडकर यांचा. सत्ता हाती आल्याशिवाय येथील शूद्र, अतिशूद्र मुक्त होणार नव्हते. सामाजिक व आर्थिक दास्याप्रमाणे धार्मिक व आध्यात्मिक हुकूमशाहीचेही ते गुलाम होते. स्वातंत्र्याचा अर्थच त्यांना माहीत नव्हता. भारतात लोकशाही नव्हती, तशी ती जगातही नव्हती. पहिल्या महायुद्धानंतरच निरनिराळ्या देशांत लोकशाहीचे प्रयोग सुरू झाले; परंतु ते सर्व अपयशी ठरले. कारण लोकांनी लोकशाहीऐवजी सामर्थ्यशाली सरकारे स्वीकारली. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर, लोकांना स्वातंत्र्यापेक्षा सुरक्षितता अधिक महत्त्वाची वाटली. चीन, रशिया आदी कम्युनिस्ट देशांतील हुकूमशाही ही विचारातून आलेल्या व्यवस्थेची हुकूमशाही असते, ती नष्ट होत नाही. कारण लोक स्वातंत्र्यासाठी संघर्ष करत नाहीत. त्यांनी आपल्या परतीचे दोर कापून टाकलेले असतात. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. भारताचा इतिहास बदलण्याचे व त्याचे भवितव्य घडवण्याचे काम घटनेने केले. आज भारतात कुठलाही असा प्रश्न नाही, की जो घटना सोडवू शकत नाही. जनतेच्या कल्याणाची हमी घटनेने घेतली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक व्यवस्थेत लोकशाहीचे वारे वाहू लागले. त्याचे कारण फॅसिझमचे उग्र स्वरूप जगाच्या लक्षात आले. आपली घटना अभ्यासताना तत्कालीन व्यवस्था, विचारधारा यांचे आकलन होणे आवश्यक असते. ॲटलीने नेहरूंना लिहिले होते, की 'भारतासाठी लोकशाही ही परकीय (alien) गोष्ट आहे. त्याऐवजी नेहरूंनी ब्रिटनप्रमाणे नियंत्रित राजेशाही स्वीकारावी.' परंतु नेहरूंनी पूर्ण स्वातंत्र्याची मागणी १९२९ सालीच लाहोर अधिवेशनात केली होती. ॲटलीने असे म्हटले होते, की भारतीय लोकांची प्रवृत्ती राजेशाहीला अनुकूल आहे आणि ते ऐतिहासिकदृष्ट्या खरेही आहे. फिलिप्स स्पॅट या ब्रिटिश विचारवंताने लिहिले, "The Indian constitution is in it's main outlined a liberal constitution to be imposed upon a society which is not a liberal society and can't be expected to make such a constitutional work.'

**पारंपरिक मतदार आजही आध्यात्मिक गुलामगिरीतून मुक्त झालेला नाही**

भारतीय समाजव्यवस्था एखाद्या बंदिस्त मनोऱ्यासारखी आहे. ती विषमतेवर (graded inequality) आधारित आहे, असे डॉ. आंबेडकर स्वत:च म्हणाले होते. हिंदू मानसिकता आणि व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न ते १९१९ पासूनच करत होते. सर्वांना समान मतदानाचा अधिकार ही त्यांची राजकीय जीवनातील पहिली मागणी होती. या अधिकाराच्या साहाय्याने सत्तेचे शांततेने हस्तांतरण करणे शक्य आहे, असे त्यांना वाटत होते. लोक राजकीयदृष्ट्या जागरूक होतील, शिकतील, संघटित होतील व आपल्या मूलभूत अधिकारांसाठी संघर्ष करतील, अशी त्यांना खात्री होती. हा आशावाद भारतीय राज्यघटनेत सगळीकडे भरून आहे. घटनेला विरोध करणाऱ्या ज्या शक्ती होत्या, त्यांचा मूलत: स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांनाच विरोध होता. त्यावेळी त्यांचा विरोध तीव्र होता. कारण हिंदू जनमत त्यांच्यामागे नव्हते. आज ते अधिक शक्तिमान झाले आहेत. त्यामुळे त्यांचा धोका वाढतो आहे. तो घटना बदलण्याचे प्रयत्न करतोच आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे येथील पारंपरिक मतदार आजही आध्यात्मिक गुलामगिरीतून मुक्त झालेला नाही. मुक्त मनच स्वातंत्र्याची परिभाषा समजू शकते. मुक्त विचार आणि मुक्त अभिव्यक्ती याची हमी घटनेने दिली आहे. दुसऱ्याचे हक्क आणि अधिकार हिरावून घेणे म्हणजे एक चोरीच असते. धर्म, जाती, संस्कृती, परंपरा, अस्मिता आदी प्रकारांनी प्रस्थापित वर्ग अशी चोरी नित्य करत असतो. अशा अनैतिक शक्तींना प्रतिकार करण्याची व्यक्तीची क्षमता म्हणजेच खरे स्वातंत्र्य. असे स्वातंत्र्य आपल्याला घटनेने दिले आहे; परंतु भारतातील सामान्य माणसांना घटनेला अभिप्रेत असलेले आर्थिक, सामाजिक, राजकीय वा धार्मिक स्वातंत्र्य मिळाले का, असा प्रश्न पडतो. त्याचे एकमेव कारण म्हणजे, भारतात सेक्युलॅरिझमची मुळे रुजू नयेत अशा पद्धतीने स्वातंत्र्यानंतर आलेल्या प्रत्येक सरकारने काम केले आहे. जोपर्यंत सरकार, प्रशासन, व्यवस्था, शिक्षणव्यवस्था पूर्णत: निधर्मी होत नाही, तोपर्यंत धर्मवादी आपल्या हिंदुत्ववादी राजकारणासाठी घटनेला विरोध करतच राहतील.

पंतप्रधान नेहरू हेच काँग्रेसमधील एकमेव कट्टर सेक्युलर म्हणता येतील. काँग्रेस ही मनाने नेहमीच हिंदुत्ववादी राहिली आहे. त्यामुळे हिंदूराष्ट्रवाद्यांशी ते लढूच शकत नाहीत. नेहरूंनी 'आपल्या डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकात स्पष्टपणे लिहिले आहे : "Our major difficulties in India are due to the fact that we consider our problems, economic, social, industrial, agricultural, communal, Indian states- within the framework of existing conditions, within that framework and retaining the privileges and special status that are part of it. They become impossible of solution.'

**सर्वांना मतदानाचा अधिकार देण्यास त्यांचा विरोध**

सामाजिक, आर्थिक रचना न बदलता किंवा हितसंबंधी वर्गाला न दुखावता व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणे शक्य नाही, याची जाणीव नेहरू, गांधी, आंबेडकरांना प्रकर्षाने होती; परंतु त्यांच्यातील वैचारिक मतभेद मूलभूत स्वरूपाचे होते. गांधी, नेहरूंमध्ये वैचारिकदृष्ट्या अनुल्लंघनीय दरी होती. महात्मा गांधींनीच आपल्या पत्रात नेहरूंना तसे म्हटले होते. पाश्चात्त्य औद्योगिक संस्कृती व मूल्ये यांना गांधीजींचा पराकोटीचा विरोध होता. गांधीजींचे तत्त्वज्ञान म्हणजे एक प्रकारचा देशीवादच होता. जे काही चांगले आहे ते भारतीयच, मग ती धर्म-संस्कृती किंवा समाजव्यवस्था असो. त्यामुळे व्यक्ती नव्हे, तर गाव हाच घटनेचा केंद्रबिंदू असला पाहिजे, असा गांधीजींचा आग्रह होता. भारतातील परिस्थिती अत्यंत खडतर होती. तिची तुलना एम. सी. सेटलवाड म्हणतात त्याप्रमाणे इतर कुठल्याही देशाशी करता

येत नव्हती. त्यामुळे घटनानिर्मितीची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होती. घटना समितीची रचना, कार्यपद्धती, कृती याविषयी पूर्वीचा अनुभव कोणालाही नव्हता. त्यामुळे घटनानिर्मितीची प्रक्रिया म्हणजे गुंतागुंतीच्या राज्य व केंद्र संबंधांपासून ते देशातील भुकेल्या जनतेच्या आकांक्षांपर्यंतचा प्रवास होता. त्यामुळे तज्ज्ञ किंवा घटनाशास्त्राचा अनुभव असलेल्या विद्वानांना घटना समितीत कसे सामावून घ्यायचे, हादेखील प्रश्न होता. डॉ. आंबेडकर हे तर त्यातील सगळ्यांत विद्वान पुरुष. ते तर विरोधी पक्षात होते. त्यांनी घटना समितीत येऊ नये म्हणून काँग्रेसने दरवाजेच बंद करून ठेवले होते. केंब्रिजचे प्रख्यात विचारवंत आयव्हर जेनिंग हे जगातील पट्टीचे घटनातज्ज्ञ समजले जात. सिलोन आणि पाकिस्तानच्या घटनानिर्मितीत त्यांचा हात होता. घटनेत स्थानिक मुद्यांना अधिक महत्त्व द्यावे, असे त्यांचे मत होते. त्यांनी बेथॅमवर हल्ला करताना म्हटले की, त्याने वेन्समिन्स्टरमध्ये बसून घटनेची तत्त्वे निश्‍चित केली आणि चीन-जपानसारख्या देशांत वापरली. रूसो जीनिव्हात राहिला व त्याने पोलंडची घटना लिहिली. त्या देशाला त्याने एकदाही भेट दिलेली नव्हती. जेनिंग हे नव्यानेच स्वतंत्र झालेल्या देशाची घटना लिहीत होते; परंतु भारतातील सामाजिक, सांस्कृतिक स्थितीची त्यांना थोडीही जाण नव्हती. भारतातील निरक्षरता, अनेक धर्म, वर्ण, वर्गव्यवस्था यांविषयी ते अनभिज्ञ होते. त्याच वेळी सार्वत्रिक मतदानाच्या अधिकारालाही त्यांचा विरोध होता. लोकांना असा अधिकार देणे लोकशाहीसाठी धोक्याचे आहे, असे त्यांचे मत होते. थोड्या लोकांना मतदानाचा अधिकार आणि इतरांना प्रतिनिधित्व अशी त्यांची कल्पना होती. ब्रिटनमध्ये सर्वांनाच मतदानाचा अधिकार नव्हता. ब्रिटिश विचारवंतांत आणि मुत्सद्यांमध्येही असाच विचारप्रवाह होता. कोणालाही मतदानाचा अधिकार न देताही देशाच्या स्वातंत्र्याला व सार्वभौमत्वाला कुठलीही हानी पोहोचत नाही, असे त्याचे मत होते. Report on Indian constituional reforms of १९१८ म्हणतो की, भारतीय लोक गरीब आणि निरक्षर आहेत. मुख्य म्हणजे ते एकसंध नाहीत. त्यांना स्वत:चे सरकार भविष्यात कधीतरी देता येईल; परंतु ती वेळ आताची नाही. त्यांची सांस्कृतिक पातळी उंचावलेली नाही आणि शिक्षणाने त्यांची प्रगती फक्त टप्प्याटप्प्याने करता येईल. भारतात ती राजकीय संस्कृती अस्तित्वात नाही, जी प्रथा-परंपरा, ऐतिहासिक संकेत यांनी विकसित होते. ती परंपरा ब्रिटनला आहे. १९३० साली कमिटीने मतदानाची व्याप्ती वाढवता येईल, असे सुचवले; परंतु त्यासाठी साक्षरतेची अट घातली. या सर्व विचारांमागे त्यांची वसाहतिक मानसिकता होती. त्यामुळे सर्वांना मतदानाचा अधिकार देण्यास त्यांचा विरोध होता. त्याऐवजी सत्तेच्या अंतर्गत विभाजनास त्यांची मान्यता होती. काँग्रेसचा मुख्य हेतू स्वातंत्र्य किंवा सत्ताप्राप्ती हाच होता. कुठल्याही वर्गीय, वर्णीय रचनेत बदल न करता उच्चवर्णियांचे स्वातंत्र्य हाच त्यांचा हेतू होता, हे डॉ. आंबेडकर चांगले ओळखून होते. महात्मा गांधींचे काँग्रेसमध्ये आगमन झाल्यानंतर सामाजिक व आर्थिक प्रश्नांची चर्चा मोकळेपणाने होऊ लागली. त्यामागे रशियन राज्यक्रांतीचा प्रभाव होताच. नेहरू हे मूलत: फेबियन समाजवादी होते. डॉ.आंबेडकरांप्रमाणेच ते कट्टर लोकशाहीवादी, विज्ञाननिष्ठ मानवतावादी होते. फॅसिझमला विरोध हा त्यांच्यातील समान धागा होता. वंशवाद, जातिवाद, धर्मवाद ही येथील फॅसिझमची रूपे होती. काँग्रेसची विचारधारा अधिक प्रागतिक होण्यामागे काही राजकीय अपरिहार्यताही होती. स्वातंत्र्यलढ्यात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग असावा, हादेखील हेतू होता. १९१६ मध्ये काँग्रेस- मुस्लिम लीगअंतर्गत झालेल्या करारात जास्तीत जास्त लोकांना मतदानाचा अधिकार असावा, असे म्हटले होते. नेहरू रिपोर्टने (१९२८) त्याला संमती दिली होती. त्यामुळे लोकांना राजकीय शिक्षण देणे शक्य होते. मतदानाचा अधिकार फक्त सुशिक्षितांनाच द्यावा, अशी मागणीही सत्ताधारी वर्तुळातून होत होती; परंतु मतदानाचा अधिकार येथील दलित, वंचित, शोषित, शेतकरी, शेतमजूर वा कामगारवर्ग यांना मिळाल्याशिवाय स्वातंत्र्याला काही अर्थ उरत नव्हता. साऊथबरो कमिटीपुढे साक्ष देताना डॉ. आंबेडकर म्हणाले : 'The success of democracy depends on the response of voters to the opportunities given to them. But conversely the opportunities must be given in order to call forth that response. The excercise of popular govt is itself an education. Enfranchismnent itself may be precisely the stimulus needed to awaken the interest.'

लोकशाही मूल्यांना बळकटी आणण्यासाठी आणि जनतेत ती खोलवर रुजवण्यासाठी मतदानाचा अधिकार सार्वत्रिक हवाच. त्याशिवाय राजकीय सत्तेचे हस्तांतरणही शक्य नव्हते. त्याशिवाय सत्ता कायदेशीर होत नाही. लोकांची संमती हाच कायद्याचा आणि शासनसत्तेचा मूलाधार असतो. अर्थात, सत्ताधाऱ्यांनी ही संमती वैध की अवैध मार्गाने मिळवली, यावरून जनतेला खरे स्वातंत्र्य मिळाले की नाही हे कळत असते. अशा तऱ्हेने भारताच्या लोकशाहीची, स्वातंत्र्याची स्वतंत्र समीक्षा करावी लागेल. आपल्याला घटनेने एक मत, एक मूल्य दिलेले आहे. त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी केलेला संघर्ष अभूतपूर्वच होता. प्रौढ मतदानाचा सार्वत्रिक अधिकार संपत्ती किंवा शिक्षणाशी न जोडता जे कधी शाळेत गेले नाहीत, ज्यांची इंचभर जमीन मालकीची नाही अशा लोकांना तो देताना डॉ. आंबेडकरांनी देशातील गरिबीत, अज्ञानात खितपत पडलेल्या कोट्यवधी भारतीयांना अमूल्य भेटच दिली होती. मतदानाचा अधिकार हा घटनात्मक अधिकार असून, तो निरक्षर व संपत्तीविहीन जनतेला नाकारणे एक विकृती समजावी लागेल, असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

'To limit the surffrage on account of illiteracy was a kind of perversity because literacy had been denied to a segment of the population and now that segment was denied suffrage becuase it was illiterate.'

**ही तर सामाजिक, राजकीय विकृतीच म्हणावी लागेल**

आधी एका वर्गाला शिक्षण नाकारायचे आणि पुन्हा त्यांना अडाणी म्हणून मतदानाचा अधिकारही नाकारायचा, ही तर सामाजिक, राजकीय विकृतीच म्हणावी लागेल. इतका सूक्ष्म मूल्यविवेक आणि अत्यंत सखोल संवेदनशील समाजनिष्ठा फक्त डॉ. आंबेडकरांतच होती. कारण एक अन्यायी व अत्याचारी व्यवस्थेचा ते लहानपणापासूनच सामना करत आले होते. हजारो वर्षांच्या काळोखाला भेदून ते (उर्वरित पान ३७ वर...)

# भारतीय संशोधनाचे दारिद्र्य



प्रा. दिलीप चव्हाण

**संशोधकांची संख्या कमी करून गुणवत्तेची हमी मिळवता येणार नाही! ते आग सोमश्वरी अन् बंब रामेश्वरी ठरेल! त्यासाठी आवश्यक ती पावले उचलणे आवश्यक असते! विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविणे आवश्यक आहे. अनेक विद्यापीठांमध्ये पीएच.डी. करणाऱ्या संशोधकांना संशोधन केंद्रात बसण्यासाठी पुरेशा खुर्च्यासुद्धा नाहीत, ही आज वस्तुस्थिती आहे.**

भारत स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत आहे, ही आनंदाची बाब आहे. पन्नास वर्षांपूर्वी जेव्हा स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव (१९७२) साजरा होत होता, तेव्हा भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या २५ वर्षांमधील उपलब्धींविषयी बरेच प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षातदेखील (१९९७) एक चिकित्सक आढावा या उपलब्धी आणि मर्यादांविषयी घेण्यात आला होता.



अमर्त्य सेन आणि जॉं ड्रेझ या अभ्यासकांनी इंडिया : सोशल अपॉर्च्युनिटी अँड इकॉनॉमिक इनइक्वालिटी हे पुस्तक लिहून भारतीय स्वातंत्र्याच्या पहिल्या पन्नास वर्षांमधील उपलब्धी आणि मर्यादांचे विवेचन करणारे पुस्तक लिहिले होते. याच सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त इंग्लंडमधील 'नेचर' या प्रतिष्ठित नियतकालिकाने भारतीय स्वातंत्र्याच्या अर्धशतकी वाटचालीवर एक टिपण प्रसिद्ध केले होते. या टिपणावर भारतीय संशोधन हे कसे मागासलेले आहे, याची चर्चा करण्यात आली होती.

भारत स्वातंत्र्याचा पन्नासावा वर्धापनदिन साजरा करत असताना, स्वातंत्र्योत्तर काळातीलपन्नास वर्षांत एकाही भारतीय शास्त्रज्ञाला नोबेल पारितोषिक का मिळाले नाही, असा प्रश्न अनेकजण विचारीत होते. प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर तेव्हा म्हणाले होते, राष्ट्रीय प्रयोगशाळा किंवा विद्यापीठांमधील आमची प्रणाली नेतृत्व, नवकल्पना किंवा प्रेरणा यांना परावृत्त करते.

बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे संचालक गोविंदराजन पद्मनाभन यासंदर्भात म्हणाले, दारिद्र्य निर्मूलन किंवा लोकसंख्यावाढ नियंत्रित करण्यात संशोधन अयशस्वी ठरले. विज्ञानाचे इतिहासकार राजेश कोचर यांचे मत असे आहे, की भारतीय विज्ञान अधिक प्रभाव निर्माण करण्यात अयशस्वी ठरले आहे. त्यांच्या मते, स्वतंत्र भारतातील बहुतेक संशोधन परदेशात वैयक्तिक ओळख मिळवण्याकडे वळविले गेले होते, अशी चर्चा 'नेचर'च्या त्या अंकात झाली.

त्यानंतर खूप मोठा असा बदल मागील २५ वर्षांमध्ये झाला नाही. भारतीय विद्यापीठे जागतिक क्रमवारीत बरीच मागे आहेत.

संशोधनाच्या क्षेत्रात संख्यात्मक आणि गुणात्मक पातळीवरदेखील आपण मागे आहोत.

**चीन की भारत?**

शैक्षणिक आणि संशोधनाच्या पातळीवर चीन भारताच्या अनेक योजने पुढे आहे. काही दिवसांपूर्वी मी मराठवाड्यातील एका तालुक्यातील एका डोळ्यांच्या डॉक्टरांकडे गेलो होतो आणि त्यांनी मला आवर्जून सांगितले, की ही फको मशीन स्वीत्झर्लंडहून आयात केलेली आहे. अगदी काही दिवसांपूर्वी मी मराठवाड्यातल्या एका खूप मोठ्या प्रिंटिंग प्रेसला भेट दिली, तर त्या मालकाने खूप आवर्जून सांगितलं, की या दोन मशीन्स जर्मनीहून आयात केलेल्या आहेत आणि या दोन मशीन्स जपानहून आयात केलेल्या आहेत.

तर भारतामध्ये आपण नेमकं काय तयार करतो आहोत, हा एक प्रश्न आहे. काही वर्षांपूर्वी 'इन्फोसिस'चे संचालक नारायण मूर्ती यांनी बंगळुरूच्या एका सायन्स टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूटच्या पदवीप्रदान समारंभात असं सांगितलं, की सामान्य लोकांच्या घरांमध्ये उपयुक्त ठरेल असे एकही यंत्र भारतीय वैज्ञानिकांना अद्याप तयार करता आलेलं नाही. (India hasn't made a single invention that has become a household name globally.) (https://scroll.in/article/741723/full-text-narayana-murthy-questions-the-contribution-of-iits-and-iisc-in-the-last-60-years).

मध्यंतरी असे समजले, की भारतामध्ये आता सीलिंग फॅनचं उत्पादन जवळपास थांबलेलं आहे. आपले व्यापारी हे चीनमधून सीलिंग फॅनचे वेगवेगळे पार्ट्स स्वस्तात भारतामध्ये मागवतात, त्यांची जुळणी करतात आणि 'इंपोर्टेड फ्रॉम चायना' अशा लेबलसह किंवा लेबलशिवाय हे सीलिंग फॅन भारतात विकले जात आहेत. यामध्ये भारतातील जुन्या नामांकित अशा कंपन्यांचाही समावेश आहे. हे जर खरं असेल, तर भारतामधील हजारो इंजिनिअरिंग कॉलेजेसमधील इलेक्ट्रिकल अथवा इलेक्ट्रॉनिक सायन्सचे लाखो विद्यार्थी हे उदाहरणार्थ फॅनसंबंधित 'ऑन-साईट इंडस्ट्रियल ट्रेनिंग' कसं पूर्ण करतील?

तर, एकूणच या तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या बाबतीत आपल्या घरच्या अपयशाचं हे चित्र आहे. जगातील सर्वाधिक प्रभावशील ४,००० वैज्ञानिकांपैकी केवळ १० भारतीय वैज्ञानिक आहेत. (https://www.firstpost.com/tech/science/only-10-among-the-worlds-top-4000-influential-researchers-are-indian-report-5840491.html) चीनने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातून विकास साधला. आपल्या शिक्षणाचे प्रारूप हे प्रायः topsy turvy राहिले! १९९० च्या आसपास चीनमध्ये भारताच्या दुप्पट साक्षर लोक होते, तर भारतात चीनपेक्षा पाचपट पदवीधर होते. गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षणाच्या आधारे चीनने युरोपला मागे सारले. आपल्याकडे आज ५ ते १७ या वयोगटातील शाळाबाह्य मुली-मुलांची संख्या ८.४ कोटी आहे. (nhm : https://www.google.co.in/amp/s/www.thehindu.com/opinion/op-ed/still-too-many-children-out-of-school/article24857149.ece/amp/) शाळाबाह्य मुलांची ही संख्या इंग्लंडच्या एकूण लोकसंख्येच्या दीडपट आणि जर्मनीच्या एकूण लोकसंख्येएवढी आहे. युरोपमध्ये औपचारिक शिक्षणाला स्वेच्छेने नाकारणारे केवळ शाळाबाह्य राहतात!

भारतातील ज्ञान आयोगाने चीनच्या प्राथमिक शिक्षणाच्या यशाकडे दुर्लक्ष करीत चीनमधील विद्यापीठांचा दाखला देऊन भारतातील विद्यापीठांची संख्या ६०० हून १,५०० पर्यंत वाढवावी, अशी शिफारस केली होती. या शिफारशीच्या आधारे भारतात खाजगी विद्यापीठांचा बाजार उभा राहिला.टोकिओ ऑलिम्पिकमध्ये भारताला ७ पदकं मिळालीत, पण चीनला एकूण ८८ पदकं मिळालीत. ती कशी?

आपल्या सरकारने प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य देणारे राष्ट्रीय शिक्षण धोरण ज्या वर्षी जाहीर केले, त्याच वर्षी प्राथमिक शिक्षणासाठीच्या तरतुदीत ५,००० कोटी रुपये कमी केले; तर उच्च शिक्षणासाठीच्या तरतुदीत १,००० कोटी रुपये कमी केले. (nhm : https://indianexpress.com/article/opinion/editorials/national-education-policy-nep-indian-education-7433700/) चीनने असे केले नाही. सुमारे दोन दशकांपूर्वी भारत आणि चीन स्वामित्व हक्काबाबतीत बरोबर होते. आता चीन स्वामित्व हक्काबाबत (पेटंट) आपल्या २८ पट पुढे आहे. चीनमध्ये संशोधकही भारतापेक्षा पाचपट अधिक आहेत. चीन शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात दहापट जास्त खर्च करीत आहे.

**सोळा लाख संशोधकांवर हल्ला**

विद्यापीठ अनुदान आयोगाने पीएच.डी. पदवीच्या गुणवत्तेचा प्रश्न उपस्थित करून अचानकपणे प्राध्यापकांना पीएच.डी. मार्गदर्शनास पात्र असलेल्या शिक्षकांची संशोधन विद्यार्थीक्षमता कमी केली. यापूर्वी सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक यांना कोणताही भेदभाव ना करता आठ संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची मुभा होती. ही मर्यादा सहयोगी प्राध्यापकांसाठी ६ आणि सहाय्यक प्राध्यापकांसाठी ४ अशी करण्यात आली. यातून प्राध्यापकांमध्ये तर स्पर्धात्मकता निर्माण झालीच; पण मोठ्या प्रमाणावर पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांचीही संख्या कमी झाली.

कोणत्याही विद्यापीठातील पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांचे सामाजिक चारित्र्य अलीकडे पाहिले तर हे विद्यार्थी साधारणपणे नवशिक्षित वर्गातील पहिल्या पिढीचे पदवीधर आणि बहुजन समाजातील असल्याचे आढळते. अशा वेळी या वर्गाचा आगंतुकपणे संशोधनाच्या क्षेत्रात झालेला प्रवेश हा अभिजनांना अचंबित करणारा आहे. ज्या समाजाची इतिहासामध्ये दीर्घकाळ केवळ घोषणा केली गेली, त्या समाजातील एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी हे संशोधनासाठी येत आहेत यातून काही समस्या नक्कीच निर्माण होत असते. म्हणून या वर्गाच्या संशोधनाविषयी नेहमी गुणवत्तेचा प्रश्न उपस्थित केला गेलेला आहे. गुणवत्तेच्या नावाखाली विद्यार्थीसंख्या कमी झालेली आहे.

या निर्णयाचा एकूण भारतीय स्तरावरील परिणाम हा अतिशय विघातक आणि विदारक असा आहे. एकूण किती विद्यार्थी

भारतभरातील पीएच.डी. या अभ्यासक्रमातून बाद झाले हे समजून घेण्यासाठी आपण थोडीशी आकडेमोड करूयात. यासाठी आपण महाराष्ट्रातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड एक प्रातिनिधिक विद्यापीठ म्हणून समोर ठेवूयात. हे विद्यापीठ भारतातील एका आर्थिकदृष्ट्या मागास प्रदेशांमध्ये वसलेले आहे. मध्यम आकाराचे हे विद्यापीठ आहे. त्यामुळे या विद्यापीठाला प्रातिनिधिक विद्यापीठ म्हणून स्वीकारायला हरकत नसावी.





या विद्यापीठामध्ये पीएच.डी. मार्गदर्शकांची एकूण संख्या आहे १,३९२ आणि अशी एकूण ४५९ विद्यापीठे आहेत. या १,३९२ मार्गदर्शकांपैकी आपण तूर्तास निम्मे सहाय्यक प्राध्यापक आहेत आणि एक चतुर्थांश हे सहयोगी प्राध्यापक आहेत, असे अंदाजे असे गृहीत धरल्यास सहाय्यक प्राध्यापकांची संख्या होते ६९९ आणि सहयोगी प्राध्यापकांची एकूण संख्या होते ३४८. आता सहायक प्राध्यापकांच्या प्रत्येकी ४ आणि सहयोगी प्राध्यापकांच्या २ पीएच.डी. विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली. असे लक्षात येते, की सहाय्यक प्राध्यापकांचे अंदाजे २,७९६ विद्यार्थी कमी झाले आणि सहयोगी प्राध्यापकांचे अंदाजे ६९६ विद्यार्थी कमी झाले. कमी झालेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित संख्या होते ३,४९२!

याचा अर्थ असा, की विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या निर्णयामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठासारख्या विद्यापीठामध्ये ३,४९२ विद्यार्थी कमी झालेत. भारतामध्ये एकूण ४५९ सार्वजनिक विद्यापीठे आहेत (तूर्तास खाजगी विद्यापीठे आपण बाजूला ठेवू). या विद्यापीठांसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे एक युनिट मानले, तर १६,०२,८२८ एवढे विद्यार्थी हे संशोधनातून कमी करण्यात आले. विद्यापीठ अनुदान आयोगासारखी संस्था एका फटक्यात अशी सोळा लाख संशोधक विद्यार्थ्यांची बौद्धिक कत्तल करू शकते, हे यातून सिद्ध झाले. वस्तुतः, हा हल्ला विद्यार्थ्यांवर होता, पण विद्यार्थी वर्ग हा राजकीयदृष्ट्या जागरूक आणि अधिक प्रज्वलनशील असल्यामुळे विविध प्राध्यापकांची संख्या कमी करून आंगतुकपणे संशोधनाच्या क्षेत्रात प्रवेशित झालेल्या नकोशा विद्यार्थ्यांवर अंकुश ठेवला गेला.

एखाद्या देशामधील तीस लाख संशोधन आकांक्षा बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही कमी केली जाते, असे अपवादानेच घडावे. अमेरिकेमध्ये दरवर्षी ६४,००० विद्यार्थी पीएच.डी. मिळवतात, तर भारतामध्ये दरवर्षी २४,००० विद्यार्थी पीएच.डी. मिळवतात. भारताला जर किमान अमेरिका किंवा चीनच्या जवळ यायचं असेल, तर भारताला पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

राहिला प्रश्न गुणवत्तेचा! तर, संशोधकांची संख्या कमी करून गुणवत्तेची हमी ही मिळवता येणार नाही! ते आग सोमश्वरी अन् बंब रामेश्वरी ठरेल! त्यासाठी आवश्यक ती पावले उचलणे आवश्यक असते! विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविणे आवश्यक आहे. अनेक विद्यापीठांमध्ये पीएच.डी. करणाऱ्या संशोधकांना संशोधन केंद्रात बसण्यासाठी पुरेशा खुर्च्यासुद्धा नाहीत, ही आज वस्तुस्थिती आहे. त्यामुळे विद्यार्थी कमी करण्याऐवजी पायाभूत सुविधा पुरविण्याचा प्रश्न जर मार्गी लावला असता, तर आज भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवामध्ये भारतीय संशोधनाच्या गुणवत्तेचे जे वाभाडे आंतरराष्ट्रीय पातळीवर निघत आहेत, ते निघाले नसते.

अगदी अलीकडे प्रभाकर नानावटी यांनी असा आरोप केला, आहे की बोइंग कंपनी ही भारताला इंजिन तयार करण्याचे काम देत नाही; तर नट-बोल्टसारखे सुटे भाग तयार करण्याचे काम देते. आपल्या देशामध्ये हजारो लाखो इंजिनिअर असूनसुद्धा अगदी चारचाकी गाड्यांच्या क्षेत्रातील टाटासारखी कंपनी आणि दुचाकी गाड्यांच्या क्षेत्रातील टीव्हीएस किंवा हीरोसारख्या कंपन्या यांना परदेशी कंपन्यांशी हातमिळवणी करूनच इंजिनचा प्रश्न हा अगदी अलीकडच्या काळापर्यंत सोडवावा लागला होता. यातून एकूणच भारतीय कंपन्यांची दुरवस्था दिसून येते. या भारतीय कंपन्या संशोधनावर खर्च करायला अजूनही तयार नाहीत. परदेशी कंपन्यांसोबत संधान साधून ते संशोधनाचा प्रश्न सोडवितात!

राष्ट्रीय शिक्षण धोरणात हे मान्य करण्यात आले आहे, की भारत संशोधन आणि नवनिर्मितीवर सकल घरेलू उत्पन्नापैकी ०.६९ % रक्कम खर्च करतो, तर हेच प्रमाण अमेरिकेत २.८ %, इस्रायलमध्ये ४.३ % आणि दक्षिण कोरियात ४.२ टक्के आहे. पण असेही मांडण्यात आलेले आहे, की भारताला संशोधनाची आणि ज्ञाननिर्मितीची दीर्घ परंपरा आहे!

भारतीय शिक्षणातील संशोधनाचा प्रश्न सोडविण्यासाठी या आयोगाने राष्ट्रीय संशोधन फाऊंडेशनची कल्पना मांडली आहे. यातून संशोधनाचे अतिकेंद्रीकरण होण्याचा धोका आहे. आज भारतीय विद्यापीठे आणि महाविद्यालयांपुढील खरा प्रश्न हा त्यांची स्वायत्तता टिकवून ठेवण्याचा आहे! ●●●

**(लेखक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात इंग्रजीचे प्राध्यापक आहेत.)**

# कोशातून बाहेर पडण्याची गरज



प्राचार्य - प्रभाकर बागले

**जगामध्ये १९९० नंतर जी उलथापालथ झालेली दिसते, तिला सामोरे जाण्यासाठी चिंतनशील, वैज्ञानिक, वैचारिकतेची गरज आहे. आपण आपल्या कोशातून, खोप्यातून, छावणीतून, खिडकीतून बाहेर येऊन बाह्य अवकाशाकडे पाहण्याची गरज आहे.**

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले हे सवर्ण समाजातलं, पुण्यामधलं अलौकीक असं जोडपं. पुरोगामी विचाराचं, भवतालातलं जीवन पाहून अस्वस्थ झालेलं. कृतिशील विचार करणारं, परिवर्तनवादी चळवळ उभी करणारं, प्रस्थापित प्रवाहाच्या विरोधी दिशेनं जाणारं, त्यासाठी खस्ता खाणारं आणि न खचता आपलं ध्येय गाठणारं. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही या विश्वासासोबत मार्गक्रमण करणारं. मानवी मनाची मशागत व्हायची असेल, तर मुला-मुलींना शाळेत पाठवलं पाहिजे, त्यासाठी शाळा उघडल्या पाहिजेत आणि त्या काळात मुलींसाठी शाळा हा विचार तर समाजाच्या तळपायाची आग मस्तकात नेणारा होता.



याची कल्पना या जोडप्याला होती. पण सावित्रीबाईंनी मुलींची शाळा सुरू केली. कारण मुलगी शिकली तर एक कुटुंब शिक्षित होते, एक कुटुंब शिक्षित झालं की समाज शिक्षित होतो आणि शिक्षित समाजाच्या मनोभूमीतच पुरोगामी विचार लवकर रूजू शकतो. या उदात्त विचारानं निरपेक्षपणे सावित्रीबाई फुले यांनी मुलींची शाळा काढली. महाराष्ट्रातली ही पहिली मुलींची शाळा. सत्यशोधक समाजानं महाराष्ट्रातील समग्र समाजासाठी उचललेलं ते पहिलं क्रांतिकारक पाऊल. ते क्रांतिकारी यासाठी, की त्या काळातल्या बहुसंख्य लोकांच्या विचाराला जणू वाळवी लागलेली होती. सावित्रीबाईंना शाळेत जाताना व येताना त्यांच्या अंगावर शेण फेकलं जायचं. त्यांना गलिच्छ कॉमेंट्स ऐकाव्या लागत. प्रवाहाच्या विरुद्ध जाणाऱ्यांची ही नियती असते, असं वाटू लागतं.

अगदी परवा परवा तोच अनुभव आला. दीड-दोनशे वर्षांनंतर तथाकथित पुरोगामी महाराष्ट्रातील काही व्यक्तींनी सावित्राबाईंविषयी जी मुक्ताफळे उधळली ती समजल्यावर कोणाचीही मान खाली गेल्याशिवाय राहणार नाही. कारण प्रत्येकाला आई असते, बहीण असते, आजी असते, मावशी असते, लग्न झालेल्यांना पत्नी असते. या सगळ्या सावित्रीच्या मुली आहेत. ढोबळमानाने लोकसंख्येच्या ५० टक्के स्त्रीवर्ग आहे. या वर्गाचा तो अपमान आहे. ख्यातनाम ताराबाई शिंदे या सावित्रीबाईंच्या विद्यार्थिनी. जनतेच्या मानसिकतेत रुतलेले दोन महात्मे, महात्मा फुले आणि महात्मा गांधी. दोघेही सत्याचा वेध घेणारे. टीकाकारांना हे माहीत नसतं, की महात्मा फुलेंनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर पुस्तक लिहिलं. त्यापूर्वी एकही पुस्तक शिवाजी महाराजांवर नव्हतं. टीकाकारांना हे माहीत नसतं, की टिळकांच्या सुटकेसाठी जोतिरावांनी त्यांना यावेळचे १,००,००२ रुपये पाठविले. टीकाकारांना हे माहीत नसतं, की जोतिराव हे पुण्याचे कमिशनर होते, फार मोठे कॉन्ट्रॅक्टर होते. टीका करणाऱ्याला हे माहीत नसतं, की या जोडप्याने दत्तक घेतलेल्या यशवंतीचं लग्न सत्यशोधक समाजाच्या संकेताबरहुकूम लावलं. भटजी नव्हते, अक्षदा नव्हत्या, साधेपण, खर्च कमी. ऐपत असून डामडौल नाही. म्हणून शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना जोतिबा गुरुस्थानी होते. या तीनही विचारवंतांनी आधुनिक विचारसरणीकडे पाहण्याचा एक स्वतंत्र आणि नवा दृष्टिकोन दिला. तो महाराष्ट्रासाठीच नव्हे तर भारतासाठी पोषक ठरला आहे. विचार नावाची संज्ञा प्रवाही राहिली तरच तिचा विस्तार होतो, ती अंगानं भरते. १९९० नंतर जगामध्ये जी उलथापालथ झालेली दिसते, तिला सामोरे जाण्यासाठी चिंतनशील, वैज्ञानिक, वैचारिकतेची गरज आहे. आपण आपल्या कोशातून, खोप्यातून, छावणीतून, खिडकीतून बाहेर येऊन बाह्य अवकाशाकडे पाहण्याची गरज आहे, असं वाटतं.

**(लेखक ज्येष्ठ समीक्षक आहेत.)**

# ध्रुवीकरणाचे पुढचे पाऊल समान नागरी कायदा



कॉ. भीमराव बनसोड

**भोपाळ येथील भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय संविधानातील तरतुदींची तसेच मा. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी, समान नागरी संहिता लागू करण्याची केलेली घोषणा ही केवळ पुढील निवडणुका ध्यानात घेऊन हिंदू-मुस्लिमानांचे ध्रुवीकरण करण्यासाठीच होती, असा त्याचा अर्थ होतो.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी सव्वा महिन्यापासून जळत असलेल्या मणिपूरचा दौरा करतील किंवा तेथील परिस्थितीबद्दल निदान काहीतरी बोलतील, अशी काही जणांना अपेक्षा होती. पण मणिपूरचा दौरा न करताच त्या राज्याला त्याच्या हालवर सोडून, त्याबद्दल काहीही न बोलताच ते अमेरिकेच्या दौऱ्यावर निघून गेले. हातोहात त्यांनी परस्पर इजिप्तचाही दौरा करून टाकला. तेथे त्यांनी दाऊदी बोहरा मुस्लिम समाजाशी संबंधित असलेल्या मशिदीला भेटही दिली. हा दाऊदी बोहरा समुदाय गुजरातमध्ये मोठ्या संख्येने आहे. २००२ च्या गुजरात दंगलीनंतर हा समुदाय हबकला असून तो मुख्यत: व्यापारी वर्गातील असल्याने त्याला शांततेची जास्त गरज आहे. त्यापोटी या समुदायाने मोदी यांना त्यांच्या निवडणूक खर्चासाठी मोठ्या रकमा दिल्या असल्याच्या नोंदी अजगर अली इंजिनिअर या त्या समाजातील समाजसुधारकाने आपल्या आत्मचरित्रात नमूद केल्या आहेत. याप्रमाणे मुस्लिम समुदायात फाटाफूट करण्यासाठी दाऊदी बोहरा समाजाला आशान्वित करण्याबरोबरच पसमांदा मुस्लिमांसंबंधानेही पंतप्रधान नरेंद्र मोदी अधूनमधून पुळका आल्यासारखे बोलत असतात.



पण अमेरिका दौऱ्यावरून परत आल्यानंतरसुद्धा मणिपूरसंबंधाने त्यांनी चकार शब्दही काढला नाही. पण विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी गेलेल्या मंत्रिमंडळातील व पक्षातील चाहत्यांना त्यांनी मोठ्या आस्थेने आपल्या देशात काय चालले आहे असे विचारले. तेव्हा त्यांनी, सर्व ठीक चालले आहे असे उत्तर दिले. जसे मोदी यापूर्वी अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले असताना तेथील अनिवासी भारतीयांनी त्यांना विचारले होते, 'हाऊ डी मोदी' तेव्हा मोदींनी त्या समुदायाला उत्तर दिले होते 'सब चंगा छे', असेच काहीसे उत्तर त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी दिले.

**बऱ्याच बाबी न कळण्यासारख्या...**

खरे तर, भारतातील धर्मनिरपेक्ष पत्रकार, विद्वान, राजकीय विश्लेषक यांना उगीचच असे वाटते, की मणिपूरसंबंधाने त्यांनी काहीतरी बोलावे. पण जसे दोन महिन्यांपासून दिल्ली येथे महिला पहिलवानांच्या यौन शोषणाविरोधात चालू असलेल्या धरणे आंदोलनाबद्दल ते काही बोलले नाहीत, तेव्हा मणिपूर अराजकाबद्दल ते बोलतील, असे त्यांना का वाटत असावे? खरे तर, तेथे जी काही आग लागलेली आहे, ती त्यांच्या मातृसंघटनेच्या आतापर्यंतच्या कामकाजाचाच परिणाम आहे. किंबहुना देशातील इतर भागांप्रमाणेच तेथेही ते विविध जाती जनजातींच्या समुदायात द्वेष पसरवण्याचे

काम करीत होते. त्यांच्या त्या कामाला त्यांना अपेक्षित असलेलेच ते फळ आले आहे. २०१४ पर्यंत भाजपाच्या महासचिव पदाची जबाबदारी असलेले राम माधव यांना त्या पदाच्या जबाबदारीतून मोकळे करून त्यांच्यावर मणिपूरची जबाबदारी आरएसएसने सोपविली होती, हे आता लपून राहिलेले नाही. त्याला धरूनच त्यांनी मणिपूरचा खरा प्रश्न हा जमिनीचा आहे असा उल्लेखही त्यांनी केला होता, हे या जाणकारांना माहीत नाही काय? अशा परिस्थितीत पंतप्रधान मोदींनी त्यांच्या अशा कामाविरोधात बोलावे अशी अपेक्षा कशी करता येईल? किंबहुना, एकप्रकारे त्यांच्या त्या कामाला पंतप्रधानांची मूक संमतीच असल्यासारखे आहे, असे हे लोक का समजून घेत नाहीत. असो. तशा बऱ्याच बाबी न कळण्यासारख्या आहेत, हेही खरेच आहे.



**जिकडे तिकडे अनागोंदी माजलेली आहे**

पण ते काहीही असो, भारतात परत आल्याबरोबर ते आता त्यांच्या पुढच्या कामाला लागले आहेत. नजीकच्या काळात मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ, तेलंगणासारख्या राज्यांतील विधानसभांच्या निवडणुका आहेत. २०२४ मध्ये तर लोकसभेच्या निवडणुका आहेत. त्याची त्यांना तयारी करायची आहे. त्या तयारीचा भाग म्हणून मध्य प्रदेशमधील भोपाळ येथे त्यांच्या कार्यकर्त्या पुढे बोलत असताना त्यांनी देशात समान नागरी संहिता लागू करण्यासंबंधीचे सूतोवाच केले आहे. यापूर्वी एनआरसी, सीएए संहिता लागू करण्याच्या प्रश्नावरून संपूर्ण देशभर उसळलेला आगडोंब कमी होता की काय आणि त्या विरोधात ठिकठिकाणी चालू असलेले शाहीनबागचे आंदोलन पुरेसे नव्हते की काय? म्हणून आता समान नागरी संहिता त्यांच्या पद्धतीनेच देशात लागू करून राहिलेली हिंदू-मुस्लिम व इतर अल्पसंख्यांकाच्या ध्रुवीकरणाची कसर भरून काढून संभाव्य निवडणुकांना सामोरे जाण्याची तयारी करण्याचे पाऊल त्यांनी टाकले आहे. त्याच्या समर्थनार्थ त्यांनी एका देशात दोन कायदे कसे काय असू शकतात? एकाच घरात दोन कायदे असल्याने ते घर नीट चालेल काय? असा प्रश्न त्यांनी तमाम भारतीयांच्या पुढे उपस्थित केला. जणू काही स्वातंत्र्याच्या १९४७ सालापासून व भारताने धर्मनिरपेक्ष संविधान स्वीकारल्यापासून देश नीट चाललाच नाही. सर्वत्र अनागोंदीच होती, असा आविर्भाव त्यांनी आणलेला आहे. तसे तर त्यांच्या या समर्थनात फारसा दम नाही. कारण आजपर्यंत त्याच संविधानाच्या आधारे देश बऱ्यापैकी चालू होता. पण २०१४ नंतर मात्र हे सत्तेत आल्यानंतरच जिकडे तिकडे अनागोंदी माजलेली आहे.

त्यांनी हे विधान केल्यानंतर मंत्रिमंडळातील त्यांचे राजनाथ सिंहसारखे सहकारी नव्या जोमाने कामाला लागले आहेत. ते म्हणतात, की हो बरोबर आहे, समान नागरी कायदा झाला पाहिजे. हे तर भारतीय संविधानातच लिहिलेले आहे. तेव्हा संविधानाची अंमलबजावणी केली पाहिजे. अशासारखी पोपटपंची आता इथून पुढच्या काळात त्यांचे विविध सहकारी, भक्तगण करणार आहेत. हा प्रश्न पुढच्या काळात ते सतत तेवत ठेवणार आहेत.

**लोकशाही आमच्या रोमा रोमात भिनलेली!**

खरं म्हणजे, अमेरिकेत असताना त्यांना भारतीय अल्पसंख्याकांच्या, खास करून मुसलमानांच्या संबंधाने तेथील वॉल स्ट्रीट जर्नलच्या पत्रकार सबरिना सिद्दिकी यांनी, ''तुम्ही धार्मिक अल्पसंख्याकांच्या अधिकाराबद्दल काय करीत आहात व पुढे काय करू इच्छिता?'' असा प्रश्न विचारला होता. या प्रश्नावर त्यांनी उत्तर दिले, की आमच्या भारतात विविध धर्माचे, पंथाचे लोक गेल्या अनेक वर्षांपासून राहात आहेत व इथून पुढेही राहतील. त्यांच्यात कोणताही भेदभाव केला जात नाही, लोकशाही आमच्या रोमा रोमात भिनलेली आहे, असे गोलमाल उत्तर दिले.

अमेरिकन अध्यक्ष जो बायडेन व जगातील अनेक मान्यवर पत्रकारांच्या समक्ष ही प्रश्नोत्तरे झाली. खरं म्हणजे, पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सवय नाही. पण अमेरिकेतील पत्रकारितेपुढे त्यांना नमते घ्यावे लागले. पण वॉल स्ट्रीट जर्नलच्या सबरिना सिद्दिकी यांनी हा प्रश्न विचारल्यानंतर मात्र आरएसएस व भाजपच्या भक्तगणाकडून त्यांची जात, धर्म व देशावरील निष्ठा इत्यादींबद्दल ट्रोल करण्यात आले. इतके, की अमेरिकन सरकारलाही त्याबाबत हस्तक्षेप करून सबरिना सिद्दिकी यांची बाजू घ्यावी लागली व पत्रकारितेच्या स्वातंत्र्यतेची ग्वाही द्यावी लागली. तेव्हा अमेरिकेतील अशा प्रश्नांच्या सरबत्तीमुळे काहींना असे वाटले होते, की निदान तेथील अशा वातावरणामुळे तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर काही परिणाम झाला असेल. पण ते तसे संवेदनहीन आहेत. त्यांच्या एकंदर वृत्तीवर या सार्वत्रिकरित्या झालेल्या प्रश्नोत्तरांचा काहीच परिणाम झाला नाही, हे त्यांनी भारतात आल्याबरोबर समान

नागरी संहिता लागू करण्यासंबंधीचे जे सूतवाच केले, त्यातून दिसून आले.

ज्या पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी समान नागरी संहिता लागू करू इच्छितात, त्या पद्धतीने तो लागू व्हावा असे कोणाचेच मत नाही. अर्थात, याबाबतच्या संविधानातील तरतुदींची अंमलबजावणी व्हावी, असेच बहुतेकांचे मत आहे. पण तो लागू करण्यापूर्वी केवळ मुस्लिम समुदायांशीच नव्हे तर जैन, पारशी, ख्रिश्चन व आदिवासी समुदायांचे विवाह, घटस्फोट, वारसा हक्क व संपत्तीचे वाटप व दत्तक घेण्याबद्दलच्या ज्या विविध रूढी, परंपरा व चालीरीती आहेत, त्यानुसार हे समुदाय आजपर्यंत वाटचाल करीत आलेले आहेत. त्याशिवायसुद्धा भारतात वैयक्तिक संहिताही लागू आहे. त्यामुळेही बऱ्याचशा बाबींची सोडवणूक करता येते. अशा परिस्थितीत केवळ आपल्या सत्तेच्या संकुचित स्वार्थासाठी उगीचच घिसाडघाई न करता सर्वांशी चर्चा करून, त्यांना विश्वासात घेऊन, याबाबत विचार करावा, असेच सर्वांचे मत आहे.




**दिल्लीत निवडून आलेल्या सरकारला प्रशासकीय अधिकार**

पण भोपाळ येथील भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय संविधानातील तरतुदींची तसेच मा. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी, समान नागरी संहिता लागू करण्याची केलेली घोषणा ही केवळ पुढील निवडणुका ध्यानात घेऊन हिंदू-मुस्लिमानांचे ध्रुवीकरण करण्यासाठीच होती, असा त्याचा अर्थ होतो. अन्यथा भारतीय संविधानातील तरतुदींचे रोज धिंडवडे उडविले जात आहेत. तसेच मा. सुप्रीम कोर्टाने, दिल्लीत निवडून आलेल्या सरकारला प्रशासकीय अधिकार आहेत, त्यात केंद्राने ढवळाढवळ करू नये असे स्पष्ट आदेश दिले असतानाही, त्या आदेशाला धुडकावून लावण्यासाठी नरेंद्र मोदी यांच्या सरकारने त्या आदेशाविरोधात वटहुकूम काढलेला आहे, हे विसरून चालणार नाही. तेव्हा संविधानाची अंमलबजावणी व मा.सुप्रीम कोर्टाचा तगादा यामुळे या कायद्याची अंमलबजावणी केली पाहिजे, या त्यांच्या म्हणण्यात काहीही अर्थ उरत नाही. उलट २०१४ नंतर आरएसएसचा उघड झालेला अजेंडा लागू करण्यासाठी ते ही सर्व धडपड करीत आहेत, असे दिसते.

**निवडणुका जिंकणे हाच त्यामागचा हेतू**

जसे मुस्लिम धर्मियातील तीन तलाक पद्धतीमुळे मुस्लिम स्त्रियांवर खूपच अन्याय होतो, यामुळे त्यांचा कळवळा घेऊन तीन तलाक पद्धत बेकायदेशीर ठरवण्याचा कायदा त्यांनी केला. त्यामागचा त्यांचा हेतूही मुस्लिम महिलांवरील अन्यायाचा विरोध करणे हा नसून मुस्लिम पुरुषावर सूड उगविणे हाच होता. अन्यथा याच मुस्लिम महिलांच्या मुलांना, पतींना एन्काऊंटर करून ठार मारले जाते, त्यांच्या पुरुषांना वर्षानुवर्षे तुरुंगात डांबण्यात येते, त्यांना जामीन मिळू दिला जात नाही. मुस्लिम महिलांवरील बलात्काऱ्यांना शिक्षा माफ केल्या जातात, त्याबद्दल पंतप्रधान चकार शब्द बोलत नाहीत. त्यांच्या ज्या घरादारांवर बुलडोझर फिरविला जातो, त्या घरादारात मुस्लिम महिलासुद्धा राहतात, म्हणून काही त्यांच्यावर दयामाया दाखविली जात नाही. अशा कितीतरी बाबी सांगता येतील. तेव्हा मुस्लिम महिलांबद्दल त्यांना कळवळा होता व म्हणून तीन तलाक पद्धतीविरुद्धचा कायदा त्यांनी आणला या त्यांच्या म्हणण्यात जसा अर्थ नाही, तसाच या समान नागरी संहिता लागू करण्याबद्दलसुद्धा नाही. हिंदू-मुस्लिम द्वेष पसरवणे व पुढील होणाऱ्या निवडणुका जिंकणे हाच त्यामागचा हेतू आहे. त्यासाठीच ते आता समान नागरी कायद्याकडे वाटचाल करणार आहेत. एनआरसी, सीएए या कायद्यांच्या वेळी देशभर जसा आगडोंब उसळला होता, तसाच किंबहुना त्यापेक्षाही जास्त आगडोंब येथून पुढच्या काळात उसळवावा व त्यातून आपल्या सत्तेची पोळी भाजून घ्यावी, एवढाच त्यांचा या समान नागरी संहिता लागू करण्यासंबंधीचा हेतू दिसून येतो.

त्यांनी समान नागरी संहिता लागू करण्यासंबंधीचे सूतोवाच केल्याबरोबर काँग्रेस पक्षाचे नेते पी. चिदंबरम यांनी त्याला विरोध दर्शवलेला आहे. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डानेसुद्धा तातडीची मिटींग बोलवून त्यांच्या या कृतीला विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे फारूक अब्दुल्ला यांनीही विरोध केला आहे. झारखंडमधील अनेक आदिवासी संघटनांनी याबाबतच्या विधेयकाला विरोध दर्शविला असून तो थांबविण्याबद्दल विधी आयोगाला विनंती केलेली आहे. देशातील आप, एनसीपी, शिवसेना व बीएसपी अशा काही पक्षांचा अपवाद वगळता सर्वच पक्षांनी या बाबीला विरोध दर्शविलेला आहे. एनसीपी, शिवसेना इत्यादी पक्षांनीसुद्धा कार्यपद्धतीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे, तर आपने केवळ तत्वतः मंजुरी दिली आहे.

महिला पहिलवानांच्या यौन शोषणाविरोधात दोन महिन्यांपासून चालू असलेल्या आंदोलनाच्या वेळेस पूर्णपणे गप्प बसलेली आरएसएसची महिला आघाडी, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या कायद्याचे सूतोवाच केल्याबरोबर, या महिला आघाडीने हा कायदा ताबडतोब लागू करावा म्हणून धरणे आंदोलन केले आहे. त्यांची ही महिला आघाडी आता एकाएकी जागृत झाली आहे. ●●●

**(लेखक कामगार चळवळीतील कार्यकर्ते आहेत.)**

# मणिपूर हिंसाचार : जातीय की सांप्रदायिक?

राम पुनियानी

**उच्च न्यायालयाने मैतेई समुदायाला अनुसूचित जमाती (एसटी) म्हणून मान्यता दिल्यानंतर मणिपूरमध्ये किमान १०० लोक मारले गेले आहेत आणि एक लाखाहून अधिक लोकांना त्यांची घरे सोडून पळून जावे लागले आहे. या हिंसाचारामुळे सर्वसामान्यांचे प्रचंड हाल होत असून महिला, मुले आणि विस्थापितांची अवस्था दयनीय आहे. परिस्थितीला तोंड देण्यात सरकार अपयशी ठरल्याने देशाची लाजिरवाणी स्थिती झाली आहे.**

हा हिंसाचार ३ मे रोजी सुरू झाला (किंवा भडकावण्यात आला) आणि जवळपास दोन महिन्यांनंतरही सुरू आहे. कुकी आणि इतर प्रामुख्याने ख्रिश्चन आदिवासी गट आणि त्यांच्या मालमत्तेला लक्ष्य केले जात आहे. हिंसक जमाव निवडकपणे चर्च नष्ट करत आहेत. आतापर्यंत सुमारे ३०० चर्च द्वेषाच्या आगीत नष्ट झाल्या आहेत. हा हिंसाचार ख्रिश्चनविरोधी आहे का, याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल.

**मणिपूर जळतं सोडून ते अमेरिकेत पळून गेले**

हा हिंसाचार सुरू झाल्यापासून माननीय पंतप्रधानांनी या विषयावर तोंड उघडण्याची तसदी घेतली नाही. मणिपूर जळत असताना पंतप्रधान कर्नाटकात आपल्या पक्षाच्या प्रचारात रात्रंदिवस व्यस्त होते. ते अजूनही गप्प आहेत. या विषयावर त्यांच्याशी चर्चा करू इच्छिणाऱ्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाला भेटण्यासाठी त्यांना वेळ मिळाला नाही. मणिपूर जळतं सोडून ते अमेरिकेत पळून गेले. त्यांचे मौन धोरणात्मक आहे का? शेवटी, या हिंसाचाराचे बळी ठरलेल्या कुकी आणि इतर डोंगरी जमाती ख्रिश्चन धर्माचे अनुयायी आहेत, ज्यांना संघ परिवार 'परकीय' मानतो? मोदींनी अनेकवेळा ईशान्येला भेट दिली आहे. पण हिंसाचाराची आग विझवण्यासाठी ते काही मैल दूर आहेत.

कर्नाटकात जोरदार प्रचार केल्यानंतर गृहमंत्री अमित शहा यांनी बराच वेळ दिल्लीत घालवला आणि नंतर मणिपूर गाठले. तेथे त्यांनी अनेक बैठका घेतल्या. पण परिणाम काहीच झाला नाही. मणिपूरमध्ये अजूनही हिंसाचार सुरूच आहे.

मणिपूरमध्ये भाजपची सत्ता असून दिल्लीतही भाजपचेच सरकार आहे. म्हणजेच मणिपूरमध्ये 'डबल इंजिन' सरकार आहे, जे विकासाची गंगा वाहते असे म्हणतात. येथे हे स्मरण करून देणे योग्य ठरेल की भाजप आपल्या राजवटीत कोणताही जातीय हिंसाचार नसल्याचा दावा दीर्घकाळापासून करत आहे.

**...हे केवळ हिंसाचाराचे निमित्त**

उत्तर प्रदेशचे माजी पोलीस महासंचालक डॉ. विभुती नारायण राय यांनी आपल्या प्रतिष्ठित कार्य 'कॅम्बेटिंग कम्युनल कॉन्फ्लिक्ट्स'मध्ये लिहिले आहे, की राजकीय नेतृत्वाची इच्छाशक्ती असेल तर कोणत्याही प्रकारचा हिंसाचार ४८ तासांच्या आत आटोक्यात आणला जाऊ शकतो. मणिपूरमध्ये दोन महिन्यांपासून हिंसाचार सुरू आहे. असा प्रचार केला जात आहे, की मणिपूरमधील बहुतांश शेतजमिनी कुकी आणि इतर डोंगरी आदिवासी गटांनी व्यापलेल्या आहेत आणि मैतेईंना जमिनीत त्यांचा न्याय्य वाटा मिळत नाही. सध्याच्या कायद्यांनुसार बिगरआदिवासी आदिवासींच्या जमिनी विकत घेऊ शकत नाहीत किंवा त्यावर कब्जाही करू शकत नाहीत. मणिपूरच्या एकूण लोकसंख्येमध्ये मैतेईंची टक्केवारी ५३ आहे आणि कुकीची टक्केवारी १८ आहे. उर्वरित लोकसंख्येमध्ये इतर डोंगरी जमातींचा समावेश होतो. डोंगरी जमातींना राक्षसी बनवले जात आहे. त्याला अफू उत्पादक, घुसखोर आणि परदेशी धर्माचा अनुयायी म्हटले जात आहे. या हिंसाचारामागे देशद्रोह्यांचा हात असल्याचे मुख्यमंत्री बीरेन सिंह यांनी म्हटले आहे. इंटेलिजन्स ब्युरोचे माजी सहसंचालक सुशांत सिंग यांचा हवाला देत टेलिग्राफ वृत्तपत्राने लिहिले आहे, की मुख्यमंत्र्यांचा आरोप अनावश्यक आणि निराधार असून मुख्यमंत्र्यांना सर्व कुकी लोकांना दहशतवादी संबोधून बदनाम करायचे आहे असे दिसते.




वास्तविक, द्वेष या प्रकारच्या विचारसरणीतून निर्माण होतो. द्वेष निर्माण करूनच अल्पसंख्याक समुदायांविरुद्ध हिंसाचार भडकावला जातो. मणिपूर हायकोर्ट बार असोसिएशनचे मुख्य न्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड म्हणाले, की मैतेई समुदायाला अनुसूचित जमातीच्या दर्जाविरोधातील आंदोलन (उर्वरित पान ३४ वर...)


# कामगारांचा आवाज बुलंद करणारी पुस्तिका



गौतम खुशालराव कांबळे

**जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भात आर्थिक बोजा वाढेल हे सरकारचे मत चुकीचे आहे. तसेच २०२४ च्या निवडणुकीत हा महत्त्वाचा मुद्दा ठरेल, हे भाकित ही पुस्तिका करते. म्हणूनच या पुस्तिकेचा विचार ग्रामीण क्षेत्रातीलही असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतकरी, मजूर आणि समाजाच्या सर्व स्तरातील समाजाने सामूहिकपणे करावा, हा विचार ही पुस्तिका अत्यंत प्रभावीपणे मांडते. 'पुरानी पेन्शन योजना हमारा हक' या नावाने संपूर्ण मध्य भारतात ही पुस्तिका जनजागरणाचे काम करीत आहे. अर्थातच, व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले हे एक पाऊलच म्हणावे लागेल.**

आपली जीवनचर्या स्वतःच्याच श्रमावर तोलून धरणारा प्रचंड मोठा समाज जगात व भारतातसुद्धा आहे. हा समाज जीवनाची तीस-पस्तीस वर्षे कष्ट उपसतो व शेवटी मात्र ढिले झाल्यानंतर खऱ्या अर्थाने विकलांग होतो. ही जाणीव ठेऊन भारतीय संविधानाने त्याचे शेवटच्या पर्वातील जगणे थोडे सुखकर व निश्चित करण्यासाठी पेन्शन योजना सुरू केली होती. म्हणजे पेन्शन मिळेल अशी तरतुद केली होती. ती १९९८ पर्यंत सर्वसामान्य शासकीय कर्मचाऱ्यांना थोडासा दिलासा देत राहिली. देश राज्य करण्याच्या वृत्तीपासून बदलून 'बाजारा'कडे वळायला लागला १९९१ पासून आणि अहिस्ते-अहिस्ते सरकारी योजना, अनुदाने, अर्थसहाय्य विशेषतः सर्वहारा समाजापासून दूर व्हायला सुरुवात झाली आणि २००४ पासून संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगाराला आपल्या थकल्या वयात पेन्शनसारखे कवच काढून घेण्यात आनंद मानणारा एक विशिष्ट वर्ग सत्ताधारी झाला. हे विश्लेषण सखोलपणे व्यक्त करणारी एक छोटी पुस्तिका 'पुरानी पेन्शन योजना हमारा हक' या नावाने संपूर्ण मध्य भारतात जनजागरणाचे काम करीत आहे. अर्थातच, व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले हे एक पाऊलच म्हणावे लागेल.




ही पुस्तिका कामगार चळवळीत हयात खर्ची घातलेले चार प्रसिद्ध अभ्यासक डॉ. श्रीनिवास खांदेवाले, कॉ. आर.एन. पाटणे, कॉ. अशोक थूल व कॉ. अशोक दगडे यांनी लिहिली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र, जि. नागपूर या कामगार संघटनेने केले. तर पुस्तिका प्रकाशित करण्यासाठी तब्बल १६ कामगार संघटना व सामाजिक संघटनांनी यात सहभाग दिला. खरे म्हणजे, २०१४ पासून निर्माण झालेल्या वाळवंटाच्या आसमंतात एकमात्र आशा असलेल्या ओॲसिससारखीच ही स्थिती आहे.

या पुस्तिकेत एकूण छोटी सतरा प्रकरणे समाविष्ट आहेत. त्यापैकी पुरानी पेन्शन योजना के अनुसार कुछ लाभों का गणन, श्रमिको के संघर्षद्वारा पीएफआरडीए में मिली उपलब्धियाँ, सेंट्रल अँड स्टेटवाईज ऑफ फंड हेल्ड विथ पीएफआरडीए, केन्द्रीय बजट २०२३-२४ रुपया कहाँ जाता है, प्रकाशित पुस्तिकाएँ तसेच सीसीटीओबीचे पत्र ही पेन्शनशी संबंधित ६ परिशिष्टे जोडलेली आहेत, जी अत्यंत मौलिक व उपयुक्त आहेत. ही पुस्तिका ज्या नेत्यांनी आपला वेळ, बुद्धी व संपूर्ण जीवन चांगली पेन्शन योजना सुरू होण्यासाठी अथक प्रयत्न केले, त्या कामगार चळवळीतील कॉ. सुकोमल सेन, कॉ. डॉ. अशोक मिश्रा, कॉ. आर.जी. कर्णिक, कॉ. एम.आर. अप्पन व कॉ. एस.के. व्यास या कामगार नेत्यांना अर्पित केली आहे.

या पुस्तिकेची भूमिका अगदी स्पष्ट तर आहेच, ती अधिक व्यापकसुद्धा आहे. ती म्हणते, ''हर श्रमिक (वह स्त्री हो या पुरुष हो, ग्रामीण-आदिवासी या नागरी हो, किसी भी व्यवसाय से संबंधित हो, शिक्षित हो या अशिक्षित) को प्राप्त कल्याणकारी वृद्धापकाल सुरक्षा योजना (पेन्शन योजना) का लाभ मिलना उसका संवैधानिक हक है और हर रोजगार देनेवाले की वह जिम्मेदारी है.''

पुस्तिकेत माननीय सर्वोच्च न्यायालय के फैसले, केंद्रिय वेतन आयोगों की सिफारिश, कॉ. सुकोमल सेन की साक्ष, पुरानी पेन्शन

योजना बनाम नई पेन्शन योजना, विभिन्न भूमिकाएँ, कुछ चौकानेवाले आर्थिक तथ्य, पेन्शन का अभिसरण, राष्ट्रीय पेन्शन सिस्टीम अपने भविष्य की अनिश्चितता असे लक्षवेधी मुद्दे या पुस्तिकेचे महत्त्व वाढवतात.

या पुस्तिकेत नमूद आहे, की सर्वोच्च न्यायालय पेन्शनसंबंधी निर्णय देताना निर्विवाद भाष्य करते, की पेन्शन हे माणसाला त्याच्या मागील सेवेसाठी दिलेले परिश्रमिक आहे, दान नाही. सामाजिक व आर्थिक न्यायाच्या दिशेने उचललेले योग्य पाऊल आहे. तसेच वृद्धावस्थेमध्ये कामगाराला कुठलेही नुकसान होणार नाही या साठीचे ठोस आश्वासन आहे.

वेतन आयोगाने यावर भाष्य करताना स्पष्ट केले, की कठोर परिश्रमाच्या माध्यमातून अनुबंधित कर्मचाऱ्याला मिळालेले पेन्शन हे संवैधानिक, अपरिवर्तनीय व कायदेशीर असा योग्य अधिकार आहे. यात कुठलेही परिवर्तन, संशोधन हे सेवारत कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपातीच्या बरोबर असेल. पुरानी पेन्शन योजना बनाम नई पेन्शन योजना या मुद्यात प्रश्नाचे स्वरुप मूलतः स्पष्ट केले असून पेन्शनचा इतिहासही थोडक्यात सांगितला आहे. त्याचप्रमाणे पेन्शनसंबंधीच्या दोन्ही योजनांतील फरक फार गहनपणे सादर केला आहे. पुस्तिकेचे हे अगदी ठळकपणे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. तसेच नवी पेन्शन योजना ही विश्व बँकेचा आराखडा, त्या तुलनेत जुनी पेन्शन योजना ही सरकारची जबाबदारी होती, हे निर्भयपणे मांडले आहे.

विविध भूमिकाएँ या मुद्यामध्ये विविध प्रकारची व भागातील सरकारे, उद्योजक व कर्मचारी-मजूर तथा संसाधनहीन लोकांच्या वेगवेगळ्या भूमिकांची दखल घेतली आहे, जी सर्वसमावेशक आहे.

जुनी पेन्शन योजना बंद केल्याचे व नवीन पेन्शन योजना सुरू करण्याचे काही चकित करणारे आर्थिक तथ्य अधोरेखित केले आहे. यातून खरे तर या मोठ्या भारतीय कष्टकरी समाजाचे डोळे उघडण्याचीच शक्यता अधिक दिसते.

'पेन्शन का अभिसरण' या मुद्यामध्ये पेन्शन हे सामाजिक व आर्थिक अभिसरणाचे खरे प्रभावी माध्यम आहे, हे सांगायला लेखक विसरत नाहीत. ते संपत्ती प्रवाही ठेवण्याचेही साधन आहे, हे समजणे सामान्य माणसाला आनंदीदायक आहे, असा निष्कर्ष निघतो. 'पेन्शन बाजारात जाऊ नये' अन्यथा.... हा गर्भित इशारा नोबेल पारितोषिक मिळालेले प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. जोसेफ स्तिगलित्झ देतात, हे पुस्तिकेत नमूद आहे. त्यांनी लिहिले, ''विश्व ने यह समझना जरूरी है, की अर्जेंटिना की अर्थव्यवस्था ध्वस्त होने का प्रमुख कारण पेन्शन का निजीकरण यह है.'' हा इशारा भारतासाठी नाही, असे समजणे चूक होईल, असे ही पुस्तिका मांडते.

'राष्ट्रीय पेन्शन सिस्टिम-अपने भविष्य की अनिश्चितता' या गहन मुद्यामध्ये पेन्शनचा इतिहास, पहिला पेन्शन अधिनियम, चौथा वेतन आयोगात पेन्शन संरचनेत शिफारस, नव्या पेन्शन योजनेची सुरुवात, ती काय आहे? १५ व्या लोकसभेत वित्तसंबंधी संसदीय स्थायी समितीच्या शिफारशी इत्यादी महत्त्वाचे मुद्दे चर्चिले गेल आहेत.

जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भात आर्थिक बोजा वाढेल हे सरकारचे मत चुकीचे आहे. तसेच २०२४ च्या निवडणुकीत हा महत्त्वाचा मुद्दा ठरेल, हे भाकित ही पुस्तिका करते. म्हणूनच या पुस्तिकेचा विचार ग्रामीण क्षेत्रातीलही असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतकरी, मजूर आणि समाजाच्या सर्व स्तरातील समाजाने सामूहिकपणे करावा, हा विचार ही पुस्तिका अत्यंत प्रभावीपणे मांडते. बहुधा लेखक, प्रकाशक व सहयोगी संघटनांचे हेच उद्दिष्ट असावे जे साध्य झाले आहे, असे म्हणायला हरकत नाही. •••

**(लेखक सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत.)**

# मणिपूर हिंसाचार: जातीय की सांप्रदायिक?

**(पान ३२ वरून)** हे केवळ हिंसाचाराचे निमित्त होते.

**मणिपूर धगधगत आहे**

पत्रकार, लेखक, सामाजिक कार्यकर्ते, महिला हक्क कार्यकर्त्या आदींसह सुमारे ५५० नागरिकांनी या हिंसाचारावर चिंता व्यक्त करत हिंसाचारपीडितांना न्याय मिळावा व त्यांचे पुनर्वसन व्हावे, असे आवाहन करत राज्यात शांतता राखण्याचे आवाहन निवेदनाद्वारे केले आहे. निवेदनात म्हटले आहे, की मणिपूर आज धगधगत आहे आणि केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारचे फुटीरतावादी राजकारण याला मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. अधिक लोक मारण्यापूर्वी हे गृहयुद्ध संपवण्याची जबाबदारीही त्यांच्यावर आहे. निवेदनात शब्दांचा उल्लेख न करता म्हटले आहे, की सरकार राजकीय फायद्यासाठी दोन्ही समुदायांना आश्वासन देत आहे, की ते त्यांच्यासोबत आहेत. खरे तर, ते दोन समुदायांमधील दीर्घकाळ चाललेल्या तणावाला खतपाणी घालत असून आतापर्यंत कोणतेही पाऊल उचलले गेले नाही.

राज्यात शांतता राखण्याचे आवाहन करणाऱ्या निवेदनात म्हटले आहे, की सध्या कुकी समुदायाविरूद्ध सर्वात जघन्य हिंसाचार मैतेई समुदायातील सशस्त्र बहुसंख्य गट, जसे की आरामबाई टेंगोल आणि मैतेई लिपुन करतात. त्यासोबतच नरसंहार करण्याचे आवाहन केले जात आहे, द्वेषपूर्ण भाषणे दिली जात आहेत आणि स्वत:ला श्रेष्ठ सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांवर हल्ले करताना उन्माद जमाव 'बलात्कार हर, अत्याचार हर'चा नारा देत असल्याच्या वृत्तांची सत्यताही तपासली पाहिजे.

आरएसएसचे मुखपत्र 'ऑर्गनायझर'ने १६ मेच्या संपादकीयामध्ये आश्चर्यकारक गोष्टी सांगितल्या आहेत. चर्चच्या पाठिंब्याने मणिपूरमध्ये रक्तपात होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. चर्चने हा आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे. मणिपूरमधील कॅथॉलिक चर्चचे प्रमुख आर्चबिशप डॉमिनिक लुमन म्हणाले, की चर्च हिंसाचाराला भडकावत नाही किंवा समर्थनही करत नाही. हा निराधार दावा जातीय राजकारणाच्या जुन्या डावपेचाचा भाग आहे. साहजिकच त्यांना वस्तुस्थितीवरून लक्ष वळवायचे आहे.

•••

**(लेखक ज्येष्ठ विचारवंत आहेत.)**

# हमSS है... कसं कुठं आणि किती....

लोकशाहीत एक बरं असतं आणि ते म्हणजे कुणीही, कुठंही आणि कसंही गळ्यात गळा घालायला एकत्र येतात. केंद्रात आता मोदींची हॅट्रीक होऊ नये म्हणून बहुतेक विरोधी पक्ष भाजपच्या विरोधात बिहारमधील पाटण्यात नितीशकुमार यांच्या पाटण्यात एकत्र आले. भाजपपासून, मोदींच्या एकाधिकारशाहीपासून आणि झालेच तर हिंदूराष्ट्रापासून लोकशाहीचे रक्षण हा सर्व विरोधकांचा एक समान अजेंडा होता. विरोधकांमध्ये ऐक्य होणे तशी सोपी गोष्ट नाही. कारण बैठकीला आलेले छोटे-मोठे पक्ष वेगवेगळ्या विचारधारांचे आणि प्रदेशातले आहेत. विरोधी पक्षांतील टोकाचे मतभेद हाच अनेक वेळत्त सत्ताधाऱ्यांचा विजय पक्का ठरवत असतो, हेही सर्वांना ठाऊक आहे. कधी तात्विक, कधी व्यवहारिक तर कधी प्रतिष्ठेचे प्रश्न निर्माण होतात आणि कशी बशी उभी राहणारी विरोधकांची मोट पंक्चर होते. अनेक वेळा असे घडले आहे. भाजपच्या कुशीत गेलेले तिचे अनेक मित्र तिचे पूर्वी कट्टर विरोधक होते. काही समाजवादी, काही प्रदेशवादी, काही आंबेडकरवादी होते. सत्तेची ऊब भोगत गुटगुटीत व्हावे या हेतूने त्यांनी कमरेचे काढून डोक्याला गुंडाळले आणि ते सत्ताधारी झाले. चिंध्यापिराप्रमाणे वाटणाऱ्या या विरोधक मित्रांना मग भाजपने जिथं निरमा पावडरीचा मोठा कारखाना आहे त्या गुजरातमध्ये नेले. धुऊन पुसून त्यांना साफ केले. कपाळावर मोदींचे आणि कमळाचे चित्र चिकटवले आणि मग गुजरातबाहेर काढून पार त्यांना कोणत्या तरी दिंडीपर्यंत नेले. यातले काही पुन्हा फुटले. विरोधी पक्षांच्या आघाडीत आले. कर्नाटकात कोणा भाजप नेत्याला काँग्रेसने लगेचच पोटनिवडणुकीत उमेदवारी दिली. नितीशकुमार भाजपशी पदर फाडून पुन्हा लालू बरोबर गेले. काश्मिरमधील मेहबुबा मुफ्ती असतील अशी अनेक नावे सांगता येतील, की जे आता विरोधकांच्या आघाडीत आले आहेत. बहुतेक पंधरा जणांचा इतिहास तपासला तर असेच काही आढळून येईल. शरद पवारांनी दोन वेळा नवा पक्ष काढलाय आणि ङ्खपुलोदफ्सारखा प्रयोग करता येतोय हेही सिद्ध केलंय. काँग्रेसनेही अनेक चित्र-विचित्र घटकांशी घरोबा केलाय. राजकारणात हे असं चालतच राहतं आणि राजकीय लोकशाही त्यालाच म्हणतात. हे लोकांनाही पटलंय म्हणून तर ते खोकेबिकेच्या घोषणा फार गांभिर्यानं घेत नाहीत. कारण त्यांनी पहाटे झालेला अजितदादांचा शपथविधीही बघितलेला असतो आणि उजव्या डाव्यांनी मुंबईत शिवसेनेला दिलेला पाठिंबाही बघितलेला असतो. तसंच ममता बॅनर्जी यांचेही असते. काँग्रेसला आणि डाव्यांना बंगालमध्ये नामशेष करून त्या भाजपविरुद्ध उभ्या राहतात आणि पुन्हा याच पक्षांच्या आघाडीत येतात. राजस्थानमध्ये आणि अजून कुठे कुठे कुणाकुणाला पाठिंबा देणाऱ्या मायावती यांचंही वेगळं नाही. भाजप आणि काँग्रेसला साप साप म्हणत तोच गळ्यात अडकून कसा घेतला याविषयी त्या कधी बोलत नाहीत आणि आघाडीतही येत नाहीत. आप आघाडीबाहेर कधी येईल सांगता येत नाही. नुकत्याच झालेल्या निवडणुकीतही परस्परांच्या छाताडांवर उभे असलेलेही आता आघाडीत आहेत. या सर्वांचं चारित्र्य, चालन सर्वांनाच ठाऊक



असल्याने सर्वात मोठा प्रश्न विश्वासार्हतेचा तयार होतो. पण आता या सर्वांनी लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सुरक्षा, सामान्यांचे प्रश्न गाजवायचे ठरवले असल्याने या आघाडीला लोकबळ लाभेल असे म्हणण्यास वाव आहे. हे विषय चालवून भव्य यश मिळवता येते हे कर्नाटकाच्या निवडणुकीत अलीकडेच सिद्ध झाले आहे. भाजपसमोर कोणी एकटा सर्वत्र टिकू शकत नाही याची खात्री झाल्यानेच आघाडीचा पाळणा पुन्हा हलवायला बळ मिळाले आहे. आता प्रश्न आहे तो या आघाडीला एक दीर्घकालीन शक्ती बनवण्याचा. त्यासाठीचे ठोस प्रयत्न करण्याचा.

आघाडीचे म्हणून काही धर्म असतात. पण ते आपल्याकडे पाळले जात नाहीत. एकच व्यावहारिक धर्म पाळला जातो आणि तो म्हणजे आघाडीत राहूनही स्वतःलाच शक्तिमान करण्याचा. आघाडीतील सर्वच घटक असे करू लागले म्हणजे छोटे कोणी व्हायचं आणि एक पाऊल मागं कोणी घ्यायचं, हा प्रश्न तयार होतो. गणिताचा मार्ग अवलंबूनच सर्व प्रश्न सोडवता येत नाहीत. नैतिकतेचा मार्गही अवलंबावा लागतो. तो नाही अवलंबिला तर दीर्घकालीन गुंता तयार होतो. केवळ एक जागा अधिक मिळाली म्हणून काही छोट्यांनी मोठी पदे आपल्याच पदरात पाडून ठेवली आहेत. हे एका बाजूला आणि काही मोठ्यांनी एखाद्याला एकच जागा आहे म्हणून त्याला दाबून ठेवले आहे. विवेकवाद गुंडाळून ठेवावा लागतो. त्यामागची समीकरणे वेगळी असतात. महाराष्ट्रात बंडखोर शिवसेनेच्या पन्नास जागा असूनही मुख्यमंत्रीपद त्यांच्याकडे आहे. भाजपने ते मान्य केले आहे. कारण आघाडीपेक्षा शिवसेना संपवणे त्यांचा हेतू होता, आहे. एकत्र राजकीय सूडाचा प्रवास आहे तो. असे प्रवास आघाडीत असणार नाहीत असे समजण्याचे कारण नाही. भाजप आघाडीत तर २१ घटक पक्ष होते. त्या सर्वांचे आता नेमके काय चालले आहे आणि कोण राजकारणातून फेकले गेले आहे, हा एक चिंतनाचा विषय आहे. आघाडी मोठी विलक्षण गोष्ट असते. इथं सूसरबाईची पाठ गुळगुळीत होते आणि नाव पाण्यात मध्यभागी गेल्यानंतरही काही वेळा वल्हे तुटू शकते किंवा नावाडीच बेजबाबदार वागू शकतो. भारतीय राजकारणातील अनेक आघाड्यांमध्ये घडले आहे. एखादा पंतप्रधान संसदेत पोहोचण्यापूर्वीच त्याला राजीनामा द्यावा लागला. काही पंतप्रधान अकरा दिवस, अकरा महिने इतका कालावधी पूर्ण करू शकले. या सर्व पार्श्वभूमीवर मोदी

अधिक बलदंड आहेत. भाजपचे सारे राजकारण जाती-पातीच्या, बीसी-ओबीसीच्या, शेठजी-भटजींच्या समीकरणावर उभे राहते आणि धर्माचे खतपाणी त्याला मिळते. साधू-संतांचा आणि भांडवलदारांचा आशीर्वाद मिळतो. दबाव इतका प्रचंड आहे, की कोणतीही गोष्ट ते करू शकतात. अभ्यासक्रमातून डार्विनला हद्दपार करण्यापासून ते संसदेत यज्ञ घालण्यापर्यंत काहीही करू शकतात. या पार्श्वभूमीवर नव्या आघाडीला रणनीती आखावी लागणार आहे. भाजप कितीही मोठा झाला तरी त्याची टक्केवारी पन्नाशीचा आकडा कधी पार करू शकत नाही. पन्नास-साठ टक्के मते त्याच्या विरोधात आहेत, असा त्याचा अर्थ आहे. पण ही मते एकसंध होत नाहीत, यात भाजपचा फायदा आहे. आघाडीचा धर्म ठरवताना एक गोष्ट सर्वप्रथम स्पष्ट केली पाहिजे आणि ती म्हणजे धर्मराष्ट्र आणि स्मृतींकडे सरकणाऱ्या व्यवस्थेला हरवायचे आहे, की आघाडीतंर्गत कोण मोठा कोण छोटा अशी भांडणे करायची आहेत? आघाडीत तिच्या जन्माच्या वेळीच बिघाडीच्या काही जागा तयार झालेल्या असतात. त्या फटी आताच बुजवायला पाहिजेत. भाजप नको तर कोण? असा प्रश्न भाजपच उपस्थित करते आणि कोण या प्रश्नाला उत्तरच नाही, असे सांगत लोकांना आपल्याकडे वळवते. आपणही बऱ्याच वेळेला अशा उत्तरांना बळी पडत असतो. लोकही बळी पडत असतात. कोण हा प्रश्न अगोदर तयार होता कामा नये, तर तो नंतर व्हावा लागेल. कोण नको आहेत त्यांना दूर केले, की कोण हवेत या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपोआपच जागा तयार होते. याचे उदाहरण म्हणून कर्नाटकवर नजर टाकायला हरकत नाही. कर्नाटकात लोकांना भाजप नको होता हे सर्वप्रथम पक्के झाले होते. काँग्रेसच हवी हे पक्के नव्हते. भाजपला हरवण्याच्या निर्धाराने लोकांनी काम केले आणि काँग्रेसलाही लाभ झाला. याचा अर्थ काँग्रेसविषयी सहानुभूती नव्हती असे घाईनं म्हणण्याची चूक कोणी करू नये. काँग्रेस हवी की भाजप नको, या द्वद्वांत लोकांनी भाजप नको या प्रश्नाचे उत्तर दिले आणि त्यात स्वाभाविकच काँग्रेसला स्थान मिळाले. संयुक्त जनता दलाचा सत्ता इतिहास भाजपच्या स्पर्शाशिवाय झाला असता, तर कदाचित तोही या उत्तरात समाविष्ठ झाला असता. असो. फार तर्कशास्त्र लावून हा खेळण्याचा विषय नाही.

आपला देश जगात मोठा होत असेल, आपला नेता विश्वगुरू होत असेल. पण देशांतर्गत स्थिती काय आहे. आपला देश कोण्या एके काळी कल्याणकारी रुप घेऊन जगत होता. आता तो खासगीकरणाच्या माऱ्यात छोटा होतो आहे. खासगीकरणाच्या रेट्यात सामान्यांची स्वप्ने आणि कल्याणकारी राष्ट्राची स्वप्ने चिरडून जात आहे. एकीकडे आक्रमक धर्म आणि मूलतत्त्ववाद आणि तो खेळवणार दांडगे लोक आणि दुसरीकडे राज्यघटनेचा संकोच पाहणारा सामान्य माणूस, गांधी मोठे की गोडसे, संविधान मोठे की स्मृती, धर्म मोठा की राष्ट्र, जीर्ण परंपरा आणि संस्कृती मोठी की विज्ञान, डार्विन मोठा की मनुचा मासा असे अनेक प्रश्न विचारणारी स्थिती आहे. या काळात विरोधी पक्ष आपले राजकारण केवळ सत्तेसाठी करणार आहेत, की हा पेचप्रसंग सोडवण्यासाठी, आपली ढासळलेली विश्वासार्हता, अंतर्गत कलहाचे सातत्याने वाजणारे ढोल, परस्परांचा पत्ता कट करण्याच्या खेळी आणि ओठात एक व पोटात एक आदींचे एक चित्र विरोधी पक्षांच्या भोवती तयार झालेले आहे. ते न संपवता आघाडी तयार झाली, असा ढोल बडवण्यात काही अर्थ नाही. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेचे रक्षण, संविधानाची प्रतिष्ठा कमी होऊ नये असे वर्तन आदींबाबत ठोस भूमिका घेतली आणि तडजोडीने नव्हे तर जबाबदारीने एकत्र येण्याचा प्रयत्न केला तर जनता कदाचित साथ देईल. कारण ती अशाच गोष्टीची वाट पाहत आहे.

## ऑनलाईन गेममुळे माणसाचाच गेम

जेव्हा जेव्हा समाजात दारिद्र्य वाढतं, स्पर्धा वाढते, असुरक्षितता वाढते, जगणं एकदम महाग होतं तेव्हा समजावं, की झटपट श्रीमंत होण्याच्या मार्गाचा सुकाळ होतो. लॉटरी येते, कूपन येतात, मोफत गोष्टी मिळवण्यासाठी नवे मार्ग येतात, कर्जे मुबलक होतात, स्किम निघतात.. बरंच काही तरी व्यवस्थेत घडायला लागतं.. श्रीमंत राष्ट्रात लॉटरी कमी, भारतासारख्या गरीब देशात जास्त का, हा प्रश्न कुणाच्याच मनात निर्माण होत नाही. जणू काही फुकटात मिळणाऱ्या गोष्टीमागं सारे धावू लागतात. इथंच मटका मोठ्या प्रमाणात का चालतो, इथंच पावला-पावलावर हातभट्ट्या का पेटतात, जुगाराचे अड्डे का चालतात, इथंच लॉटरीवर चित्रपट-नाटक का निघते. या साऱ्यांचं उत्तर दारिद्र्य आणि त्यातून झटपट बाहेर पडण्याचा आणि रात्रीत गर्भश्रीमंत होण्याचा मार्ग. ज्याला लॉटरी लागते त्याना नायक बनवलं जातं आणि जे कोट्यवधी हरतात त्यांचा कुणाला पत्ताच नसतो. शंभर कोटी वगैरे बक्षीस असलेल्या लॉटरी असतात. खरंच त्यांचं पुढं काय होतं, पेट्रोल पंपावर जास्त पेट्रोल घेतल्यानंतर मिळणाऱ्या कुपनचं काय होतं कोणलाच कळत नाही. नशिब नावाची नसलेली गोष्ट गळ्यात अडकवून प्रवाह जनांचा धावतोच आहे. खूप धावतो आहे. नशिब पकडण्यासाठी धावतो आहे. 'अपना टाईम आएगा' असं लिहिलेलं टी-शर्ट आणि तसा सिनेमा बघत धावतो आहे. रुंद रस्त्यावर गर्दीचा महापूर येतो आहे. परस्परांच्या मानेवर पाय टाकून लोक धावताहेत, तोंडातली लाळ चाटत सिलबंद पाणी पकडण्यासाठी धावताहेत लोक... ऑनलाईन आणि ऑफलाईन धावत आहेत लोक...

लोकांना धावायला लावणारी व्यवस्था मोठी महावस्ताद असते. काहीही करून, कुठंही ती धावायला लावते. जमिनीवर, पाण्यावर, हवेत एवढेच नव्हे तर आभासी जगात छोट्या-मोठ्या पडद्यावरती धावायला लावते. घरी बसून महिन्याला पाच लाख कमवा, पडद्यावर रम्मी खेळून कोट्यवधी मिळवा. गेम खेळा आणि लाखो मिळवा, कागदपत्रांशिवाय कोट्यवधीचे कर्ज मिळवा यांसारख्या अनेक भन्नाट योजनांची गर्दी होते. माणसांची गर्दी धावायला लागते. तिनं धावावं यासाठी दैववाद नाचवला जातो. वाहनांच्या ढुंगणावर भारी भारी सुविचार लिहिले जातात. समय से पहले, तकदीरसे जादा कुछ मिलनेवाला नही, जितना तेरा है उतनाही मेरा है, कोण कुणाचं नशिब घेत नाही वगैरे-वगैरे... दरिद्री माणसाला देव हा बहुमान दिला जातो. हळूहळू माणूस गेमच्या सापळ्यात अडकतो. त्यासाठी जाहिरातीचा प्रचंड मारा असतो. तो माणसाचा विवेक आणि विचार काढून घेतो. रुपया गुंतवल्यावर लाख कसे मिळतील हा विवेकी प्रश्नही तो गमावून बसतो. लोकांना शहाणे करण्यासाठी लॉटरीवाले, रम्मीवाले आणि गेमवाले प्रबोधनही करतात. या खेळात जोखीम आहे, जबाबदारीने खेळा असा तो उपदेश असतो. जोखीम किती मोठी असते हे कुणाला



कळत नाही. म्हणजे लोक फसणारे खेळ सुरू करायचे आणि जोखीमही सांगायची. व्यसने वाईट असतात अशी जाहिरातही करायची आणि व्यसन वाढवणाऱ्या उत्पादनांना परवानगीही द्यायची. दारुबंदी खाते काढायचे आणि दारुनिर्मितीला परवानगीही द्यायची, असे व्यवस्थेचे धोरण असते. एखादा दारू पिऊन मेला की त्याच्या कुटुंबाला मदत करण्याचा फार्स होतो; पण दारुनिर्मिती बंद होत नाही.

आता तेलंगणातून आलेल्या बातमीनं सगळ्या समाजाला धक्का बसला आहे. तेलंगणातील चौतुप्पाल नावाच्या खेड्यात दोन मुलांची आई असलेल्या राजेश्वरीने दारिद्र्यातून बाहेर पडण्यासाठी मोबाईलवर गेम खेळून पैसे मिळवण्याचा मार्ग पत्करला. अतिशय सोपा मार्ग. मोबाईलचा एक चांगला हॅण्डसेट मिळाला, की हा गेम खेळता येतो. खात्यावर पैसे असतात ही अट असतेच. काहींनी ती अटही काढून टाकली आहे. जुगार, गेम, रम्मी खेळता यावी यासाठी या कंपन्याच तुमच्या नावावर खेळते भांडवल म्हणून पाच-पंचवीस हजार रुपये जमा करतात. खेळा आता, पैशाची काळजी करू नका. आमचे पैसे वापरा. पैसे कमवून ते परत करा. म्हणजे तुमची एकही दमडी न वापरता आमच्याच खेळात, आमच्याच पैशात तुम्ही श्रीमंत व्हायचं अशी ही ऑफर असते. लोक ती स्वीकारतात. कुणीही प्रश्न निर्माण करत नाही, की पदरमोड करून हा आम्हाला का श्रीमंत करतोय! श्रीमंत होण्याचं स्वप्न विवेक खाऊन टाकतं. सुरुवातीला काही पैसे मिळतात. पण ते अधिक मिळतील अशा आशेने लोक आणखी खेळतात. आणखी पैसे गुंतवतात. कर्ज काढून पैसे गुंतवतात. चोऱ्यामाऱ्या करून पैसे लावतात. घर-शेती गहाण ठेवतात. गुंतवलेले पैसे काहीही करून मिळवा ही धारणा त्याच्यामागे असते. तिचे रुपांतर व्यसनात होते आणि हेच व्यसन त्याला मृत्यूकडे नेते. वर्षाला अनेक जण आत्महत्या करतात. त्यांच्या नोंदी कुठे असत नाहीत. त्यांना श्रद्धांजली कोणी वाहत नाही. हे लोक न 'मन की बात'मध्ये असतात न 'तन की बात'मध्ये, चिल्लर आणि व्यसनी पार्टीत ज्यांची गणना होते. इकडे हा ऑनलाईनचा बाजार भरात आलेला असतो. या बाजारात राजेश्वरीही अडकली. अगदी खोलवर रूतली. पदरातल्या दोन मुलांच्या उद्धारासाठी काहीतरी केलं पाहिजे या जिद्दीने ती गेममध्ये पैसे गुंतवत होती. पण गेम उद्धारासाठी नसतो, तर उद्ध्वस्त करण्यासाठी असतो हे तिच्या लक्षात येत नव्हतं. 'खेलो, और खेलो, और जीतो' असं सांगितलं जात होतं. हे खेळवणारे कोण असतात, कुठं बसलेले असतात हेही तुम्हाला कळत नाही. शेवटी राजेश्वरी हरली. पुन्हा हरली. पराजय लपवण्यासाठी आणि नंतर उद्भवणारी परिस्थिती टाळण्यासाठी तिने आपल्या दोन अतिशय कोवळ्या लेकरांसह आत्महत्या केली. ऑनलाईन गेम खेळून आयुष्याचा खेळ नीट करण्यासाठी ती निघाली होती. गेमनेच तिचा गेम केला.

•••

**– तात्या विंचू**

# एक व्यक्ती/एक मत/एक मूल्य

**(पान २४ वरून)** सूर्यासारखे प्रकट झाले होते. मतदानाचा अधिकार न देणे म्हणजे त्या अन्यायी व्यवस्थेचे मांडलिकत्व स्वीकारण्यासारखेच होते. हक्क आणि भूतदया यातील तो फरक होता. हक्कांसाठीचा तो लढा होता. पहिल्या राऊंड टेबल कॉन्फरन्समध्येही त्यांनी हीच भूमिका हिरीरीने मांडली. कॉंग्रेसच्या वर्गीय व वर्णीय रचनेमुळे दलितांना, अस्पृश्यांना, वंचितांना न्याय मिळणे अशक्यच होते. इंग्लंडचा सामाजिक, राजकीय इतिहास व त्यामागील तत्त्वज्ञानाचा संदर्भ देऊन ते म्हणाले, 'The unreformed parliament was not blessings to one.' आपल्या संसदेची सध्याची अवस्था पाहता डॉ. आंबेडकर काय म्हणाले असते याची कल्पनाच केलेली बरी. त्यांनी आपल्या भाषणात जॉन ड्यूने यांनाही उद्धृत केले. लोकशाही म्हणजे एक विशिष्ट प्रकारची राज्यव्यवस्था नव्हे, ती एक जीवनपद्धती (A mode of association living a conjoint communicated experience) आहे. एक सुसंवादाची प्रक्रिया आहे. अनेक विचारधारा, बहुविध घटकांतील सुसंवाद यामुळे व्यक्ती आणि समाज यातील विविध समतांचा सुसंगतपणे विकास होऊ शकेल. सार्वत्रिक मतदान पद्धतीमुळेच शांततेने सत्तेचे परिवर्तन होऊ शकते. त्याचप्रमाणे सामान्य माणसाला सरकारने आपल्याला कसे वागवावे, हे ठरवता येते. भांडवलशाहीला नियंत्रित करण्याचा तो मार्ग आहे. श्रमिक आपल्या मतदानाच्या अधिकाराने भांडवलदाराच्या शक्तीला मर्यादित करू शकतात. लोकांचा सहभाग घटना समितीत असावा, ती लोकांपासून निर्माण व्हावी हा जवाहरलाल नेहरूंचा आग्रह १९३३ पासूनच होता. घटना समितीच देशातील सर्व राजकीय प्रश्नांना योग्य तऱ्हेने सोडवू शकते, हा आशावाद योग्यच होता. १९४० साली गांधीजींनीच मांडलेल्या ठरावात कॉंग्रेस वर्किंग कमिटीने निर्णय घेतला, की भारतीय लोकच त्यांच्या घटनेला आकार देतील आणि त्याप्रमाणे जगातील इतर देशांशी आपले संबंध कसे राहतील हे निश्चित करतील आणि ही समिती प्रौढ मतदान पद्धतीने निवडली जाईल. घटना समिती सार्वभौम राहील. याचा अर्थ घटना समितीत बाह्य हस्तक्षेप राहणार नाही. घटना समितीला एका अर्थाने राष्ट्राचे भवितव्य घडवायचे होते. नेहरूंच्या भाषेत हा एक नियतीशी करार होता. भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात हा खऱ्या अर्थाने क्रांतीचा क्षण होता. देशाच्या सद्भाग्याने डॉ. आंबेडकर हेच ही घटना लिहिणार होते. हजारो वर्षांच्या इतिहासात ज्यांचे आक्रंदन कुणी ऐकले नाही, त्यांचा आवाज बनून डॉ. आंबेडकर उभे होते. घटनेने निव्वळ एक मत एक मूल्य देऊन चालणार नव्हते. व्यक्तीचा दर्जा, प्रतिष्ठा, मूलभूत अधिकार, त्याला मिळणारी संधीची समानता, सर्व प्रकारचे स्वातंत्र्य व विकासाची हमीही देण्याची आवश्यकता होती. घटनेने ती दिली आहे; परंतु प्रत्यक्षात ती मिळाली का, हा गहन चिंतनाचा विषय आहे. स्वातंत्र्याच्या अमृतकाळात यावर मुक्त चर्चा होणे आवश्यक आहे.

•••

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**

# लेखणी तासून ठेवा

लेखणी तासून ठेवा दाखवा प्रहार आपला
बसला टपून वैरी करावया संहार आपला

घेऊन आण लढण्याची वाढलो टोळीत आम्ही
आम्हीच मांडला रे तुकड्यांचा बाजार आपला

नाही उणीव आता आमच्यात विद्वानांची
वाट भिन्न हुडकणे जुना आजार आपला

खाऊन विस्तव, पिऊन आग बनलो ज्वालामुखी
चेतवा अग्नी विद्रोहाचा दाखवा निखार आपला


नका विसरू यातना वेदनादायी जुल्मी युगाच्या
राहून गाफिल ना होवो बोथट वार आपला

संघर्षाच्या वणव्यास धार लावते शस्त्र लेखणीचे
लढण्याआधी गंजविते रे बेकीचा विकार आपला

जपून ताजी ठेवा रे ऊब उकडत्या रक्ताची
धरून बोट वादळाचे ठेवा कारवा तय्यार आपला

अंतिम श्वास मोजते आपल्या समोर लोकशाही
तपासतो वैरी आहे का जिवंत हुंकार आपला...

**– निशांत गुरू**



# कोठवर ?

हे रिकामे घेऊन पोटाचे होल बाबा
कसे बडवू मी सांग तुझे ढोल बाबा

बंद कर तुझे ते बोलणे गूळघाले
भाकरीची काय व्यवस्था? बोल बाबा

हा आला, तो आला, येशील अता तू ही
आज तुम्हास कळले आमुचे मोल बाबा

कान किटले तुमच्या त्या घोषणांनी
कोठवर करता आम्हाला गोल बाबा?

**– डी.के. शेख**

# कधीतरी तर आपले मौन सोड

सरकारला खडे नव्हे
यापुढे
झुकलेले
बोल सुनव

खडे सुनावणे
ही म्हणे फॅशन आहे
सरकारी असती तर ठीक
ती तर बिनसरकारी आहे

राजे आहेत ना ते
आपण त्यांची प्रजा
म्हणायचे नाही यापुढे
तू चुकलास राजा

म्हणणारेच कसे चुकले
हेच ते दाखवून देणार आहेत
त्यासाठी खाल्ले जे मीठ
त्याला ते जागणार आहेत

स्वातंत्र्य आहे त्याचेही त्यांना
वाजयायचा आहे सरकारचा
बँडबाजा त्यांना,
तर वाजवू द्या ना

देतील तो
खाजा म्हणतात
निमूट ठेऊन
घ्या ना

देतात ना आता घसघशीत रक्कम
उत्सव साजरा करायला
काय हरकत आहे मग
त्यांची तळी उचलून धरायला

असे आमचे लेखक
असे आमचे लेखनविश्व
हेच तर आमचे घर, ज्याला म्हणतो आम्ही
आपले विश्व

एक बरे आहे, ते करत नाहीत धरसोड, पण
बा लेखका,
कधी तर आपले
मौन सोड

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

# वार्षिक वर्गणीदारांना

## २०% सवलत!

**देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक**

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदारचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा

सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ९६० | ८०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ४८० | ४०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | २४० | २०० | |

(वार्षिक विशेषांक – ४) / (६ महिने – २)

**चेक किंवा डीडी ने पेमेंट**

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : -------------------------------- जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ------------------------------------------------------ पत्ता : ------------------------------

------------------------------------------------------ शहर : ------------------------------------------

राज्य : ----------------------- पिन कोड : ------------------- फोन नं. (घर) : -----------------------

मो. नं. : ----------------------- इ-मेल : -----------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

www लॉग ऑन करा peoplespost.in

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

# MASTERS MANAGEMENT CONSULTANTS (INDIA) PRIVATE LIMITED

Project Management Consultancy Services

**CONTACT**

PHONE:
+91 22 42959479 / 91369 90947

WEBSITE:
www.masterspmc.com

EMAIL:
connect@masterspmc.com

**MASTERS** is a Project Management Consulting organization established in 2004.
Our head office is in Mumbai with regional offices at Delhi, Kolkata, and a strong presence in Ahmedabad and Jamshedpur. **We deliver projects PAN India.**

**Masters is a professionally managed real estate development management consultancy** organization with the right mix of professionals with multi-disciplinary skills. Our strength lies in focusing on providing end-to-end, result-oriented, cost-effective, project-specific safe solutions.

**Philosophy**: If something is worth doing, it is worth doing well!
**Vision** - Excellence through Integrity
**Honesty** - Transparency

Within this span of **18 years,** we have **delivered 34.61 million sq. ft.** of development across projects **currently handling** approx. **16.85 million sq. ft**. of projects.

Associated with more than 4 million sq. ft. of projects for Design Services.

**MASTERS provides Design & Project Management Services** for Greenfield and Brownfield Construction projects such as **High Rise Residential, Re-development, Mix Use, Commercial, Retail /Mall, Hospitality, Institutional, Industrial, Infra-structure and Roadwork**

## Scope Of Services Offered

- **Development Solutions**
  *Due Diligence & Advisory | Turnkey | Design & Built | Construction Management @ Risk*
- **Project Management** from Concept design to Handover
  Design Management | Planning Management | Procurement Management | Construction Management
- **Design Services**
  MEP design | Design & Planning | Interior Design | Design Management
- **Cost Consultancy**
  Budgeting | Cost Plan | Tendering | Cost Monitoring | BOQ's | Cost Control & Administration | Reconciliation
- **Audit Services**
  Quality Audits | Safety Audits | Process Review | Program Management

**Masters** has just **delivered the Single Largest Commercial Building 7 Million Sq. ft.,** and **associated with several mega projects** few being Govt. projects across various states.